# महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

नोंदणी संख्या : डी एल ३३००४ / ९९ भारत सरकारचे अधिकृत राजपत्र

असाधारण

भाग २ – अनुभाग – ३ – उपविभाग ( i )

अधिकृत प्रकाशन

संख्या ३६ नवी दिल्ली शुक्रवार दिनांक १८ जानेवारी २०१९ / पौष २८, १९४०

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय

अधिसूचना

नवी दिल्ली शुक्रवार दिनांक १८ जानेवारी २०१९

सर्वसामान्य वैधानिक नियम ३७ ( अ ) : ज्याअर्थी भारत सरकारच्या तत्कालीन पर्यावरण व वने मंत्रालयाच्या दिनांक ६ जानेवारी २०११ रोजीच्या विशेष आदेशानुसार ( ह्यानंतर सदर आदेशाचा उल्लेख " किनारपट्टी क्षेत्रनियमन अधिसूचना २०११ " असा करण्यात आला आहे. ) केंद्र सरकारने पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा क्रमांक २९ ) च्या कलम ३ अन्वये विशिष्ट किनारपट्टी विभागांना किनारपट्टी नियमन क्षेत्र( ह्या नंतर उल्लेख कि नि वी – सी आर झेड असा केला आहे. ) ;

आणि ज्या अर्थी सागरी व किनारपट्टी परीसंस्थेचे व्यवस्थापन व संवर्धन, किनारपट्टी विभागाचे विकसन, पर्यावरण पर्यटन, उपजीविकेचे पर्याय, व किनारपट्टी वरील समुदायांचा शाश्वत विकास ह्या विषयांचं अनुषंगाने किनारपट्टी नियमन क्षेत्रअधिसूचना २०११ मधील विशिष्ट तरतुदींच्या बाबत विविध हितसंबंधीयांच्या व्यतिरिक्त किनारपट्टीवरील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांकडून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांना अनेक निवेदने प्राप्त झाली होती ;

आणि ज्याअर्थी विविध राज्य सरकारे / केंद्रशासित प्रदेशांनी व हितसंबंधीयांनी किनारपट्टी विनियमन क्षेत्र२०११ च्या संदर्भाने किनारपट्टीचे पर्यावरण व शाश्वत विकासाच्या सदर चिंतांचे निराकरण करण्याची विनंती पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाला केली होती ;

आणि ज्याअर्थी २०११ मधील विशिष्ट तरतुदींच्या बाबतकिनारपट्टीवरील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांकडून तसेच अन्य हितसंबंधीयांकडून उपस्थित केल्या गेलेल्या विविध प्रकारच्या बाबी व चिंतांचे परीक्षण करून सदर अधिसूचनेत योग्य ते बदल करण्यासाठी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांनी डॉ शैलेश नायक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती ;

आणि ज्याअर्थी मंत्रालयाने डॉ शैलेश नायक समिती द्वारा सादर अहवालाचा अभ्यास करून ह्या अनुषंगाने विविध हितसंबंधीयांशी सल्ला मसलत केली आहे ;

आणि ज्याअर्थी किनारपट्टी नियमन क्षेत्रअधिसूचना २०१८ चा मसुदा दिनांक १८ एप्रिल २०१८ रोजी जारी करून सर्व संबंधितांच्या सूचना व अभिप्रायार्थ सदर मसुदा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी उपरोक्त किनारपट्टी नियमन क्षेत्रअधिसूचना २०१८ च्या मसुद्याला प्रतिसाद देऊन प्राप्त आक्षेप व सूचना यांचा केंद्र सरकारने रीतसर विचार केला आहे, ;

त्याअर्थी पर्यावरण ( संरक्षण )अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) मधील कलम ( ३ ) च्या उप कलम ( १ ) व उपकलम ( २ ) च्या परिच्छेद ( v ) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून व दिनांक ६ जानेवारी २०११ रोजीची विशेष आदेश क्रमांक १९ ( इ ) द्वारे जारी किनारपट्टी नियमन क्षेत्रअधिसूचना २०११ अधिक्रमित करून , मात्र सदर अधीक्रमण करण्यापूर्वी केलेल्या किंवा करावयाच्या वगळलेल्या बाबींचा अपवाद वगळून किनारपट्ट्या व सागरी विभागातील अनन्य पर्यावरणाचे व्यतिरिक्त सदर किनारपट्टी प्रदेशातील मत्स्य व्यावसायिक व अन्य स्थानिक समुदायांच्या उपजीविकेचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी तसेच नैसर्गिक आपत्तींचा व जागतिक तापमानवाढीमुळे समुद्राच्या वाढणाऱ्या पातळीचा धोका लक्षात घेऊन शास्त्रीय तत्वांच्या आधारे शाश्वत विकासास

Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019

प्रोत्साहन देण्यासाठी , अंदमान व निकोबार व लक्षद्वीप बेटे व सदर बेटांच्या सभोवताली अस्तित्वात असलेल्या सागरी प्रदेशाला वगळून केंद्र सरकार देशाच्या समुद्र किनारे व राष्ट्रीय सागरी हद्दीतील सर्व प्रदेशास खालील प्रमाणे किनारपट्टी नियमन क्षेत्रम्हणून घोषित करीत आहे

i. सागरी हद्दीवरील भरती रेषे ( ह्यानंतर उल्लेख एचटीएल असा केला आहे ) पासून जमिनीकडच्या बाजूकडील ५०० मीटर पर्यंतचा सर्व प्रदेश
स्पष्टीकरण : सदर अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ भरती रेषा म्हणजे शाश्वत किनारपट्टी विकासानार्थ राष्ट्रीय केंद्राने विहित प्रक्रियेचा अवलंब करून आरेखित केलेली व किनारपट्टी वरील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना उपलब्ध करून दिलेली उधाणाच्या / भरतीच्या वेळेसची कमाल पूररेषा

ii. उच्च भरती रेषेपासून ५० मीटर किंवा खाडीची रुंदी ह्यापैकी जे कमी असेल , तिथपर्यंत किनारपट्टी नियमन क्षेत्रलागू असेल व जमिनीच्या बाजूला व सागराला जोडल्या गेलेल्या जलधी मधील सागराच्या लाटांनी प्रभावित होणाऱ्या जलधीमधील अंतरापर्यंत व त्याच्या आजूबाजूला विकासात्मक कार्याचे नियमन करावयाचे आहे. सदर क्षेत्रहे वर्षातील सर्वात शुष्क कालावधीच्या दरम्यान प्रत्येक हजाराच्या ५व्या भागासाठी ( parts per thousand - पी पी टी ) मोजलेल्या खारेपणावर आधारून व लाटांचा प्रभाव ज्या अंतरापर्यंत जाणवतो असे अंतर स्पष्टपणे निर्धारित करून व आखून घेऊन किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट केले पाहिजे. ( ह्यानंतर कि वी व्य यो – म्हणजेच सी एम झेड पी असा उल्लेख केला आहे.

अशी तरतूद करण्यात येते की ५० मीटर किंवा खाडीची रुंदी यापैकी जे कमी असेल ती सी आर झेड मर्यादा, ही सल्ला मसलत , सर्वाज्जानिक सुनावणी, इत्यादी विहित प्रक्रिया व त्यामधील सूचित पर्यावरणीय सुरक्षा उपायांच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या सदर अधिसूचने नुसारच्या त्या त्या सी एम झेड पी च्या सुधारणा व अंतिम मान्यतेच्या अधीन असतील ; आणि सदर अधिसूचनेनुसार सी झेड एम पी ला मान्यता प्राप्त होई पर्यंत १०० मीटर किंवा खाडीची रुंधी ह्या पैकी कमी असलेली मर्यादा लागू राहील.

स्पष्टीकरण : सदर उप परिच्छेदाच्या प्रयोजनार्थ , “ लाटांनी प्रभावित जलधी “ म्हणजे समुद्राच्या भरतीच्या लाटांनी प्रभावित होणाऱ्या समुद्राशी जोडल्या गेलेले उपसागर , नदी मुख, नद्या, खाडी , पश्वजल, कच्छसर व तलाव .

iii. अंतर मध्यंतर क्षेत्रम्हणजे भरती व ओहोटीच्या रेषांमधील (ह्या नंतर एलटीएल - ओहोटीची रेषा म्हणून उल्लेख करण्यात येईल ) जमिनीचा भाग .

iv. लाटांनी प्रभावित जलधीच्या प्रीत्यर्थ सागर आणि पाण्याच्या बाबतीत ओहोटीची रेषा व प्रादेशिक जल सीमांच्या ( १२ सागरी मैल ) मधील जमीन आणि किनाऱ्याच्या विरुद्ध दिशेच्या ओहोटीची रेषेपासून किनाऱ्या वरील ओहोटीच्या रेषेपर्यंत

२.० **किनारपट्टी विनियमन विभागांचे वर्गीकरण** : किनारपट्टी क्षेत्र व सागरी पाण्याचे संरक्षण व संवर्धन प्रयोजनार्थ किनारपट्टी विनियमन विभागाचे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात येईल.

२.१ **सी आर झेड I**क्षेत्रे पर्यावरणीय दृष्ट्या अतिशय संवेदनशील आहेत व त्यांचे पुढील वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

**२.१.१ किनारपट्टी विनियमन क्षेत्र१ ( सी आर झेड – I ए )**

(क) खालील पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्रव किनाऱ्याची अखंडता अबाधित ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावणारी खालील भूरुपिकीय वैशिष्ट्ये ही सागर विनियमन क्षेत्र१ ( सी आर झेड – I ए ) मध्ये समाविष्ट होतात म्हणजेच
१. खारफुटी वने ( खारफुटी वनाचे क्षेत्रफळ हे १००० वर्ग मीटर पेक्षा जास्त असल्यास त्याच्या भोवती ५० मीटर बफर विभागाची तरतूद असेल व सदर बफर क्षेत्रसुद्धा सागर विनियमन क्षेत्र१ ( सी आर झेड – I ए ) मध्येय समाविष्ट होईल.
२. प्रवाळ व प्रवाळ बेटे
३. वाळूच्या टेकड्या
४. जीवशास्त्रीय दृष्ट्या सक्रीय दलदलीचे प्रदेश

५. राष्ट्रीय वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम १९७२ ( १९७२ चा ५३ ), वन ( संवर्धन ) अधिनियम ९८० ( १९८० चा ६९ किंवा पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) मधील तरतुदींच्या अन्वये स्थापित जैवशास्त्रीय राखीव विभागसाहित राष्ट्रीय उद्याने, सागरी उद्याने, अभयारण्ये, राखीव वने, वन्यजीव अधिवास, व अन्य संरक्षित क्षेत्रसमाविष्ट आहेत .

६. दलदलीच्या खारजमिनी

७. कासवांचे प्रजाजन होत असलेली जमीन

८. अश्वशक्ती खेकड्यांचे अधिवास

९. सागरी गवताळ जमीन

१०. पक्ष्यांच्या प्रजननाच्या जागा

११. पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या वास्तू किंवा क्षेत्रव वारसास्थळे

ख ) राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्र चेन्नई यांनी नकाशित केलेल्या त्यांच्या त्यांच्या हद्दीतील पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांप्रीत्यर्थ सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी सदर अधिसूचनेच्य जोडपत्र १ नुसार तपशीलवार पर्यावरणीय व्यवस्थापन योजना तयार करून ती किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेशी त्याचे एकत्रीकरण करावे.

**२.१.२किनारपट्टी विनियमन क्षेत्र१ ( सी आर झेड – I बी )**

अंतर मध्यंतर क्षेत्रम्हणजे भरती व ओहोटीच्या रेषांमधील (ह्या नंतर एलटीएल - ओहोटीची रेषा म्हणून उल्लेख करण्यात येईल ) जमिनीचा भाग.

**२.२** किनारपट्टी**विनियमन क्षेत्र२ ( सी आर झेड – II )**

सद्य महानगरपालिका हद्दीतील किंवा पाणी पुरवठा, सांडपाणी नलिका इत्यादी पायाभूत सुविधा, अभिगम मार्ग, इत्यादी पुरविण्यात आलेले व एकुण भूखंडांच्या संख्येच्या तुलनेत ५० % भूखंड बांधकाम झालेले आहेत अशी अन्य कायदेशीररित्या निर्देशित समुद्र किनार्याला खेटुन असलेली क्षेत्रे किनारपट्टी विनियमन क्षेत्र२ ( सी आर झेड –II ) मध्ये समाविष्ट होतात

**२.३किनारपट्टी विनियमन क्षेत्र३ ( सी आर झेड – III )**

तुलनेने अबाधित (म्हणजेच ग्रामीण भागातील इत्यादी ) जमिनी आणि सागर विनियमन क्षेत्र२ ( सी आर झेड – II ) मधीलनसलेल्या जमिनी किनारपट्टी विनियमन क्षेत्र२ ( सी आर झेड – III ) मध्ये समाविष्ट होतात. किनारपट्टी विनियमन क्षेत्र२ ( सी आर झेड – III )ची खालील प्रमाणे वर्गवारी करण्यात येईल

**२.३.१किनारपट्टी विनियमन क्षेत्र३अ ( सी आर झेड – III A )**

सन २०११ च्या जनगणनेनुसार प्रती किलोमीटर लोकसंख्येची घनता २१६१ पेक्षा जास्त असलेल्या किनारपट्टी विनियमन क्षेत्र३ ( सी आर झेड – III A ) मधील दाट लोकवस्ती असलेल्या विभागांना सागर विनियमन क्षेत्र३ ( सी आर झेड – III A ) म्हणून निर्देशित करण्यात येईल व सदर किनारपट्टी विनियमन क्षेत्र३ ( सी आर झेड – III A ) मध्ये भरती रेषेपासून जमिनीकडील ५० मीटर क्षेत्र हे " ना विकास विभाग" म्हणून चिन्हांकित करण्यात येईल . मात्र विहित सल्ला मसलतीची प्रक्रिया पार पाडून सदर अधिसूचनेनुसार सी एम झेड पी मंजूर होईपर्यंत २०० मीटर्स पर्यंत " ना विकास क्षेत्र " लागू राहील , अशी तरतूद करण्यात येते .

**२.३.२किनारपट्टी विनियमन क्षेत्र३ ब ( सी आर झेड – III B )**

सन २०११ च्या जनगणनेनुसार प्रती किलोमीटर लोकसंख्येची घनता २१६१ पेक्षा कमी असलेल्या किनारपट्टी विनियमन क्षेत्र३ ( सी आर झेड – III ) मधील दाट लोकवस्ती असलेल्या विभागांना किनारपट्टीविनियमन क्षेत्र३ ब ( सी आर झेड – III B ) म्हणून निर्देशित करण्यात येईल व सदर किनारपट्टी विनियमन क्षेत्र३ ब ( सी आर झेड – III B ) मध्ये भरती रेषेपासून जमिनीकडील २०० मीटर क्षेत्र हे " ना विकास विभाग" म्हणून चिन्हांकित करण्यात येईल .

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

२.३.३ किनारपट्टी विनियमन क्षेत्र३ ( सी आर झेड – III ) मधील लाटांनी प्रभावित जलधींच्या बाजूने भरती रेषेपासून ५० मीटर पर्यंतचे जमिनीचे क्षेत्र किंवा खाडीची रुंदी ह्यापैकी जे कमी असेल , तेवढा भाग किनारपट्टी विनियमन क्षेत्र३ ( सी आर झेड – III ) मधील ना विकास क्षेत्र म्हणून चिन्हांकित करण्यात येईल.

टीप : अधिसूचित बंदरांच्या हद्दीत येणाऱ्या क्षेत्रांना किनारपट्टी विनियमन विभागाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

**२.४किनारपट्टी विनियमन क्षेत्र४ ( सी आर झेड – IV )**

जल क्षेत्र हे किनारपट्टी विनियमन क्षेत्र४ ( सी आर झेड – IV ) म्हणून निर्देशित करण्यात येईल व त्याचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करण्यात येईल.

२.४.१ **सागर विनियमन क्षेत्र४ अ ( सी आर झेड – IV A )**

ओहोटीची रेषा ते समुद्राकडील १२ सागरी मैलांचे अंतर यामधील समुद्र व पाण्याचे क्षेत्र हे किनारपट्टी विनियमन क्षेत्र४ अ ( सी आर झेड – IVA ) असेल.

**२.४.२. किनारपट्टी विनियमन क्षेत्र४ ब ( सी आर झेड – IV B )**

समुद्राच्या लाटांनी प्रभावित जलधीच्या किनाऱ्या वरील ओहोटीची रेषेपासून जलधीच्या मुखापासून ते लाटेच्या प्रभावक्षेत्रा पर्यंत विस्तारलेल्या विरुद्ध बाजूकडील ओहोटीची रेषे पर्यंत ; म्हणजेच वर्षातील सर्वात शुष्क मोसमातील दर हजारी ५ भाग खारेपणा असलेल्या क्षेत्राचा किनारपट्टी विनियमन क्षेत्र४ ब ( सी आर झेड – IVB ) मध्ये समावेश असेल.

**३.० किनारपट्टी विनियमन विभागात विशेष विचार करण्याची गरज असलेली क्षेत्रे**

सागर किनाऱ्यावरील पर्यावरणाची नाजूक स्थितीचे संरक्षण व स्थानिक समुदाय तोंड देत असलेल्या अडचणींच्या प्रीत्यर्थ खालील किनारपट्ट्यांचा विशेषत्वाने विचार करणे आवश्यक आहे.

**३.१. नाजूक स्थितीतील असुरक्षित सागर किनारे :**

बंगाल मधील सुंदरबन क्षेत्र व गुजरात मधील खंबायतचे व कच्छचे आखात, महाराष्ट्रातील मालवण, आजरा, - रत्नागिरी, कर्नाटक मधील कारवार व कुंदापूर , केरळ मधील वेंबनाड , तामिळनाडूतील मन्नारचे आखात, ओदिशातील भैतरकणिका, आंध्र प्रदेशातील कोरिंग, पूर्व गोदावरी व कृष्णा हे पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ नुसार निर्धारित पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्रअसून नाजूक स्थितीतील असुरक्षित सागर किनारे म्हणून निर्धारित करणे आवश्यक आहे. तसेच शाश्वत उपजीविकेसाठी किनारपट्टी वरील साधनांवर अवलंबून असलेल्या मत्स्य व्यावसायिकांना सहभागी करून घेऊन उपरोक्त विभागांचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

३.२. अंतर्भागातील पर्श्वजल बेटे व मुख्यभूमीच्या किनाऱ्याच्या बाजूने असलेल्या बेटांसाठी किनारपट्टी विनियमन क्षेत्र

३.३ बृहन्मुंबईच्या महानगरपालिका हद्दीसाठी किनारपट्टी विनियमन विभाग

**४. किनारपट्टी विनियमन विभागात प्रतिबंध असलेली कार्ये**

संपूर्ण किनारपट्टी विनियमन विभागात खालील कार्यांना सर्वसाधारणपणे प्रतिबंध असेल. आणि किनारपट्टी विनियमन विभागाच्या विशिष्ट वर्गवारीतील म्हणजेच सी आर झेड I , सी आर झेड II, सी आर झेड III व सी आर झेड IV मधील अनुज्ञेय व नियमित कार्ये त्याप्रीत्यर्थ असलेले अपवाद हे परिच्छेद ५ मधील तरतुदींनी शासित असतील. :

i. नवीन उद्योगांची स्थापना व सद्य अस्तित्वातील उद्योग, परीचालने किंवा प्रक्रियांचा विस्तार.
ii. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक ४ एप्रिल २०१६ रोजीच्या अधिसूचना क्रमांक सर्वसामान्य वैधानिक नियम ३९५ ( इ ) नुसार विनिर्दिष्ट धोकादायक पदार्थांची साठवणूक किंवा विल्हेवाट लावणे , तेलाचे उत्पादन व हाताळणी करणे
iii. नवीन मत्स्य प्रक्रिया केंद्रे सुरु करणे



iv. सदर अधिसूचनेनुसार अनुज्ञेय असलेली व सक्षम प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीने निष्पादित केलेली कार्ये वगळता जमिनीचे पुनःप्रापण , बंधारे बांधणे किंवा समुद्राच्या पाण्याचा नैसर्गिक ओघ बदलण्याचा प्रयत्न करणे

v. उद्योग, शहरे किंवा नगरे, व अन्य मानवी वस्त्यांमधून प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्याची व निसृत पाण्याची विल्हेवाट

vi. बांधकामाचा राडारोडा, औद्योगिक घन कचरा, राख इत्यादी सहित शहरातील किंवा गावातील कचरा जमिनीच्या भरावार्थ राशीपाटन करणे

vii. किनारपट्टीची मोठ्या प्रमाणवर धूप करणारे बंदरे प्रकल्प

viii. वाळू, खडक, व अन्य उपस्तरिय साहित्याचे खनन

ix. वाळूच्या सक्रीय टेकड्या संस्करित किंवा बदलणे

x. जल प्रणाली व सागरी जीवनाच्या सुरक्षिततेची खबरदारी घेण्यासाठी सागराच्या पाण्यात प्लास्टिकची विल्हेवाट लावण्यास प्रतिबंध करण्यात येईल व सी आर झेड मध्ये प्लास्टिकचे व्यवस्थापन व विल्हेवाट लावण्यासाठी पर्याप्त उपाययोजना करणे आवश्यक आहे.

xi. भूजलाचा उपसा

**५. किनारपट्टी विनियमन विभागा ( सी आर झेड ) मधील अनुज्ञेय कार्याचे नियमन**

**५.१ किनारपट्टी विनियमन क्षेत्र( सी आर झेड I )**

**५.१.१ किनारपट्टी विनियमन क्षेत्र( सी आर झेड 1 A )**

सदर क्षेत्रहे पर्यावरणदृष्ट्या अतिशय संवेदनशील असतात व खालील अपवाद वगळता, किनारपट्टी विनियमन विभागात ( सी आर झेड 1 A ) कोणत्याही कार्यांना सर्वसाधारणपणे कोणत्याही कार्यांना परवानगी देऊ नये

i. सी झेड एम पी मधील सूचित पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील विभागांसाठी सल्ला मसलत , सर्वाज्जानिक सुनावणी, इत्यादी विहित प्रक्रिया व त्यामधील सूचित पर्यावरणीय सुरक्षा उपायांच्या व खबरदारीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या सदर अधिसूचने नुसारच्या तयार करण्यात आलेल्या पर्यावरण – पर्यटनाच्या योजनेच्या अधीन राहून पूर्वनिर्धारित पट्ट्यात व क्षेत्रात खारफुटीच्या वनातून फेरफटका, वृक्षनिवास , नैसर्गिक माग इत्यादी कार्यांना परवानगी देता येईल.

ii. खारफुटी वनांच्या बफर क्षेत्रात सार्वजनिक प्रयोजनार्थ नलिका , पारेषण तारा, वहन प्रणाली किंवा अभिक्रिया , व घोडेकाठीवर रस्ते बांधणी यासारख्या कार्यांना परवानगी देण्यात येईल.

iii. किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण यांनी शिफारस केलेला व पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाने मंजुरी दिलेल्या तपशीलवार समुद्री किंवा भूमी किंवा दोन्हीच्या पर्यावरण आघात मूल्यमापन अभ्यासंचय अधीन राहून केवळ संरक्षण, मोक्याच्या सार्वजनिक प्रयोजनार्थ घोडेकाठी वरील रस्त्यास व सर्वसामान्य रस्त्याच्या कामास परवानगी देण्यात येईल. तसेच सदर रस्ता हा खारफुटीच्या वनातून जात असेल किंवा त्यामुळे खारफुटीच्या वनांना नुकसान होणार असेल, तर त्यासाठीच्या भरपाईपोटी प्रभावित किंवा नष्ट होणाऱ्या किंवा तोडल्या जाणाऱ्या खारफुटीच्या वनांच्या किमान तिप्पट क्षेत्रफळावर खारफुटी वन लावणे बंधनकारक असेल.

**५.१.२ किनारपट्टी विनियमन क्षेत्र( सी आर झेड 1 B ) :**

अंतर मध्यंतर ( भरती व ओहोटी मधील प्रदेश ) क्षेत्र
सी आर झेड 1 B विभागात खालील प्रमाणे कार्ये विनियमित वा अनुज्ञेय असतील .

i. फक्त खालील प्रकारच्या कार्यासाठीच भूमी पुनर्प्रापण , बांधबंदिस्ती इत्यादीसाठी परवानगी देण्यात येईल

a. बंदरे , लहान धक्के, धक्के, बोटीचे धक्के, गोदीतील लाकडी उतार, पूल, तटरक्षक दलासाठी तरंगते धक्के, समुद्र जोडण्या इत्यादी किनारी प्रदेशाच्या लगतच्या सुविधा

b. सरंक्षण, सुरक्षा व मोक्याच्या प्रयोजनार्थ प्रकल्प

c. घोडेकाठी वरील रस्ते ; मात्र सद्य अस्तित्वातील भरतीरेषे पर्यंत अशा रस्त्यांच्या जमिनीकडील बाजूवर विकसन अनुज्ञेय करण्यासाठी अशा ( घोडेकाठी ) रस्त्यांवरून परवानगी प्राधिकृत असू नये
अशी तरतूद करण्यात येते की पुनर्प्रापित केलेल्या जमिनीचा उपयोग फक्त सार्वजनिक जलद अथवा बहुपर्यायी प्रवास प्रणाली, सदर प्रवास किंवा वाहतूक प्रणाली परीचालीत करण्यासाठी विद्युत किंवा इलेक्ट्रोनिक संकेत प्रणाली , अनुज्ञेय रचना असलेले प्रवास थांबे हयासह आवश्यक व संबंधित सार्वजनिक सुविधा व पायाभूत सुविधा उभारणे किंवा बांधणे प्रयोजनार्थ अनुज्ञेय असावा ; ह्यामध्ये कोणतेही औद्योगिक परिचालन,दुरुस्ती किंवा देखभाल समाविष्ट नाही.

d. धूप नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना

e. तटरक्षक दलासाठी जलमार्ग, वाहिन्या, बंदर व तरंगते धक्के यांची देखभाल व ते निर्बाध करणे

f. वाळूच्या बंधाऱ्यांना प्रतिबंध करण्यासाठी, लाटांची नियमन उपकरणे उभारणे, पावसाळी पाण्याच्या नलिका अंथरणे, किंवा खारेपणाचा शिरकाव प्रतिबंधित करण्यासाठी व गोड्या पाण्याच्या पुनार्भारणासाठी बांधकाम करणे

ii. बंदरे , लहान धक्के, धक्के, बोटीचे धक्के, गोदीतील लाकडी उतार, पूल, धूप नियंत्रण उपाय योजना , नलिका, दिप्गृहे, जलवाहतूक सुरक्षा सुविधा , किनारपट्टी पोलीस ठाणी, तटरक्षक दल ठाणे, आणि तत्सम किनारपट्टीलगतच्या सुविधा किंवा पाण्याशी संबंधित कार्ये

iii. अपारंपरिक उर्जा स्त्रोतांच्या द्वारे उर्जा व संबंधित सुविधा

iv. जहाजावरून बंदरावर , अंतिम स्थानके व शुद्धीकरण कारखान्यात त्याचप्रमाणे उलट दिशेने धोकादायक पदार्थांचे अंतरण करण्यासाठी

v. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयातील तेल उद्योग सुरक्षा संचालनालय व पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेल्या दिशानिर्देशांसहित सुरक्षा नियमावलीच्या अधीन राहून सदर अधिसूचनेच्या जोडपत्र II मध्ये विर्निर्दिष्ट केल्यानुसार पेट्रोलियम उत्पादने व द्रविकृत नैसर्गिक वायू प्राप्त करून साठवणूक करण्यासाठी सुविधा . अशी तरतूद करण्यात येते की अशा सुविधा खते व खतांसाठी आवश्यक अशा अमोनिया, फोस्फारिक आम्ल, गंधक, गांधाकीय आम्ल , नत्र आम्ल यासारखा कच्चा माल प्राप्त करून साठवणूक करण्यासाठी असाव्यात

vi. अधिसूचित बंदरात धोकादायक नसलेल्या खाद्यतेल, खते व अन्नधान्या सारख्या जहाजी मालाची साठवणूक

vii. उबवणी केंद्र व नैसर्गिक मत्स्य वाळवण

viii. खालील बाबींच्या अधीन राहून सद्य अस्तित्वातील मत्स्य प्रक्रिया केंद्रे आधुनिकीकरणाच्या ( अतिरिक्त उपकरणे व प्रदूषण नियंत्रण उपाययोजना ) प्रयोजनार्थ जोत्याच्या २५ % अतिरिक्त क्षेत्रफळाचा उपयोग करू शकतात

क. सदर पुनर्बांधकामाचा चटई क्षेत्र निर्देशांक हा अभिभावी नगर व ग्रामीण नियोजन विनियमांच्या नुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाच्या पेक्षा जास्त नसावा

ख. अतिरिक्त जोत्याचे बांधकाम हे जमिनीच्या दिशेने असावे.

ग. संबंधित राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण समिती याची मंजुरी असावी

ix. सांडपाणी व निसृत होणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्याची सुविधा व परिष्कृत पाणी वाहून नेण्यासाठी सुविधा

x. पावसाळी पाण्याची गटारे

xi. मोक्याचे व संरक्षणाशी संबंधित म्हणून वर्गीकृत केलेले प्रकल्प व भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाचे प्रकल्प

xii. आण्विक धातू संचालनालयाने संशोधन व सामान्वेषण प्रयोजनार्थ मंजुरी दिलेल्या खनिकर्म योजनेनुसार भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाने प्राधिकृत केलेल्या भरती व ओहोटी रेषेच्या दरम्यान विभागात आढळणाऱ्या एक किंवा अनेक खनिजांच्या किंवा खनिकर्म व खनिजे ( विकसन व नियमन ) अधिनियम १९५७ ( १९५७ चा ६७ ) च्या पहिल्या अनुसूची ब भागानुसार अधिसूचित केलेल्या आण्विक खनिजांचे हस्त खनिकर्म कार्य
अशी तरतूद करण्यात येते की भरती व ओहोटी रेषेच्या दरम्यान आढळून येणाऱ्या खनिज किंवा धातुकांचे संकलन करण्यासाठी गिरमीट व सुरुंग किंवा जड माती उपसा यंत्रांचा उपयोग किंवा पखरण न करता फावडे व टोपल्या यांचा उपयोग करणाऱ्या माणसांनी हाताने खनिकर्म परीचालीत करणे आवश्यक आहे.

xiii. तेल व नैसर्गिक वायू यांचे समन्वेषण व उद्खनन व त्याच्याशी संबंधित कार्ये व सुविधा

xiv. जशी बाब असेल त्यनुसार , पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या पर्यावरणीय मापदंडानुसार व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण समितीच्या संबंधित दिशानिर्देशा

नुसार, कच्च्या मालाची वाहतूक करण्यासाठी आवश्यक किनाऱ्यालगतच्या सुविधा , शीतल पाण्याच्या अंतर्ग्रहणासाठी सुविधा, पृथक्करण यंत्रसामग्रीसाठी पाण्याचे अंतर्ग्रहण इत्यादी व औष्णिक वीज केंद्रातील परिष्कृत केलेले सांडपाणी किंवा शितन करणाऱ्या पाण्याचा विग्रह

xv. नलिका व पारेषण तारांसह वहन प्रणाली

xvi. चक्रीवादळाचे अंदाज वर्तविण्यासाठी रडार , सागर निरीक्षण मंच, व संबंधित कार्ये

xvii. मिठागरे व संबंधित सुविधा ;

xviii. जलशुद्धीकरण प्रकल्प व संबंधित सुविधा

**५.२ किनारपट्टी विनियमन क्षेत्र( सी आर झेड II )**

i. सी आर झेड 1 B मधील सर्व अनुज्ञेय कार्ये जेवढी लागू असतील तेवढी सी आर झेड II सुद्धा अनुज्ञेय आहेत .

ii. रहिवास, शाळा, रुग्णालये, संस्था, कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे इत्यादी प्रयोजनार्थ इमारतींचे बांधकाम हे सद्य अस्तित्वातील रस्त्याच्या किंवा अस्तित्वातील अधिकृत स्थावर बांधकामाच्या जमिनीकडील बाजूला अनुज्ञेय असेल अशी तरतूद करण्यात येते की सद्य अस्तित्वातील रस्त्याच्या सागराकडील बाजूला बांधण्यात आलेल्या कोणत्याही नवीन रस्त्याच्या जमिनीकडील बाजूला इमारतींचे बांधकाम अनुज्ञेय असणार नाही

iii. उपरोक्त ( ii ) मधील अनुज्ञेय इमारती ह्या वेळोवेळी लागू असलेल्या स्थानिक नगर व ग्रामीण नियोजन विनियमांच्या व अधिसूचनेच्या दिनांकाच्या दिवशी अभिभावी चटई क्षेत्र निर्देशांक किंवा चटई क्षेत्र गुणोत्तराच्या अधीन असतील. सदर अधिसूचना राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या दिनांकानंतर चटई क्षेत्र निर्देशांकात दुरुस्ती करण्याची गरज भासल्यास स्थानिक नगर संस्था किंवा राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासनाने, जशी बाब असेल त्यानुसार संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या मार्फत पर्यावरण , वन व हवामान बदल मंत्रालयाला अभिगमित होऊन , आपल्या अभिप्रायासह राष्ट्रीय किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाला सदर प्रीत्यर्थ प्रस्ताव सादर करावेत. राष्ट्रीय किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने सार्वजनिक सुविधांची उपलब्धता, पर्यावरण संरक्षणाचे उपाय इत्यादी विविध पैलूंचे परीक्षण करून प्रस्तावावर उचित निर्णय करावा. त्या त्या घनकचरा व्यवस्थापन नियमानुसार घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची व अपरिष्कृत स्वरूपातील कोणताही कचरा हा किनाऱ्यावर किंवा किनाऱ्यावरील पाण्यात टाकला जाणार नाही, याची खबरदारी घेण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक नगर नियोजन प्राधिकरणाची असेल.

iv. वेळोवेळी लागू असलेल्या स्थानिक नगर व ग्रामीण नियोजन विनियमांच्या व अधिसूचनेच्या दिनांकाच्या दिवशी अभिभावी चटई क्षेत्र निर्देशांक किंवा चटई क्षेत्र गुणोत्तराच्या अधीन राहून जमिनीच्या उपयोगात बदल न करता अस्तित्वातील अधिकृत इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी परवानगी देण्यात येईल . सदर अधिसूचना राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या दिनांकानंतर चटई क्षेत्र निर्देशांकात दुरुस्ती करण्याची गरज भासल्यास स्थानिक नगर संस्था किंवा राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासनाने, जशी बाब असेल त्यानुसार संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या मार्फत पर्यावरण , वन व हवामान बदल मंत्रालयाला अभिगमित होऊन , आपल्या अभिप्रायासह राष्ट्रीय किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाला सदर प्रीत्यर्थ प्रस्ताव सादर करावेत. राष्ट्रीय किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने सार्वजनिक सुविधांची उपलब्धता, पर्यावरण संरक्षणाचे उपाय इत्यादी विविध पैलूंचे परीक्षण करून प्रस्तावावर उचित निर्णय करावा. त्या त्या घनकचरा व्यवस्थापन नियमानुसार घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची व अपरिष्कृत स्वरूपातील कोणताही कचरा हा किनाऱ्यावर किंवा किनाऱ्यावरील पाण्यात टाकला जाणार नाही, याची खबरदारी घेण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक नगर नियोजन प्राधिकरणाची असेल.

v. समुद्राकाठी निवारागृहे किंवा हॉटेल किंवा पर्यटन विकसन प्रकल्प प्रयोजनार्थ निर्धारित क्षेत्रातील मोकळ्या भूखंडांचे विकसन हे सदर अधिसूचनेच्या जोडपत्र – III मधी अटी किंवा दिशानिर्देशांच्या अधीन असेल.

vi. समुद्राकाठी तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील व त्यामध्ये खोपटी, प्रसाधनगृहे किंवा स्वच्छतागृहे, कपडे बदल सुविधा, तुषार वर्षावगृह, एकमेकांशी जोडलेल्या फरसबंदीचा वापर करून बांधलेले चलमार्ग, पिण्याच्या पाण्याची सुविधा, बैठक व्यवस्था इत्यादी तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील. मात्र विहित केलेली सल्ला मसलत किंवा सार्वजनिक सुनावणी प्रक्रियेचा अवलंब करून तयार करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट

पर्यटन नियोजनाच्या व पर्यावरणीय सुरक्षा उपायांच्या अधीन राहून सदर सुविधा अनुज्ञेय असतील. तसेच सदर सुविधा स्थापित करण्यासाठी भरती रेषेपासून १० मीटरचे किमान अंतर ठेवणे आवश्यक आहे.

**५.३ किनारपट्टी विनियमन क्षेत्र( सी आर झेड III )**

i. सी आर झेड 1 B मधील सर्व अनुज्ञेय कार्ये जेवढी लागू असतील तेवढी सी आर झेड III सुद्धा अनुज्ञेय आहेत .

ii. **ना विकास विभागातील कार्याचे विनियमन**

ना विकास विभागात खालील कार्ये अनुज्ञेय व विनियमित असतील

क. विद्यमान चटई क्षेत्र निर्देशांक, जोते क्षेत्रफळ, घनता ह्या पेक्षा अधिक नसलेल्या अधिकृत बांधकामांची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी, तसेच सदर अधिसूचनेनुसार अनुज्ञेय कार्ये व त्याप्रीत्यर्थ आवश्यक सुविधा, मत्स्य व्यावसायिकांच्या सह किनारपट्टीवरील पारंपारिक समुदायांच्या रहिवासी गाळयांचे बांधकाम किंवा पुनर्बांधकाम ह्यामध्ये आपत्ती व्यवस्थापनाच्या आवश्यक तरतुदी व स्वच्छता सुविधा समाविष्ट करून दिलेल्या मंजुरी वगळता, सी आर झेड III मधील ना विकास विभागात कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यात येऊ नये.

ख. शेती, फलोद्यान, उद्याने, गायरान, उद्याने, क्रीडांगणे, व वनीकरण

ग. दवाखाने, शाळा, पावसापासून सार्वजनिक निवारा, सामुदायिक स्वच्छतागृहे, पूल , रस्ते, पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक सुविधांची तरतूद, सांडपाणी विल्हेवाट, दहनभूमी, दफनभूमी, किनारपट्टी व विद्यत उपकेंद्र ह्याच्या बांधकामास स्थानिक रहिवाशांच्या आवश्यकतेनुसार किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने बाबवार परवानगी द्यावी

घ. संबंधित प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा समितीच्या पूर्व परवानगीने घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट ह्यासाठी आवश्यक बांधकामास किंवा अनुषंगिक कामांना परवानगी द्यावी .

ङ. स्थानिक मत्स्य व्यावसायिकांसाठी आवश्यक अशा मासे वाळवण आवार , लिलाव सभागृहे, जाळे दुरुस्ती आवार, पारंपारिक होडी बांधणी आवार, बर्फगृह, मत्स्य प्रक्रिया सुविधा व तत्सम सुविधा

च. सी आर झेड III मधील ना विकास विभागाच्या ज्या भागातून राष्ट्रीय किंवा राज्य महामार्ग जात असेल, तिथे रस्त्याच्या समुद्राकडील बाजूला स्वच्छतागृहे, कपडे बदलण्याच्या सुविधा , पिण्याच्या पाण्याच्या सुविधा व तात्पुरती खोपटे अशा तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय आहेत.

छ. ना विकास विभागातील अशा रस्त्यांच्या जमिनीकडील बाजूस विश्रामगृहे किंवा हॉटेल व संबंधित पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील . मात्र सदर अधिसूचनेनुसार मंजूर किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट पर्यटन योजना व सोबत जोडलेल्या जोडपत्र III मधील अटी किंवा दिशानिर्देशांच्या अधीन राहूनच सदर कार्ये अनुज्ञेय आहेत.

ज. ना विकास विभागात व सी आर झेड III मधी समुद्राकाठी तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील व त्यामध्ये खोपटी, प्रसाधनगृहे किंवा स्वच्छतागृहे, कपडे बदल सुविधा, तुषार वर्षावगृह, एकमेकांशी जोडलेल्या फरसबंदीचा वापर करून बांधलेले चलमार्ग, पिण्याच्या पाण्याची सुविधा, बैठक व्यवस्था इत्यादी तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील. मात्र विहित केलेली सल्ला मसलत किंवा सार्वजनिक सुनावणी प्रक्रियेचा अवलंब करून तयार करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट पर्यटन नियोजनाच्या व पर्यावरणीय सुरक्षा उपायांच्या अधीन राहून सदर सुविधा अनुज्ञेय असतील. तसेच सदर सुविधा स्थापित करण्यासाठी भरती रेषेपासून १० मीटरचे किमान अंतर ठेवणे आवश्यक आहे

झ. आण्विक धातू संचालनालयाने संशोधन व सामान्वेषण प्रयोजनार्थ मंजुरी दिलेल्या खनिकर्म योजनेनुसार भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाने प्राधिकृत केलेल्या भरती व ओहोटी रेषेच्या दरम्यान विभागात आढळणाऱ्या एक किंवा अनेक खनिजांच्या किंवा खनिकर्म व खनिजे ( विकसन व नियमन ) अधिनियम १९५७ ( १९५७ चा ६७ ) च्या पहिल्या अनुसूची ब भागानुसार अधिसूचित केलेल्या आण्विक खनिजांचे हस्त खनिकर्म कार्य

iii. सी आर झेड III ना विकास विभागाच्या पलीकडे कार्याचे विनियमन

क. सदर अधिसूचनेच्या सोबत जोडलेल्या जोडपत्र III मधील अटी किंवा दिशानिर्देशांच्या अधीन राहून निदेशित विभागातील रिकाम्या भूखंडांचे समुद्राकाठी विश्रामगृहे किंवा हॉटेल किंवा पर्यटन विकसन प्रकल्पांच्या बांधकामासाठी विकसन प्रयोजनास परवानगी असेल.

ख. सद्य अस्तित्वातील मत्स्य गावातील पारंपारीक अधिकार व उपयोगात असलेल्या रहिवासी गाळयांची बांधणी किंवा पुनर्बांधणीसाठीची परवानगी ही बांधकामाच्या ९ मीटर उंची पर्यंत व ( तळ मजला + पहिला मजल ) अशा दोन मजल्यांसाठी व नगर तसेच गाव नियोजन नियमांच्या अधीन असेल.

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

ग. सद्य अस्तित्वातील जोत्याच्या किंवा रचनेच्या क्षेत्रफळात  किंवा दर्शनी भागात बदल न करता " घरगुती मुक्कामाची " पर्यटन सुविधा देण्यास मत्स्य व्यावसायिकांच्या सहित सर्व स्थानिक समुदायांना परवानगी देण्यात यावी

घ. सार्वजनिक पाउस निवारे, सामुदायिक स्वच्छतागृहे, पाणी पुरवठा, सांडपाणी नलिका, रस्ते, पूल इत्यादींची बांधकामे

ङ. चुनखडीचे खनिकर्म :

च. चुनखडी खनिजांचे उद्खनन  भरतीरेषेच्या १ मीटर उंचीच्या खाली केली जाणार नाही व खारे पाणी न घुसण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना म्हणून बांध घालण्यात येईल तसेच किनारपट्टीवरील पाण्याचे प्रदूषण  व किनारपट्टीची धूप रोखण्यासाठी सुरक्षिततेच्या योग्य उपाययोजना करण्याच्या अधीन राहून व वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद , केंद्रीय खनिकर्म संशोधन संस्था इत्यादीं खनिकर्म क्षेत्रातील नामवंत राष्ट्रीय संस्थांनी केलेल्या शिफारशींच्या आधारे विशिष्ट निर्धारित क्षेत्रांमध्ये चुनखडी खानिजाच्या निवडक खानिकर्मास परवानगी देण्यात यावी.

iv. भरतीच्या रेषेपासून २०० मीटर्सच्या आत स्थानिक समुदायांनी वस्ती केलेले  क्षेत्र वगळता अन्यत्र भूजलाचा उपसा करण्यास किंवा तत्संबंधीच्या बांधकामास प्रतिबंध करण्यात येईल. तसेच जिथे पाण्याचा कुठलाही स्त्रोत उपलब्ध नसेल तिथे भरतीच्या रेषेपासून २०० ते ५०० मीटर्स पर्यंत हाती साधनांनी खुल्या विहिरीतून पेयजल, फळबागा, शेती , मासेमारी इत्यादी प्रयोजनार्थ भूजलाचा उपसा अनुज्ञेय करावा . तसेच समुद्राचे पाणी घुसल्यामुळे प्रभाविंत झालेल्या भागात राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेशांनी प्राधिकृत केलेल्या प्रधीकरणाने अशा उपश्यासाठी निर्बंध घालावेत. मात्र फलोद्यान, शेती व राज्य शासनाने पुरस्कृत केलेल्या सूक्ष्म सिंचन योजनांना भूजलाचा उपसा अनुज्ञेय करण्यात यावा.

v. सी आर झेड III क्षेत्रामध्ये पर्याप्त पर्यावरणीय सुरक्षा उपायांसह पडीक व शेतीस योग्य नसलेल्या जमिनींवर विमानतळाचे विकसन

**५.४ किनारपट्टी विनियमन क्षेत्र( सी आर झेड IV )**

सी आर झेड IV मध्ये खालील कार्ये अनुज्ञेय व विनियमित असतील :

i. स्थानिक समुदायांनी हाती घेतलेली  पारंपारिक मासेमारी व सलंग्न कार्ये

ii. फक्त खालील प्रकारच्या कार्यासाठीच भूमी पुनर्प्रापण , बांधबंदिस्ती इत्यादीसाठी परवानगी देण्यात येईल

क. बंदरे ,  लहान धक्के, धक्के, बोटीचे धक्के, गोदीतील लाकडी उतार, पूल, तटरक्षक दलासाठी तरंगते धक्के, समुद्र जोडण्या इत्यादी किनारी प्रदेशाच्या लगतच्या सुविधा

ख. सरंक्षण, सुरक्षा व मोक्याच्या प्रयोजनार्थ प्रकल्प

ग. धूप नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना

घ. जलमार्ग, वाहिन्या, बंदर व  तरंगते धक्के यांची देखभाल व  ते निर्बाध करणे

ङ. वाळूच्या बंधाऱ्यांना प्रतिबंध करण्यासाठी,  लाटांची नियमन उपकरणे उभारणे, पावसाळी पाण्याच्या नलिका अंथरणे, किंवा खारेपणाचा शिरकाव प्रतिबंधित करण्यासाठी व गोड्या पाण्याच्या पुनार्भारणासाठी बांधकाम करणे

iii. बंदरे ,  लहान धक्के, धक्के, बोटीचे धक्के, गोदीतील लाकडी उतार, पूल, धूप नियंत्रण उपाय योजना , नलिका, दिप्गृहे, जलवाहतूक सुरक्षा सुविधा , किनारपट्टी पोलीस ठाणी, तटरक्षक दल ठाणे, आणि तत्सम किनारपट्टीलगतच्या सुविधा किंवा पाण्याशी संबंधित कार्ये

iv. समुद्री वारे, लाटा, सागरी औष्णिक उर्जेचे रूपांतरण इत्यादी अपारंपरिक उर्जा स्त्रोतांच्या द्वारे उर्जा व संबंधित सुविधा

v. जहाजावरून बंदरावर धोकादायक पदार्थांचे अंतरण करण्यासाठी

vi. अधिसूचित बंदरात धोकादायक नसलेल्या खाद्यतेल, खते व अन्नधान्या सारख्या जहाजी मालाची साठवणूक

vii. सांडपाणी व निसृत होणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्याची सुविधा व परिष्कृत पाणी वाहून नेण्यासाठी सुविधा

viii. मोक्याचे व संरक्षणाशी संबंधित म्हणून वर्गीकृत केलेले प्रकल्प व भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाचे प्रकल्प

ix. अणुउर्जा विभागाचे प्रकल्प

x. तेल व नैसर्गिक वायू यांचे समन्वेषण व उद्खनन व त्याच्याशी संबंधित कार्ये व सुविधा

xi. आण्विक धातू संचालनालयाने संशोधन व सामान्वेषण प्रयोजनार्थ मंजुरी दिलेल्या खनिकर्म योजनेनुसार भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाने  प्राधिकृत केलेल्या भरती व ओहोटी रेषेच्या दरम्यान  विभागात आढळणाऱ्या एक किंवा अनेक

खनिजांच्या किंवा खनिकर्म व खनिजे ( विकसन व नियमन ) अधिनियम १९५७ ( १९५७ चा ६७ ) च्या पहिल्या अनुसूची ब भागानुसार अधिसूचित केलेल्या आण्विक खनिजांचे हस्त खनिकर्म कार्य

xii. जशी बाब असेल त्यनुसार , पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या पर्यावरणीय मापदंडानुसार व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण समितीच्या संबंधित दिशानिर्देशा नुसार, कच्च्या मालाची वाहतूक करण्यासाठी आवश्यक किनाऱ्यालगतच्या सुविधा , शीतल पाण्याच्या अंतर्ग्राहणासाठी सुविधा, पृथक्करण यंत्रसामग्रीसाठी पाण्याचे अंतर्ग्रहण इत्यादी व औष्णिक वीज केंद्रातील परिष्कृत केलेले सांडपाणी किंवा शितन करणाऱ्या पाण्याचा विग्रह

xiii. नलिका व पारेषण तारांसह वहन प्रणाली

xiv. चक्रीवादळाचे अंदाज वर्तविण्यासाठी रडार , सागर निरीक्षण मंच, व संबंधित कार्ये

xv. खालील तरतुदींच्या अधीन राहून व पर्याप्त पर्यावरणीय खबरदारी घेऊन अपवादात्मक बाबतीत संबंधित राज्य शासनाकडून सी आर झेड IV मध्ये स्मारके किंवा स्मृतीस्थळे आणि अनुषंगिक सुविधांचे बांधकाम

क. पर्यावरणीय परामुल्यासह विविध परामुल्यांवरील पासंग साचा तसेच विचार झालेल्या पर्यायी स्थळांच्या तपशिलासहसी आर झेड IV मध्ये प्रकल्पाचे ठिकाण निर्धारित करण्याबाबतचे समर्थनीय कारण संबंधित राज्य सरकारने संबंधित राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरणाला सादर करावे. सदर प्राधिकरण प्रकल्पाचा अभ्यास करून केंद्र शासनाच्या पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाला राज्य शासनाने पर्यावरणीय आघात मूल्यमापन अहवाल तयार करण्याच्या प्रीत्यर्थ संदर्भ अटींच्या मंजुरीसाठी शिफारस करेल.

ख. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या पर्यावरणीय आघात मूल्यमापनाविषयीच्या अधिसूचना क्रमांक विशेष आदेश १५३ ( इ ) मध्ये विहित केलेल्या प्रक्रियेनुसार केंद्र शासनाकडून संदर्भ अटींची मंजुरी आल्यानंतर राज्य शासन प्रकल्पाच्या अनुषंगाने सार्वजनिक सुनावणी संचालित करण्यासाठी , पर्यावरण व्यवस्थापन योजना, प्रत्यक्ष ठिकाणी ( on site ) आणि ऑफ साईट आपत्कालीन निर्वासन योजना समाविष्ट असलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेसह जोखीम मूल्यमापन अहवाल यासह पर्यावरणीय आघात मूल्यमापन अहवाल राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर करेल.

ग. उप परिच्छेद मधील संदर्भित सार्वजनिक सुनावणीत लोकांनी उपस्थित केलेल्या संबंधित मुद्द्यांचे निराकरण केल्यावर संबंधित राज्य शासन , पर्यावरण व्यवस्थापन योजना, प्रत्यक्ष ठिकाणी ( on site ) आणि ऑफ साईट आपत्कालीन निर्वासन योजना समाविष्ट असलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेसह जोखीम मूल्यमापन अहवाल यासह पर्यावरणीय आघात मूल्यमापन अंतिम अहवाल राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अभ्यासार्थ व केंद्र शासनाच्या पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाला शिफारस करण्यासाठी सादर करेल.

घ. प्रकल्पामुळे लोकांचे पुनर्वसन किंवा पुनर्वसाहन होण्याचा संबंध नाही किंवा प्रकल्पाचे ठिकाण मानवी वस्तीपासून दूर असल्याची केंद्र शासनाच्या पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाची खात्री पटल्यास , उप परिच्छेद ( ब) मध्ये उल्लेखित सार्वजनिक सुनावणीच्या बाबतीत केंद्र शासन सूट देऊ शकते.

**५.५ अणुउर्जा विभागाच्या प्रतिष्ठापनापासून निपटारयाची आवश्यकता**

अणुउर्जा नियमन मंडळाच्या दिशानिर्देशानुसार विनिर्दीष्टीत हद्दीच्या मर्यादेत नवीन बांधकामांच्या सहित कुठलेही विकासानात्मक कार्य हाती घेण्यापूर्वी, अणुउर्जा विभागाच्या प्रतिष्ठापनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

**६. किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजना**

i. दिनांक ६ जानेवारी २०११ रोजीच्या किनारपट्टी नियमन क्षेत्रअधिसूचना क्रमांक विशेष आदेश क्रमांक १९ ( इ ) मधील तरतुदी नुसार तयार केलेल्या किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेमध्ये सर्व किनारपट्टीवरील राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना सदर अधिसूचनेनुसार बदल अथवा अद्ययावत करून लवकरात लवकर केंद्र शासनाच्या पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाच्या मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्प कार्यांना सदर अधिसूचनेतील तरतुदी लागू असतील त्यांचे सुद्धा सदर अधिसूचनेच्या अंतर्गत अद्ययावत किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेनुसार आगणन करणे आवश्यक आहे. किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजना जोपर्यंत सदर अधिसूचनेनुसार बदल वा अद्यायावत होत नाही , तोवर सन २०११ च्या किनारपट्टी नियमन क्षेत्रअधिसूचनेनुसार तयार केलेल्या किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन

योजनेतील तरतुदी अशा प्रकल्प कार्यांच्या आगणन व किनारपट्टी नियमन विभागाच्या निपटारा प्रमाणपत्रासाठी लागू राहतील.

ii. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्रासहित अन्य नामवंत व अनुभवी वैज्ञानिक संस्थांचे साहाय्य घेऊन व संबंधित हितसंबंधीयांशी सल्लामसलत करून किनारपट्टीवरील राज्यांनी व केंद्रशासित प्रदेशांनी आपापले किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजना तयार किंवा अद्ययावत कराव्यात .

iii. किनारपट्टीवरील राज्ये व केंद्रशासित प्रदेश हे १ : १२५००० ह्या प्रमाणात किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेच मसुदा तयार करतील व सदर अधिसूचनेच्या जोडपत्र IV मधील दिशानिर्देशानुसार त्यांच्या अधिपत्याच्या खालील प्रदेशातील किनारपट्टी नियमन विभागांचे निर्धारण व वर्गवारी करावी. ह्यासाठी सार्वजनिक सुनावणी समाविष्ट आहे.

iv. पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) मधील विहित प्रक्रियेनुसार राज्य शासन व केंद्रशासित प्रदेशांनी उचित सल्ला मसलती व शिफारशीसहसदर अद्ययावत किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजना संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाला मुल्यामापनार्थ सादर करावी.

v. त्यानंतर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय संबंधित राज्य शासने किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेच विचार करून त्यास मान्यता देईल.

vi. सर्वसामान्यपणे किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेत पाच वर्षांच्या कालावधी पर्यंत दुरुस्ती करण्यात येऊ नये. त्यानंतर संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेत सुधारणा करण्याचा विचार करावा.

७. **अनुज्ञेय व विनियमित कार्यांसाठी किनारपट्टी विनियमन क्षेत्रपरवानगी –प्रत्यायोजन**

i. सदर अधिसूचनेतील तरतुदी ज्या अनुज्ञेय किंवा विनियमित प्रकल्प कार्यांना लागू होतात, त्या सुरु करण्यापूर्वी किनारपट्टी विनियमन क्षेत्रसमाशोधन प्राप्त करणे आवश्यक आहे.

ii. सी आर झेड I व सी आर झेड IV मधील जी विकासात्मक कार्ये किंवा प्रकल्प सदर अधिसूचनेतील तरतुदी ज्या अनुज्ञेय किंवा विनियमित आहेत, त्यांच्या किनारपट्टी विनियमन क्षेत्रसमाशोधनाच्या बाबतीत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीच्या आधारे कार्यवाही करेल.

iii. सदर अधिसूचनेनुसार जी अनुज्ञेय व विनियमित कार्ये पूर्णपणे सी आर झेड II व सी आर झेड III मध्ये मोडतात, तेथील समाशोधनाचा विचार संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण करेल . तसेच सदर प्रकल्प हे सी आर झेड I किंवा सी आर झेड IV किंवा त्या दोन्ही विभागातून पार होत असतील, तर त्यांच्या किनारपट्टी विनियमन क्षेत्रसमाशोधनाच्या बाबतीत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीच्या आधारे कार्यवाही करेल.

iv. ज्या प्रकल्प किंवा कार्यांना सदर तसेच दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ) अन्वये जारी पर्यावरणीय आघात मुल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदी लागू होतात, त्यांचा अधिकारांच्या प्रत्यायोजनानुसार ( म्हणजेच " ब " वर्गवारीतील प्रकल्पांसाठी राज्य पर्यावरणीय आघात मूल्यमापन प्राधिकरण , किंवा अ वर्गवारीतील प्रकल्पांसाठीपर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय ) व संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशींच्या आधारे संबंधित मंजुरी प्राधिकरण , पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ अंतर्गत संयुक्त पर्यावरणीय व किनारपट्टी विनियमान क्षेत्रपरवानगीसाठी विचार करेल.

v. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदींच्या अंतर्गत विहित किमान मर्यादेपेक्षा कमी बांधीव क्षेत्रफळाच्या इमारत किंवा बांधकाम प्रकल्पांच्या बाबतीत, संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशी प्राप्त झाल्यावर संबंधित राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशातील नियोजन प्राधिकरणे सदर अधिसूचनेनुसार मान्यता देतील

vi. ३०० वर्ग मीटर पर्यंतच्या एकूण बांधीव क्षेत्रफळाच्या स्वनिवासी गाळयांना, संबंधित नियोजन प्राधिकरण संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशी शिवाय मान्यता प्रदान करतील. मात्र मान्यता प्रदान करण्यापूर्वी सदर प्राधिकरण सादर प्रस्तावाचा किनारपट्टी विनियमन क्षेत्रअधिसूचनेच्या दृष्टीकोनातून अभ्यास करेल.

**८. अनुज्ञेय व विनियमित कार्यांसाठी किनारपट्टी विनियमन क्षेत्रसमाशोधन प्राप्त करण्याची प्रक्रिया :**

i. प्रकल्पाच्या प्रस्तावकांनी खालील दस्तैवजांच्यासह संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाकडे पूर्व परवानगी प्राप्त करण्यासाठी अर्ज करावा

क. सदर अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ट V नुसार प्रकल्पाच्या सारांशाचा तपशील

ख. इमारत बांधकाम प्रकल्प किंवा गृहबांधणी योजना वगळता, जे लागू असेल त्यानुसार सागरी व भौमिक घटकांच्या सह जलद पर्यावरण आघात मूल्यमापन अहवाल

ग. सदर अधिसूचनेनुसारच्या किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेनुसार (दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजी च्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ ) नुसार जारी पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदी लागू होण्यासाठी विहित किमान मर्यादेपेक्षा कमी बांधीव क्षेत्रफळाचे इमारत बांधणी किंवा गृहबांधणी प्रकल्प वगळून ) कमी व मध्यम धूप होणाऱ्या पट्ट्यातील प्रकल्पांसाठी पुष्टीदायक अभ्यासासहित सर्वसमावेशक पर्यावरणीय आघात मूल्यमापन

घ. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजी च्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ ) नुसार जारी पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदी लागू होण्यासाठी विहित किमान मर्यादेपेक्षा कमी बांधीव क्षेत्रफळाचे इमारत बांधणी किंवा गृहबांधणी प्रकल्प वगळून इतर प्रकल्पांसाठी जोखीम मूल्यमापन अहवाल व आपत्ती व्यवस्थापन योजना

ङ. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने दिनांक १४ मार्च २०१४ रोजीच्या कार्यालयीन आदेश क्रमांक ज – १७०११ / ८ / ९२ – I अ – III नुसार निर्धारित केलेल्या अभिकरणाने , राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने आखलेल्या भरती किंवा ओहोटी रेषेचा उपयोग करून १ : ४००० प्रमाणात काढलेला किनारपट्टी विनियमन क्षेत्रनकाशा

च. सदर अधिसूचनेनुसार मान्यताप्राप्त किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेनुसार प्रकल्पाच्या ठिकाणची किनारपट्टी विनियमन क्षेत्रवर्गवारी व प्रकल्पाच्या सीमा रीतसर दर्शविणारा किनारपट्टी विनियमन क्षेत्रनकाशावर अध्यारोपित केलेला प्रकल्प आराखडा

छ. प्रकल्पस्थळाच्या सभोवताली ७ किलोमीटरच्या त्रिज्येचा किनारपट्टी विनियमन विभागाचा नकाशा. सदर नकाशात सी आर झेड I, II, III व IV क्षेत्रे तसेच अन्य अधिसूचित पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रदर्शविलेले असावेत

ज. औद्योगिक सांडपाणी व निसृत पदार्थांचे प्रक्रिया केलेले स्त्राव विमोचीत करणाऱ्या प्रकल्पांच्या बाबतीत संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र किंवा " स्थापित करण्याची संमती " आणि जर संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाची पूर्वानुमती प्राप्त न केल्यास, सदर अधिसूचनेनुसार परवानगी प्राप्त केल्यावर बांधकामाचे कार्य सुरु करण्याच्या अगोदर प्रस्तावकाने ते प्राप्त करणे आवश्यक आहे.

ii. संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यावस्थापन प्राधिकरण हे सदर अधिसूचनेच्या पूर्ततेप्रीत्यर्थ मान्यताप्राप्त किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन योजनेनुसार उपरोक्त परिच्छेद ( i ) मधील दस्तैवजांचा अभ्यास करेल व संपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून ६० दिवसांच्या आत खालील प्रमाणे शिफारशी करेल

क. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ ) नुसार जारी केलेल्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचनेतील तरतुदी लागू होणाऱ्या प्रकल्प किंवा कार्यांच्या बाबतीत, दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ ) नुसार जारी केलेल्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार संयुक्त परवानगी देण्यासाठी किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने अ वर्गातील प्रकल्पांसाठी पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाकडे व ब वर्गातील प्रकल्पांसाठी राज्य पर्यावरणीय आघात मुल्यामापन प्राधिकरणाला शिफारशी अग्रेषित कराव्यात. मात्र सी आर झेड I किंवा IV मधील ब वर्गाच्या प्रकल्पांच्या बाबतीत, पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय किनारपट्टी क्षेत्रविनियमनासाठीची अंतिम शिफारस संबंधित राज्य पर्यावरणीय आघात मुल्यामापन प्राधिकरणाला करेल, जेणे करून ते प्रस्तावाला पर्यावरणीय व किनारपट्टी क्षेत्रविनियमांची संयुक्त परवानगी देऊ शकतील.

ख. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या जारी केलेल्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचनेतील निकष लागू न न होणाऱ्या परंतु सदर अधिसुचानेतील निकष लागू होणाऱ्या व सी आर झेड I किंवा IV मध्ये स्थित प्रकल्प किंवा कार्यांच्या बाबतीत किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने आपल्या शिफारशी पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाकडे अग्रेषित कराव्यात.

ग. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या जारी केलेल्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचनेतील निकष लागू न न होणाऱ्या परंतु सदर अधिसुचानेतील निकष लागू होणाऱ्या व सी आर झेड II किंवा III मध्ये स्थित प्रकल्प किंवा कार्यांच्या बाबतीत, प्रस्तावाकाकडून संपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून ६० दिवसांच्या आत संबंधित किनारपट्टी क्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण सदर प्रकल्पांचा विचार करेल.

घ. सदर अधिसुचानेतील तरतुदी लागू होणाऱ्या परंतु उपरोक्त पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदीनुसार किमान मर्यादेपेक्षा कमी बांधीव क्षेत्रफळ असणाऱ्या बांधकामांच्या बाबतीत किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण आपल्या शिफारशी संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या नियोजन प्राधिकरणाला अग्रेषित करेल , जेणे करून सदर प्राधिकरणाला मान्यता प्रदान करणे शक्य होईल.

iii. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीवर आधारित सदर अधिसूचनेच्या अंतर्गत परवानगी साठी प्राप्त झालेल्या सर्व प्रकल्प प्रस्तावांवर पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाकडून ६० दिवसांच्या आत विचार करण्यात येईल.

iv. पुनर्गठन किंवा अन्य काही कारणाने किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण कार्यरत नसल्यास, सदर अधिसूचनेच्या तरतुदीनुसार प्रस्तावांची शिफारस व त्यावर टिप्पणी सादर करण्याची जबाबदारी त्या त्या राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेचे अभिरक्षक असलेल्या पर्यावरण विभागाची असेल

v. सदर अधिसूचनेच्या अंतर्गत प्रकल्पांना दिलेली परवानगी सात वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल. मात्र सदर परवानगी जारी झाल्याच्या दिनांकानंतर सात वर्षांच्या कालावधीत सर्व बांधकाम कार्ये पूर्ण होऊन प्रकल्पाचे परिचालन सुरु होणे आवश्यक आहे.

vi. परवानगी प्राप्त झाल्यवर संनियंत्रण

क. प्रत्येक दिनदर्शिका वर्षाच्या दिनांक ३० जून व ३१ डिसेंबर रोजी, पर्यावरणीय परवानगीमधील विहित अटी व शर्ती यांच्या अनुपालनाचे सहामाही अहवाल सोफ्ट व छापील स्वरुपात सादर करणे प्रकल्प प्रस्तावाकांना बंधनकारक आहे. तसेच प्रकल्प प्रस्तावाकाने सदर अनुपालन अहवाल हे सार्वजनिक व्यासपीठावर प्रकाशित करून त्याची प्रत किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाकडे अर्ज करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला उपलब्ध असली पाहिजे.

ख. अनुपालन अहवाल संबंधित विनिमन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आला पाहिजे.

vii. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या कामात पारदर्शकता राहण्यासाठी , एक अनन्य संकेतस्थळ निर्माण करून त्यावर विषयपत्रिका, वृत्तांत, घेतलेले निर्णय, परवानगी पत्रे, उल्लंघन व त्यवर केलेली कार्यवाही , माननीय न्यायालयाच्या निर्णयासहित सर्व न्यायालयीन बाबींची माहिती , संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाची मान्यताप्राप्त किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना सदर संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आली पाहिजे.

**९. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी**

i. सदर अधिसूचनेतील तरतुदींची अंमलबजावणी व कार्यान्वयन व त्यांतर्गत विहित अटी व शर्तींचे अनुपालन प्रयोजनार्थ, पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) नुसार पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेश, राष्ट्रीय किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण आणि राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाकडे मूळ किंवा प्रत्यायोजित अधिकार उपलब्ध आहेत.

ii. रिट याचीका क्रमांक ६६४ / १९९३ मधील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने राष्ट्रीय किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण आणि राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या रचना, कालावधी, व अधिकारक्षेत्र अधिसूचित केले आहे.

iii. राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेशाची किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण हे सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणी व संनियंत्रण यासाठी मुख्यत्वे जबाबदार असतील व सदर कार्यात साहाय्य करण्यासाठी संबंधित राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेश जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय समित्या नेमतील. सदर समितीत मच्छिमार सहित स्थानिक परंपरागत समुदायातील किमान तीन प्रतिनिधी असतील व सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणीचा विचार थेट जिल्हा दंडाधिकारी स्तरावर करण्याचा विचार राज्य शासनाने करावा.

iv. दिनांक ६ जानेवारी २०११ रोजी विशेष आदेश क्रमांक १९ ( इ ) अन्वये जारी केलेल्या किनारपट्टी विनियमन विभाग अधिसूचनेनुसार , मच्छिमार व आदिवासीच्या सह किनारपट्टी वरील पारंपारिक समुदायांच्या अनुज्ञेय राहत्या घरांसाठी सदर अधिसूचनेनुसार संबंधित प्राधिकरणाकडून मान्यता प्राप्त केली नसल्यास त्या त्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने खालील अटींच्या अधीन राहून संबंधित राहती घरे नियमित करावीत

a. त्यांचा व्यावसायिक प्रयोजनार्थ उपयोग होऊ नये ;

b. किनारपट्टी वरील बिगर पारंपारिक समुदायांना ते अंतरित होऊ नयेत.

**१०. विशेष विचार आवश्यक असलेले विभाग**

**१०.१ गंभीररित्या असुरक्षित किनारपट्टी क्षेत्रे**

i. उप परिच्छेद ३.१ मधील नमूद सर्व गंभीररित्या असुरक्षित किनारपट्टी क्षेत्रात एकीकृत व्यवस्थापन योजना तयार करताना त्यामध्ये खारफुटी वनांचे संवर्धन व व्यवस्थापन , स्थानिक समुदायांच्या दवाखाने, शाळा, सार्वजनिक वर्षा निवारे, सामुदायिक स्वच्छतागृहे, पूल , रस्ते, छोटे धक्के, पाणी पुरवठा, सांडपाणी अशा विविध गरजा व वाढत्या समुद्र पातळीचा प्रभाव व अन्य नैसर्गिक आपत्तींचा विचार व्हावा. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना तयार करण्याच्या दिशानिर्देशांच्या धर्तीवरच एकीकृत व्यवस्थापन योजना तयार करण्यात येईल.

ii. सदर एकीकृत व्यवस्थापन योजनेस मान्यता प्राप्त होऊन अधिसूचित होईपर्यत किनारपट्टी विभाग व्यवस्थापन प्राधिकरणाने मच्छिमारांच्या सहित किनारपट्टीवरील पारंपारिक समुदायांच्या गरजांचा योग्य विचार करून दवाखाने, शाळा, सार्वजनिक वर्षा निवारे, सामुदायिक स्वच्छतागृहे, पूल , रस्ते, छोटे धक्के, पाणी पुरवठा, सांडपाणी अशा त्यांच्या विविध गरजा बाबवार अनुज्ञेय कराव्यात.

**१०.२ अंतर्भागातील पश्चजल बेटे व मुख्य भूमीच्या बाजूकडील बेतांसाठी किनारपट्टी विनियमन विभाग**

i. अंतर्भागातील सर्व पश्चजल बेटे व मुख्य भूमीच्या बाजूकडील सर्व बेटे सदर अधिसूचनेत समाविष्ट असतील.

ii. सदर साठी पश्चजल बेटे व मुख्य भूमीच्या बाजूकडील सर्व बेटे यांच्या अनन्य किनारपट्टी प्रणालीचा आणि अशा पट्ट्यातील जागेच्या मर्यादांचा विचार करून, सदर बेटांच्या बाबतीत जमिनीकडील बाजूला भरती रेषेपासून २० मीटरचा किनारपट्टी विनियमन विभाग एकसारखेपणे लागू होईल व कार्याचे खालील प्रमाणे विनियमन करण्यात येईल

a. सदर बेटांच्या भरती रेषेपासून २० मीटर अंतरातील स्थानिक समुदायांची सद्य अस्तित्वातील राहत्या घरांची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्यात यावी, मात्र सदर विभागात कोणतेही नवीन बांधकाम अनुज्ञेय असणार नाही.

b. विहित पर्यावरणीय सुरक्षा उपायांचा अवलंब करून मासेमारीसाठी छोटे धक्के, मासे वाळवण आवार, जाळी दुरुस्ती आवार, पारंपारिक पद्धतीने मत्स्य प्रक्रिया, नाव बांधण्याचे आवार, नाव दुरुस्ती, बर्फ प्रकल्प, व तत्सम किनारपट्टी लगतच्या भागातील कार्ये किनारपट्टी विनियमन क्षेत्रात हाती घ्यावीत.

iii. दिनांक ६ जानेवारी २०११ रोजी विशेष आदेश क्रमांक २० ( इ) नुसार जारी बेट संरक्षण विभाग अधिसूचना २०११ नुसार छोट्या बेटांना लागू होणारे एकीकृत बेट व्यवस्थापन योजना ह्या संबंधित राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांकडून सर्व बेटांसाठी तयार करून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाला सादर करण्यात येईल. सदर एकीकृत बेट व्यवस्थापन योजना तयार होईपर्यंत सदर अधिसुचानेतील तरतुदी लागू न होता दिनांक ६ जानेवारी २०११ रोजी विशेष आदेश क्रमांक २० ( इ) नुसार जारी बेट संरक्षण विभाग अधिसूचना २०११ मधील तरतुदी लागू राहतील.

**१०.३ बृहन्मुंबईच्या महानगरपालिका हद्दीतील किनारपट्टी विनियमन विभाग**

i. बृहन्मुंबईतील हिरव्या फुफ्फुसाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सी आर झेड III मधील विकास योजनेत दर्शविएल्य सर्व मोकळया जागा, उद्याने, बगीचे , क्रीडांगणे, यांची ना विकास क्षेत्र म्हणून वर्गवारी करण्यात येईल व तिथे फक्त नागरी सुविधा, मैदान, आणि मनोरंजन किंवा खेळांशी संबंधित कार्यांसाठी व्यायामशाळा यांची बांधकामे करण्यासाठी १५ % पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील व सदर मोकळया जागांचा निवासी अथवा व्यापारी वापर अनुज्ञेय असणार नाही

ii. सांडपाणी प्रकल्प उभारणीसाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्यास, किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीने व केंद्र सरकारच्या मान्यतेने , फक्त महानगरपालिका प्राधिकरणेच अपवादात्मक परिस्थितीत सी आर झेड I मध्ये महानगरपालिका क्षेत्रातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे बांधकाम करू शकतील. तसेच सदर स्वरूपाच्या प्रकल्पाचे बांधकाम खारफुटी वनक्षेत्रातच करणे अपरिहार्य असेल तर बांधकाम प्रक्रियेत नष्ट होणाऱ्या किंवा कापल्या जाणाऱ्या खारफुटी वनांच्या तिप्पट प्रमाणात खारफुटी वनांची लागवड करणे बंधनकारक असेल.

**महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९**

[ धारिका क्रमांक १९ – ११२ /० २०१३ – I अ – III ]
रितेश कुमार सिंह , संयुक्त सचिव

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

# महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

**जोडपत्र १ : पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांसाठी संवर्धन , सरंक्षण व व्यवस्थापन चौकट**

किनारपट्टी व सागरी विभागातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रे आणि भूरुपिकी वैशिष्ट्ये किनारपट्टीवरील कार्यात महत्वाची भूमिका निभावत असतात. खारफुटीची वने, समुद्रकिनारे, प्रवाळ बेटे इत्यादी घटक किनारपट्टीची धूप, किनाऱ्यावरील रेषा बदल, खाऱ्या पाण्याची घुसखोरी, ह्यावर नियंत्रण ठेवण्यात मदत करतात आणि वादळे, चक्रीवादळे, आणि सुनामी सारख्या समुद्र किनाऱ्यावरील नैसर्गिक आपत्तीत संरक्षण करतात. किनारपट्टीवरील उपजीविकेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिसंस्था सेवा पुरवून पर्यावरण दृष्ट्या संवेदशील क्षेत्रे किनारपट्टीची जैविक अखंडता अबाधित ठेवतात. त्याशिवाय समुद्र किनाऱ्यावर अनेक अमूल्य पुरातत्वीय व वारसा स्थळे अस्तित्वात असतात. त्यामुळे उपरोक्त क्षेत्रे, वैशिष्ट्ये व स्थळे यांचे संवर्धन व संरक्षण करणे आवश्यक आहे.

१. सर्वसामान्य उपाय

- i. उपग्रह माहितीसाठ्याचा उपयोग करून राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्र सर्व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे निर्धारण करून त्यांचे सीमांकन चित्रित करेल
- ii. सदर अधिसूचनेतील दिशानिर्देशानुसार राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेश प्राधिकृत संस्थांच्या मार्फत किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना तयार करतील व त्यामध्ये पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांच्या संवर्धन व संरक्षणाचे महत्व अधोरेखित करण्यात येईल.
- iii. सदर अधिसूचनेत अनुज्ञेय कार्ये किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट असतील.

खालील पैकी प्रत्येक पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राच्या संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापनासाठी विशिष्ट परिस्थतीत व अटींचा अवलंब केला पाहिजे

**१.१. खारफुटी वने**

- i. वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार खारफुटी वन म्हणून घोषित झाले असल्यास :
  सदर अधिसूचनेत असलेल्या कोणत्याही तरतुदीच्या निरपेक्ष, संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेश किंवा केंद्र सरकारने अशा खारफुटी वनांना वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार वनजमीन म्हणून घोषित केले असल्यास तिथे सदर अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील
- ii. वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार खारफुटी वन म्हणून घोषित झाले नसल्यास :
  - क. संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनांनी तयार केलेल्या तपशीलवार योजनेच्या आधारे सरकारी जमिनीवरील खारफुटी वनांचे संरक्षण केले जाईल. खारफुटीच्या वनांचे क्षेत्रफळ हे १००० मीटर पेक्षा जास्त असल्यास सदर खारफुटी वनाच्या परीघावर ५० मीटरच्या बफर विभागाची तरतूद करावी लागेल. उद्याने, खारफुटी वनांशी संबंधित संशोधन सुविधा, संवर्धन व तत्सम कार्यासाठी सदर ५० मीटरच्या बफर विभागाचा उपयोग करण्यात यावा.
  - ख. खासगी जमिनीतील खारफुटी वनांना बफर विभागाची आवश्यकता नाही.

**१.२ प्रवाळ, प्रवाळ बेटे व संबंधित जैवविविधता**

- i. प्रवाळ व प्रवाळ बेटे व सभोवतालचा परिसर नष्ट करणे हे प्रतिबंधित कार्य आहे.
- ii. संशोधन प्रयोजनार्थ आवश्यक छोट्या प्रमाणातील गरज वगळता सर्व प्रवाळ व प्रवाळ बेटे व सभोवतालचा परिसराचे संरक्षण केले पाहिजे.
- iii. वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम १९७२ ( १९७२ चा ५३ ) नुसार पुनरुज्जीवन आवश्यक असलेल्या ठिकाणी ते करण्यासाठी आवश्यक मान्यता प्राप्त केल्यानंतरच प्रवाळ व प्रवाळ बेटांच्या प्रत्यारोपणचे कार्य करण्यात येईल.
- iv. मृत किंवा नष्ट झालेल्या प्रवालांचे पुनरुज्जीवन व पुनर्वसन हाती घेण्यात यावे. प्रवाळ व प्रवाळ द्वीपांचे पुनरुज्जीवन व पुनर्वसन खालील प्रकारे करण्यात येईल.

क. सक्रीय व जिवंत प्रवाळ व प्रवाळ द्वीपे निर्धारित करून त्यांचे सीमांकन करून पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) नुसार पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित व अधिसूचित करण्यात आले पाहिजे.

ख. खनिकर्म, निसृत व सांडपाणी स्त्रवण, गाळ उपसणे, स्थिर पाण्याचे स्त्रवण , जहाजे धुणे, बांधकाम पारंपारिक बिगर विनाशक मासेमारी अशी प्रवाळ व प्रवाळ बेटांच्या आरोग्याला व अस्तित्वाला घातक कार्ये अशा परिसरात हाती घेऊ नयेत.

१.३ वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम, १९७२ ( १९७२ चा ५३ ), किंवा वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ , किंवा पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) अंतर्गत घोषित राष्ट्रीय उद्याने, **सागरी उद्याने व अभयारण्ये ,**

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

**राखीव वने,** वन्यजीव अधिवास व राखीव जीवशास्त्रीय अधिवासंच्या सहित अन्य संरक्षित क्षेत्रांचे खालील प्रमाणे संरक्षण व संवर्धन करण्यात येईल

i. उपरोक्त उल्लेखित क्षेत्रांचे संवर्धन व संरक्षण हे जशी बाब असेल त्यानुसार त्या त्या अधिनियम, अधिसूचना यामधील तरतुदी किंवा दिशानिर्देशा नुसार करण्यात येईल.

ii. वाढत्या प्रमाणावरील वादळे, लाटा व पूर ह्यामुळे जीवित व संपत्तीची हानी टाळण्यासाठी किनारपट्टी भागातील वन क्षेत्रात वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

iii. जागेला योग्य अशी निवारा पट्टा लागवड किंवा रोपण सामग्री सह जैवढाल लागवड करण्यासाठी संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांनी अशा उपायांच्या प्रयोजनार्थ पर्याप्त निधीची तरतूद केली पाहिजे.

**१.४. खारी दलदल जमीन**

खाऱ्या दलदल जमिनीचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे करण्यात येईल :

i. खाऱ्या दलदल जमिनीचे संवर्धन व संरक्षण करून तिथे देशज जैववैविध्य प्रवर्तित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले पाहिजेत.

ii. वहन किंवा पारेषण करणाऱ्या उपरी तार किंवा भूमिगत तार अंथरणे इत्यादी कार्येच अनुज्ञेय असतील.

iii. खाऱ्या दलदल जमिनीत पारंपारिक मासेमारी अनुज्ञेय असेल.

iv. दिशानिर्देशात विहित केलेल्या निकषांच्या अधीन राहून खाऱ्या दलदल जमिनीत तात्पुरत्या पर्यटन सुविधांचा विचार करता येईल.

v. कमी जैंववैविध्य असलेल्या, राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने निर्धारित केलेल्या व किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन विभागात सिमांकित केलेल्या विशिष्ट खाऱ्या दलदल जमिनींचा मिठागरे कार्यांसाठी विचार करता येईल.

**१.५ कासवांच्या प्रजाजन स्थळांचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे होईल :**

i. संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांनी निर्धारित केलेली कासव प्रजनन स्थळे वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम १९७२ नुसार संरक्षित करण्यात येतील.

ii. सदर स्थळांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी आवश्यक कार्ये वगळता, प्रकाश निर्माण करणारी किंवा आवाजाचे प्रदूषण करणाऱ्या कोणतीही कार्ये कासवांच्या प्रजनन स्थळी अनुज्ञेय नसतील

iii. कासवांच्या प्रजाजन स्थळांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांनी सक्त व्यवस्थापन योजना हाती घेऊन करण्यान्वित केल्या पाहिजेत.

**१.६ अश्वशक्ती खेकड्याच्या अधिवासाचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे होईल** :

i. निर्धारित अधिवासांचे संरक्षण व संवर्धन हाती घेतले पाहिजे.

ii. अश्वशक्ती खेकड्याच्या परीसंस्थेवर विपरीत परिणाम होईल अशी कोणतीही कार्ये सदर अधिवासात किंवा अवतीभोवती हाती घेऊ नयेत.

**१.७ सागरी गवताच्या पट्ट्यांचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे होईल :**

i. सागरी गवताच्या निर्धारित पट्ट्यांचे संरक्षण व संवर्धन हाती घेतले पाहिजे.

ii. सागरी गवताच्या पट्ट्यावर विपरीत परिणाम करणारे कोणतेही कार्य हाती घेऊ नये.

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

iii. सागरी गावात कार्बन शोषून घेत असल्यामुळे राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी जिथे शक्य असेल तिथे सागरी गवताचे पट्टे विकसीत करण्यासाठी प्रयत्न करावेत

**१.८ पक्ष्यांची घरटी करण्याच्या ठिकाणांचे खालील प्रकारे संरक्षण व संवर्धन करण्यात येईल**

i. स्थानिक पक्षांच्या घरटी बनविण्याच्या स्थळांचे त्यांच्या स्थलांतर मार्गासहित संरक्षण करणे आवश्यक आहे. घरटी करण्याच्या जागा व स्थळांतर मार्गावर विपरीत परिणाम होईल अशी पवनचक्क्या, प्रसारण वाहिन्या ह्या सह कोणतीही कार्ये सदर क्षेत्रात हाती घेऊ नयेत.

ii. पक्षांना योग्य अधिवास उपलब्ध करून देण्यासाठी तसेच खारी दलदल व किनारपट्टीवरील जलधीतील जैवविविधता समृद्ध करण्यासाठी वनाच्छादन व खारफुटी वनांचे आच्छादन वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**१.९ भूरुपिकी दृष्ट्या महत्वाच्या विभागांचे प्रकारे संरक्षण व संवर्धन करण्यात येईल**

i. निर्धारित वाळूच्या टेकड्यांचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे झाले पाहिजे

क. निर्धारित वाळूच्या टेकड्या पर्यवरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ अंतर्गत अधिसूचित करण्यात येतील.

ख. पादचारी मार्ग, तंबू, व तत्सम पर्यावरणाला अनुकूल तात्पुरत्या पर्यटन सुविधा वगळता, कोणत्याही प्रकारची विकसन कार्ये अनुज्ञेय असणार नाहीत.

ग. दीर्घन किंवा अन्य योग्य वाळूचा उपयोग करून उचित प्रमाणात आण्विक खनिजांचे पुनर्भरण होईल अशा बेताने आण्विक खनिजे काढण्याचे कार्य वगळता, वाळूच्या टेकड्यांमध्ये खनिकर्म अनुज्ञेय असणार नाही.

घ. वाळूच्या टेकड्यांची धूप होईल / त्या नष्ट होतील असे कोणतेही कार्य वाळूच्या टेकड्यांवर हाती घेऊ नये.

ङ. एतद्देशीय वनस्पती रोपण करूनच वाळूच्या टेकड्यांचे वनीकरण करता येईल.

च. सिमांकित केलेल्या वाळूच्या टेकड्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांनी योजना तयार करावी.

**ii. वाळूचे किनारे**

क. दीर्घन किंवा अन्य योग्य वाळूचा उपयोग करून उचित प्रमाणात आण्विक खनिजांचे पुनर्भरण होईल अशा बेताने आण्विक खनिजे हाताने काढण्याचे कार्य वगळता वाळूच्या किनाऱ्यांवर खनिकर्म अनुज्ञेय नाही.

ख. किनाऱ्यांवर अनुज्ञेय विकासात्मक कार्ये हाती घेताना तेथील सभोवतालचे नुकसान होत असेल, तर प्रकल्प प्रधिकार्याने सदर संभाव्य नुकसानाची भरपाई करण्यासाठी कार्ये हाती घेऊन दीर्घकाळ पर्यंत त्यांची देखभाल घेण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

ग. सिमांकित केलेल्या वाळूच्या किनाऱ्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांनी योजना तयार करावी

**iii. जैविक दृष्ट्या सक्रीय दलदलीचे प्रदेश**

क. राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाच्या सहकार्याने राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्र जैविकदृष्ट्या दलदलीचे प्रदेश निर्धारित करेल.

ख. सिमांकित केलेल्या जैविक दृष्ट्या सक्रीय दलदलीच्या प्रदेशांचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांनी योजना तयार करावी

**१.१० पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या रचना आणि वारसा मूल्य असलेल्या स्थळे किंवा क्षेत्रे**

i. त्या त्या संबंधित अधिनियम, अधिसूचना किंवा दिशानिर्देशातील तरतुदीनुसार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने निर्धारित केलेल्या पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या रचना आणि वारसा स्थळांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी राज्य पुरातत्व अभिकरणे जबाबदार असतील.

ii. पुरातत्व व वारसा मूल्य लाभलेल्या निधारित रचना किंवा क्षेत्रांना क्षति पोहोचेल अशी कुठलीही कार्ये अनुज्ञेय असणार नाहीत.

iii. सदर रचना किंवा क्षेत्रे संवर्धन करून अशा रचनांचे जोते / दर्शनी भाग बदलणार नाहीत अशी कार्ये हाती घ्यावीत. रचनांच्या बाह्य वास्तूरचनेत बदल न करता संबंधित निकष लक्षात घेऊन अंतर्गत भागाची काळजीपूर्वक पुनर्रचना करण्याचा विचार करता येईल

**जोडपत्र २ : सी आर झेड I A वगळता किनारपट्टी विनियमन विभागात साठवणूक करण्यासाठी अनुज्ञेय पेट्रोलियम व रासायनिक उत्पादनांची यादी**

i. कच्चे खनिज तेल
ii. द्रविकृत पेट्रोलियम वायू
iii. वाहनासाठी तेल
iv. घासलेट
v. हवाई इंधन
vi. हाय स्पीड डीझेल
vii. वंगण तेल
viii. ब्युटेन
ix. प्रोपेन
x. नैसर्गिक वायू
xi. नाफ्ता
xii. भट्टीचे तेल
xiii. गंधक – जड साठा
xiv. द्रविकृत नैसर्गिक वायू
xv. खते व खतांच्या उत्पादनार्थ आवश्यक कच्चा माल
xvi. असिटीक आम्ल
xvii. मोनो इथेलीन ग्लायकोल
xviii. पाराझायलीन
xix. इथेन
xx. ब्युटाडाईन
xxi. मिथानोल
xxii. कोष्टीक
xxiii. बीट्युमेन

**जोडपत्र III : निर्देशित किनारपट्टी विनियमन विभागातील क्षेत्रात सागर किनाऱ्यावरील आरामगृहे, हॉटेल, व पर्यटन विकसन प्रकल्प ह्याविषयी दिशानिर्देश**

**१. सी आर झेड II**



पर्यटक किंवा अभ्यागतांच्या सुविधेसाठी सी आर झेड II मध्ये निर्देशित क्षेत्रात सागर किनाऱ्यावरील आरामगृहे, हॉटेल, व पर्यटन विकसन प्रकल्प हे खालील अटी व शर्तींचा अधीन असतील.

i. सद्य अस्तित्वातील रस्त्याच्या किंवा अधिकृत स्थावर बांधकामाच्या जमिनीकडील बाजूसच बांधकामाची परवानगी देण्यात येईल.

ii. समुद्राकाठी अभिगामाचे मार्ग कोणत्याही प्रकारे बंद होणार नाहीत ह्या अटीच्या अधीन राहून खासगी मिळकतीच्या सभोवताली वनस्पतींचे आच्छादन असलेले तारांचे कुंपण अनुज्ञेय असावे.

iii. वाळूच्या टेकड्यांचे सपाटीकरण करू नये

iv. गोल , नेट व दिव्यांसाठी खांब हे बांधकाम वगळता क्रीडा सुविधांच्या कोणत्याही प्रकारचे कायम स्वरूपी बांधकाम अनुज्ञेय असणार नाही

v. तळघराचे बांधकाम केल्याने सदर क्षेत्रातील भूभागाच्या भूजलाच्या मुक्त प्रवाहात कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नसल्याचे प्रमाणपत्र राज्य भूजल प्राधिकरणाने जारी करण्याच्या अटीच्या अधीन राहून तळघराच्या बांधकामाची परवानगी द्यावी

vi. सदर ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याच्या अगोदर राज्य भूजल प्राधिकरणाने सदर संदर्भातील केंद्र शासनाच्या दिशानिर्देशांचा विचार करावा

vii. प्रकल्प क्षेत्रातून प्रक्रिया केलेल्या निसृत, घनकचऱ्याची , उत्सर्जन , आवाज यांची गुणवत्ता व पातळी ही केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळासहित सक्षम प्राधिकरणे व पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ नुसार विहित मर्यादेत असावेत

viii. निसृत स्त्रवण व घनकचरा यांच्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करणे आवश्यक आहे व अपरीशकृत निसृत स्त्रवण व घनकचरा पाण्यामध्ये किंवा सागराच्या पाण्यात किंवा किनारपट्टीवर सोडण्यात येणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

ix. प्रकल्पात वन जमिनींचे बिगर वन प्रयोजनासाठी अपवाहन होणार असल्यास वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार परवानगी प्राप्त केली पाहिजे व अन्य केंद्रीय व राज्य अधिनियमांच्या लागू असलेल्या नियमांचे पालन प्रकल्पाने केले पाहिजे. तसेच प्रकल्पासाठी राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या पर्यटन विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे.

**२. सी आर झेड III**

पर्यटक किंवा अभ्यागतांच्या सुविधेसाठी सी आर झेड III मध्ये निर्देशित क्षेत्रात सागर किनाऱ्यावरील आरामगृहे, हॉटेल, व पर्यटन विकसन प्रकल्प हे खालील अटी व शर्तींचा अधीन असतील.

i. समुद्राकाठी अभिगामाचे मार्ग कोणत्याही प्रकारे बंद होणार नाहीत ह्या अटीच्या अधीन राहून खासगी मिळकतीच्या सभोवताली वनस्पतींचे आच्छादन असलेले तारांचे कुंपण अनुज्ञेय असावे.

ii. वाळूच्या टेकड्यांचे सपाटीकरण करू नये

iii. गोल , नेट व दिव्यांसाठी खांब हे बांधकाम वगळता क्रीडा सुविधांच्या कोणत्याही प्रकारचे कायम स्वरूपी बांधकाम अनुज्ञेय असणार नाही

iv. तळघराचे बांधकाम केल्याने सदर क्षेत्रातील भूभागाच्या भूजलाच्या मुक्त प्रवाहात कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नसल्याचे प्रमाणपत्र राज्य भूजल प्राधिकरणाने जारी करण्याच्या अटीच्या अधीन राहून तळघराच्या बांधकामाची परवानगी द्यावी

v. सदर ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याच्या अगोदर राज्य भूजल प्राधिकरणाने सदर संदर्भातील केंद्र शासनाच्या दिशानिर्देशांचा विचार करावा

vi. ना विकास विभागात कोणतेही बांधकाम करायची परवानगी नसली तरीही चटई क्षेत्र निर्देशांकाच्या गणनाच्या प्रयोजनार्थ ना विकास विभागात येणाऱ्या भूखंडाचे सर्व क्षेत्र विचारात घेणे आवश्यक आहे.

vii. सर्व मजल्यांचे बांधकामाचे एकूण क्षेत्र हे भूखंडाच्या आकाराच्या ३३ % पेक्षा जास्त असता कामा नये. म्हणजेच चटई क्षेत्र निर्देशांक हा ०.३३ पेक्षा जास्त असणार नाही व खुले क्षेत्र सुद्धा योग्य अशा वनस्पतींच्या आच्छादनाचे भूदृश्य उभारणे आवश्यक आहे.



**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

viii. बांधकाम हे सभोवतालच्या भूदृश्याशी व स्थानिक वास्तुकला शैलीशी सुसंगत असावे

ix. बांधकामाची छताच्या पर्यंतची एकूण उंची ९ मीटर पेक्षा जास्त नसेल व ( तळमजला + एक वरचा मजला ) अशा दोन पेक्षा जास्त मजल्यांना बांधकाम अनुज्ञेय असणार नाही.

x. भरती रेषेपासूनच्या २०० मीटरच्या परिसरात भूजलाचा उपसा करता येणार नाही. तसेच २०० ते ५०० मीटर परिसरात सुद्धा केंद्रीय किंवा राज्य भूजल सर्वेक्षण मंडळाच्या सहमतीनेच भूजलाचा उपसा करता येईल

xi. भरती रेषेपासूनच्या ५०० मीटरच्या परिसरातइमारतीचा पाया किंवा तरण तलाव प्रयोजन वगळता . वाळू उपसा, वाळूच्या पट्ट्यांचे सपाटीकरण किंवा खोदाई अनुज्ञेय असणार नाही ,

xii. प्रकल्प क्षेत्रातून प्रक्रिया केलेल्या निसृत, घनकचऱ्याची , उत्सर्जन , आवाज यांची गुणवत्ता व पातळी ही केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळासहित सक्षम प्राधिकरणे व पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ नुसार विहित मर्यादेत असावेत

xiii. निसृत स्त्रवण व घनकचरा यांच्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करणे आवश्यक आहे व अपरीश्कृत निसृत स्त्रवण व घनकचरा पाण्यामध्ये किंवा सागराच्या पाण्यात किंवा किनारपट्टीवर सोडण्यात येणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

xiv. समुद्र काठावर सार्वजनिक अभिगम अनुज्ञेय असण्यासाठी कोणत्याही दोन हॉटेल किंवा आरम्गृहात किमान २० मीटर्सचे अंतर असणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत सदर अंतर ५०० मीटर पेक्षा कमी असणार नाही

xv. प्रकल्पात वन जमिनींचे बिगर वन प्रयोजनासाठी अपवाहन होणार असल्यास वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार परवानगी प्राप्त केली पाहिजे व अन्य केंद्रीय व राज्य अधिनियमांच्या लागू असलेल्या नियमांचे पालन प्रकल्पाने केले पाहिजे. तसेच प्रकल्पासाठी राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या पर्यटन विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे.

टीप : ( सागरी उद्याने, खारफुटीची वने, प्रवाळ बेटे, मासे कासवे इत्यादी वन्यजीव प्राण्यांची प्रजनन स्थळे व अधिवास तसेच केंद्र व राज्य सरकारांनी किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाने अधिसूचित केलेल्या ) पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात आरम्गृहे किंवा हॉटेल यांच्या बांधकामांना परवानगी देण्यात येणार नाही.

**जोडपत्र ४ –किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी दिशानिर्देश**

**१. भरती व ओहोटी रेषेचे सीमांकन करून घेणे**

राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने संपूर्ण देशाच्याकिनारपट्टीवर केलेल्या भरती व ओहोटी रेषांचे सीमांकन किनारपट्टी वरील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना उपलब्ध करून देण्यात आले आहे आणि सदर अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ भरती व ओहोटी रेषांचे सदर सीमांकनच ग्राह्य धरण्यात येईल

**२. धोका रेषा**

पाण्याच्या पातळीतील चढउतार , सागराच्या पातळीतील वाढ, ( धूप किंवा वाढ यामुळे ) दीर्घकाळ पर्यंत किनारपट्टी मधील बदल, इत्यादीमुळे भूमी भागात येणाऱ्या पुराचा विचार करून भारतीय सर्वेक्षण संस्थेने “ धोका रेषेचे “ सेमांकन केले आहे. भारतीय सर्वेक्षण संस्थेने सिमांकित केलेली धोका रेषा राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने सर्व किनारपट्टी वरील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना उपलब्ध करून दिली आहे. अनुकूलन व शमन उपाययोजना समाविष्ट असलेला किनारपट्टी पर्यावरणासाठीची आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी धोका रेषेचा साधन म्हणून उपयोग करून घेतला पाहिजे. सागरी समुदायांची असुरक्षितता घटवून त्यांना शाश्वत उपजीविका प्राप्त होण्याच्या दृष्टीने किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना तयार करताना भरती ओहोटी रेषेतील जमिनीच्या उपयोगाचे नियोजन करताना हवामान बदल व किनारपट्टीत होणाऱ्या बदलांचा विचार झाला पाहिजे.

**३. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापनाचे नकाशे तयार करणे**

i. १ : २५००० ह्या प्रमाणातील आधारभूत नकाशे भारतीय सर्वेक्षण कडून प्राप्त करून घ्येवेत. जिथे १ : २५००० हे प्रमाण असलेले नकाशे उपलब्ध नसतील तिथे १ : ५०००० प्रमाणातील नकाशे हे आधारभूत नकाशे तयार करण्या प्रीत्यर्थ १ : २५००० प्रमाणापर्यंत मोठे करून घ्यावेत. सदर नकाशे खालील प्रमाणित तपशिलाचे असावेत
एकक : ७. ५ मिनिटे x ७.५ मिनिटे
अंकन : भारतीय सर्वेक्षण संस्थेची पत्रिकांची अंकन पद्धत
क्षैतीज रेषांची गृहीत बाब : एव्हरेस्ट किंवा डब्ल्यू जी एस ८४
क्षितीजलंब रेषांची गृहीत बाब : सागराची सरासरी पातळी
प्रदेश वर्णन : अद्ययावत उपग्रहीय किंवा हवाई प्रतिमांचा उपयोग करून भारतीय सर्वेक्षण संस्थेच्या नकाशातील प्रदेश वर्णन अद्ययावत करण्यात येईल

ii. राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने सीमांकन केलेल्या भरती किंवा ओहोटी रेषेचा उपयोग करून पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४ मार्च २०११ रोजीच्या कार्यालयीन आदेश क्रमांक ज – १७०११ / ८ / ९२ – I अ – III अनुसार निधारित केलेल्या कोणत्याही अभिकरणकडून १ : २५००० प्रमाणात किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशे तयार करून घ्यावेत

iii. किनारपट्टी विनियमन विभागाच्या विविध वर्गवारीना लागू होणाऱ्या विविध विनियामक रेषा म्हणजेच भरती रेषेपासून २० मीटर, ५०, मीटर, २०० मीटर व ५०० मीटर अंतरावर आखून घ्याव्यात व धोका रेषा सिमांकित करून किनारपट्टी विनियमन विभागाच्या नकाशात अंतरित कराव्यात.

iv. लाटांनी प्रभावित होणाऱ्या अंतर्गत भागातील जलधीच्या किनाऱ्यावरील किनारपट्टी विनियमन विभागाच्या नकाशात भरती, ओहोटी रेषा व किनारपट्टी विनियमन विभागाच्या सीमा सुद्धा सिमांकित करून घ्याव्यात

v. किनारपट्टी विनियमन विभाग अधिसूचनेनुसार विविध किनारपट्टी विभागांचे वर्गीकरण करून त्या प्रीत्यर्थ प्रमाणित राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय रंग संकेटंटंचा उपयोग करण्यात यावा

**४. स्थानिक स्तरावरील किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशे**

i. स्थानिक स्तरावरील किनारपट्टी व्यवस्थापन नकाशे हे स्थानिक संस्था व अन्य अभिकरणानी किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनांचे कार्यान्वयन प्रयोजनार्थ असतात

ii. महसूल प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेले १ : ३९६० किंवा त्यालगत प्रमाणावरील भुकर नकाशांचा आधारभूत नकाशे म्हणून उपयोग करण्यात यावा

iii. भुकर नकाशांमध्ये भरती, ओहोटी व अन्य विनियामक रेषा व धोका रेषा सिमांकित करण्यात यावी व सदर वर्गीकरणे स्थानिक स्तरावरील किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशांमध्ये अंतरित करण्यात यावे

**५. किनारपट्टी विनियामक विभागांचे वर्गीकरण**

i. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशात विभागातील जमिनीचा उपयोग करण्याची योजना स्पष्टपणे सिमांकित करण्यात आली पाहिजे व राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन संस्थेने किनारपट्टी वरील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना उपलब्ध करून दिलेल्या नकाशानुसार सी आर झेड – Iअ विभाग किंवा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील विभाग चिन्हांकित केले पाहिजेत. अशा सर्व पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे योग्य रंग संकेतांच्या सहाय्याने सीमांकन करणे आवश्यक आहे.

ii. १००० वर्ग मीटर पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या खारफुटी वन विभगातील बफर विभाग हा खारफुटी वनापेक्षा वेगळया रंगाने दर्शविले पाहिजे. बफर विभाग सुद्धा सी आर झेड – I विभाग म्हणून वर्गीकृत केले पाहिजे.

iii. किनारपट्टी विनियमन विभाग क्षेत्रात मासेमारीची गावे, मच्छिमार समुदायाच्या सामुदायिक मिळकती, मासेमारीचे छोटे धक्के , बर्फ कारखाना, मासे वाळवण आवार किंवा दवाखाने, शाळा, रस्ते व मासेमारी व स्थानिक समुदायांच्य तत्सम पायाभूत सुविधा भुकर नकाशांवर दर्शविल्या पाहिजेत. किनारपट्टी वरील विस्तार व मच्छिमार समुदायांच्या अन्य गरजा लक्षात घेऊन स्वच्छता , सुरक्षितता व आपत्तीचा सामना करण्यासठी मुलभूत सेवांची तरतूद व गृहनिर्माण गरजाविषयक दीर्घकालीन योजना किनारपट्टी वरील राज्ये व केंद्र शासित प्रदेशांनी तयार केल्या पाहिजेत.



**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

iv. सी आर झेड IV मधील जल क्षेत्रे सिमांकित करण्यात आली पाहिजेत व जलधी ही समुद्र, कछसर , पश्चजल, खाडी, उपसागर, नदीमुख असल्यास त्यांचे सीमांकन स्पष्टपणे केले पाहिजे . सदर वर्गीकरणासाठी राष्ट्रीय जलआलेखन कार्यालयाने निर्धारित केलेल्या परिभाषेचा आधार घेण्यात यावा

v. जलधी मधील मासेमारी क्षेत्रे व माशांची पैदाइश क्षेत्रे या स्पष्टपणे चिन्हांकित केल्या पाहिजेत.

vi. गंभीररित्या असुरक्षित किनारपट्टी क्षेत्रात सी आर झेड I, II, III IV स्पष्टपणे सिमांकित करून जमिनीचा उपयोग नकाशा किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेवर अध्यारोपित केली पाहिजे

vii. समुद्राकडील सद्य अधिकृत बांधकामे स्पष्टपणे सिमांकित केली पाहिजेत.

viii. चक्रीवादळ, वादळ, सुनामी व तत्सम नैसर्गिक आपत्तीच्या दरम्यान मदत व सुटका प्रयोजनार्थ किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशांवर चक्रीवादळ व पाउस निवारे, हेलीपॅड व रस्त्यासाहित अन्य सर्व पायाभूत सुविधा स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात.

ix. पर्यावरणीय प्रमाणके , नियम व अधिनियमा नुसार घन व द्रव कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व त्याच्या योग्य व्यवस्था व व्यवस्थापन करण्यासठी पर्याप्त व्यवस्था असल्यास किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजने अंतर्गत इमारतींचे बांधकाम व अन्य कार्यांना परवानगी देण्यात यावी.

**६. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेवर सार्वजनिक सल्लामसलत** :

i. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेला व्यापक प्रसिद्धी देऊन पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ नुसार सूचना व हरकती मागवाव्यात. संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण जिल्हा स्तरावर सदर किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजने बाबत सार्वजनिक सुनावणी करेल.

ii. प्राप्त सूचना व हरकतींच्या आधारे किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत सुधारणा करून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची मान्यता प्राप्त केली पाहिजे.

iii. मान्यताप्राप्त किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेची प्रत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाचे संकेतस्थळ , संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाचे संकेतस्थळ व छापील प्रत ग्राम पंचायत कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध असली पाहिजे.

**७. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत सुधारणा**

i. जिथे शंका असेल तिथे संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्याकिनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने सदर बाब राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राकडे सदर शंका संदर्भित करावी. तिथे अद्ययावत उपग्रहीय प्रतिमा व मैदानी सत्याचा आधार घेऊन त्याचे सत्यापन करण्यात येईल.

ii. आवश्यकता असल्यास सुधारित नकाशा विचारार्थ पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाआकडे सादर करावा

**जोडपत्र ४ प्रकल्पाची तपशीलवार माहिती**

**१. प्रकल्पाचा तपशील**

क. प्रकल्पाचे नाव

ख. सर्वेक्षण संख्या / गाव / संदर्भबिंदू

ग. जिल्हा

घ. राज्य

ङ. प्रस्ताव कशासाठी आहे ? ( संबंधित विकल्प निवडावा )

i. किनारपट्टी विनियमन विभागाच्या अंतर्गत नव्याने परवानगी

ii. अगोदरच जारी केलेल्या किनारपट्टी विनियमन विभागाच्या अंतर्गत परवानगीत दुरुस्ती

iii. अगोदरच जारी केलेल्या किनारपट्टी विनियमन विभागाच्या अंतर्गत परवानगीच्या वैधातेत वाढ

च. अर्जदाराचे नाव

छ. अर्जदाराचा पत्ता

ज. संपर्काचा तपशील ( दूरध्वनी क्रमांक व इमेल पत्ता )

झ. प्रकल्पाचा खर्च ( रुपये कोटी )

**२. प्रकल्पाचे लाभ**

क. प्रकल्पाच्या लाभाचे तपशील

ख. उत्पन्न होणारा रोजगार ( होय / नाही ) : होय असल्यास

i. एकूण आवश्यक मनुष्यबळ

ii. कायमस्वरूपी रोजगार ( संख्या )

iii. तात्पुरते रोजगार ( संख्या )

iv. बांधकामाच्या वेळेस - तात्पुरते रोजगार ( संख्या )

v. परीचालानाच्या दरम्यान - तात्पुरते रोजगार ( संख्या )

**ग. ३. विचाराधीन प्रकल्पाचे वर्णन ( प्रकल्पाची वर्गवारी निवडावी ) :**

**क. अतिथिगृह / इमारती / सार्वजनिक सुविधा**

i. एकूण / बांधीव क्षेत्रफळ :

ii. बांधकामाची उंची :

iii. चटई क्षेत्र निर्देशांकाचे प्रमाण :

iv. संबंधित नगर योजना प्राधिकरणाचे / पंचायतीचे नाव :

v. वाहन पार्क करण्यासाठी तरतुदीचे तपशील

**ख. किनारपट्टी रस्ते / घोडाकाठी रस्ते**

i. पुनर्प्रप्त जमिनीचे क्षेत्रफळ

ii. पुनर्प्राप्ती प्रयोजनार्थ माती / घाणीचे अंदाजित प्रमाण

iii. रहदारी वहन क्षमता

iv. रस्त्याचे मोजमाप :

**ग. औष्णिक उर्जा फुंकणी पासून नलिका मार्ग**

i. नलिका मार्गाची लांबी

ii. किनारपट्टी विनियमन विभागाच्या क्षेत्रातून पार होणारी लांबी

iii. खोदाईची खोली

iv. खोदाईची रुंदी

v. समुद्र किनाऱ्यापासून खोल समुद्रात जाणाऱ्या नलिका मार्गाची लांबी

vi. समुद्राच्या पाण्याच्या पृष्ठभागापासून पातमुख बिंदूची खोली

vii. विल्हेवाट बिंदूपाशी सभोवतालच्या वर निसृताचे तापमान

**घ. प्रक्रिया केलेल्या निसृताची नलिका मार्गाद्वारे सागरी विल्हेवाट**

i. अंतर्ग्रहण / पातमुखाचे ठिकाण

ii. पातमुख बिंदूची खोली

iii. नलिका मार्गाची लांबी

iv. किनारपट्टी विनियमन विभागाच्या क्षेत्रातून पार होणारी लांबी

v. खोदाईची खोली

vi. खोदाईची रुंदी

vii. समुद्र किनाऱ्यापासून खोल समुद्रात जाणाऱ्या नलिका मार्गाची लांबी

viii. समुद्राच्या पाण्याच्या पृष्ठभागापासून पातमुख बिंदूची खोली

ix. विल्हेवाट बिंदुला पाण्याची खोली

x. जैवरसायनीक प्राणवायूची मागणी, रासायनिक प्राणवायूची मागणी, एकूण तरंगते घन पदार्थ, तेल, ग्रीस, निसृतातजड खनिजांचे प्रमाण

**ङ. वस्तू / रसायने यांच्या साठवणीसाठी सुविधा**

i. रसायनाचे नाव

ii. रसायनाची अंतिम उपयोगिता

iii. साठवणीसाठी टाक्यांची संख्या

iv. टाक्यांची क्षमता

**च. अपतटीय बांधकामे**

i. समन्वेषण किंवा विकसन

ii. समुद्र किनाऱ्याची खोली

iii. दोरखंडांची संख्या

iv. फलाटांची संख्या

v. गट एकत्रित येणाऱ्या स्थानकांचे तपशील

**छ. पृथक्करण संयंत्र**

i. पृथाक्कारणाची क्षमता

ii. खाऱ्या पाण्याची एकूण व्युत्पन्नता

iii. विल्हेवाट बिंदूपाशी सभोवतालच्या वर निसृताचे तापमान

iv. सभोवतालचा खारेपणा

v. विल्हेवाट बिंदू

**ज. आण्विक खनिजांचे खनिकर्म**

i. खनिकर्म क्षमता

ii. काढल्या जाणाऱ्या खनिजाचा प्रकार

iii. खनिजाचा अंतिम उपयोग

iv. खनिकर्म भाडेपट्टा / समन्वेषण करण्यासाठी सरकारी आदेश व मान्यताप्राप्त खनिज नियोजन तपशील

v. खनिकर्म भाडेपट्ट्याच्या क्षेत्राचा विस्तार

**झ. सांडपाणी प्रक्रिया संयंत्र**

i. क्षमता

ii. बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ

iii. केंद्रीय / राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा अन्य प्राधिकृत अभिकरण यांनी विहित केलेल्या निसृत परामुल्यांचे अनुपालन

iv. स्त्रावण समुद्राच्या पाण्यात / खाडीत आहे काय ? उत्तर होय असल्यास

- किनाऱ्यापासून / भरती नदीच्या किनाऱ्यापासून सागरी पातमुख बिंदूचे अंतर
- समुद्र / नदीच्या पाण्याच्या पृष्ठभागापासून पातमुळ बिंदूची खोली
- पातमुख बिंदूला समुद्र / नदी किनाऱ्याची खोली

**ञ. दीपगृह**

i. पाया / फलाटाचे एकूण मैदानी क्षेत्रफळ

ii. बांधकामाची उंची

**ट. पवनचक्क्या**

i. क्षमता ( मेगावाट )
ii. पवनचक्कीची उंची
iii. पवनचक्कीचा व्यास
iv. पात्याची लांबी
v. फिरण्याचा वेग
vi. पारेषण वाहिन्या ( डोक्यावरून की भूमिगत

**ठ. अन्य**

i. कृपया ठळक वैशिष्ट्ये नमूद करा
ii. संबंधित दस्तऐवज ( पी डी एफ स्वरुपात ) अपलोड करा

**४. किनारपट्टी विनियमन विभाग वर्गवारीनुसार प्रकल्पाचे ठिकाण ( जर प्रकल्पाचे ठिकाण अनेक प्रकारच्या किनारपट्टी विनियमन विभागात मोडत असेल, त्याबाबत विस्ताराने लिहावे )**

**५. किनारपट्टी विनियमन अधिसूचनेतील कोणत्या परिच्छेदाच्या अन्वये प्रकल्प हे अनुज्ञेय / विनियमित कार्य आहे.**

**६. प्रकल्पाच्या मूल्यमापनासाठी अनिवार्य माहिती**

**क. सिमांकित भरती ओहोटी रेषा दर्शविणारा १ : ४००० प्रमाणातील किनारपट्टी विनियमन विभागाचा नकाशा आणि भरती रेषेपासून प्रकल्पाच्या नजीकच्या सीमारेषेचे अंतर मीटर्स मध्ये नमूद करावे**
नकाशा अपलोड करावा ( के एम एल धारिका )

**ख. १ : ४००० प्रमाणातील किनारपट्टी विनियमन विभागाच्या नकाशावर अध्यारोपित केलेला प्रकल्प आराखडा . तसेच अन्य अधिसूचित पर्यावरण संवेदनशील क्षेत्रांच्या सह प्रकल्पाच्या ठिकाणाचे वर्गीकरण नमूद करावे**
नकाशा अपलोड करावा ( के एम एल धारिका )

**ग. प्रकल्पाच्या ठिकाणाचा मध्य धरून ७ किलोमीटर त्रीज्येचा तपशील दर्शविणारा १ : २५००० प्रमाणातील किनारपट्टी विनियमन विभागाचा नकाशा**
नकाशा अपलोड करावा ( के एम एल धारिका )

**७. प्रकल्प कुठे स्थित आहे : ( प्रकार निवडा )**

i. धूप न होणारा समुद्रकिनारा
ii. कमी व मध्यम धूप होणारा समुद्रकिनारा
iii. मोठ्या प्रमाणावर धूप होणारा समुद्रकिनारा

**८. वन / खारफुटीच्या वन जमिनींचे तपशील : ( होय / नाही ) उत्तर होय असल्यास**

i. वळविलेल्या क्षेत्रफळाचे तपशील
ii. वन खात्याची परवानगी सादर करावी ( दस्तऐवज अपलोड करावा )
iii. प्रकल्पाच्या अंतर्गत कापाव्या लागणाऱ्या झाडांची संख्या

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

iv. त्याबदल्यात भरपाई वनीकरण योजना सादर करावी ( दस्तऐवज अपलोड करा )

**९ . प्रस्तुत प्रकल्पाचे पर्यावरणदृष्ट्या संवेन्दानशील क्षेत्र / सागरी उद्यान / वन्यजीव अभयारण्यापासूनचे अंतर**

i. प्रकल्प स्थळापासून १० किलोमीटरच्या त्रीज्येत ( होय / नाही ) उत्तर होय असल्यास
ii. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची परवानगी सादर करावी ( दस्तऐवज अपलोड करावा )

**१०. राज्य / केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळांकडून स्थापित करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र / सहमती प्राप्त केली – ( होय / नाही. ) होय असल्यास**

i. ना हरकत प्रमाणपत्राची प्रत सादर करावी ( दस्तऐवज अपलोड करावा )
ii. विहित अटी नमूद कराव्यात ( दस्तऐवज अपलोड करावा )

**११. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यास ( संबंधित पर्यायांची माहिती भरावी )**

क) **भौमिक अभ्यास**

i. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यासाचा ( भौमिक ) सारांश तपशील
ii. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यासतील शिफारशी अपलोड करा ( दस्तऐवज अपलोड करावा )
iii. अभ्यासाचा कालावधी नमूद करावा

ख) **सागरी अभ्यास**

i. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यासाचा ( सागरी ) सारांश तपशील
ii. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यासतील शिफारशी अपलोड करा ( दस्तऐवज अपलोड करावा )
iii. अभ्यासाचा कालावधी नमूद करावा

**१२. आपत्ती व्यवस्थापन योजना / राष्ट्रीय तेल गळती आपत्ती आकस्मिकता योजना ( लागू असल्यास )**

**१३, द्रव स्वरूपातील निसृत स्त्रवण असलेला प्रकल्प**

i. मैलापाणी प्रक्रिया संयंत्राची क्षमता
ii. व्युत्पन्न निसृताचे प्रमाण
iii. प्रक्रिया केलेल्या निसृताचे प्रमाण
iv. प्रक्रिया व विल्हेवाटीची पद्धत

**१४. घनकचरा विल्हेवाट समाविष्ट असलेला प्रकल्प**

i. घनकचऱ्याचा प्रकार
ii. व्युत्पन्न घनकचऱ्याचे प्रमाण
iii. विल्हेवाटीची पद्धत
iv. वाहतुकीचा प्रकार

**१५. पाण्याची गरज ( दररोज किलो लिटर मध्ये )**

i. आवश्यक पाण्याचे प्रमाण
ii. पाण्याचा स्त्रोत
iii. भूजल असल्यास ( केंद्रीय भूजल प्राधिकरण किंवा अन्य प्राधिकृत प्राधिकरणाच्या मान्यतेची प्रत अपलोड करावी )
iv. अन्य स्त्रोत असल्यास (प्राधिकृत प्राधिकरणाच्या मान्यतेची प्रत अपलोड करावी )
v. वाहतुकीचाप्रकार
vi. पाणी पुरवठ्याची बांधिलकी

**१६. पाण्यावर प्रक्रियेचे व पुनर्वापराचे तपशील**

| प्रकार / स्त्रोत | सांडपाणी व्युत्पन्न होण्याचे प्रमाण ( दररोज किलो लिटर मध्ये ) | प्रक्रिया क्षमता ( दररोज किलो लिटर मध्ये ) | प्रक्रियेची पद्धत | विल्हेवाटीची पद्धत | सांडपाणी विमोचीत होण्याचे प्रमाण ( दररोज किलो लिटर मध्ये ) | पुनर्वापर होणाऱ्या प्रक्रिया केलेल्या पाण्याचे प्रमाण ( दररोज किलो लिटर मध्ये ) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

**१७. पावसाच्या पाण्याच्या साठवणीचे तपशील**

i. साठवण टाक्यांची संख्या
ii. टाक्यांची एकूण क्षमता
iii. पुनर्भरण खड्ड्यांची संख्या
iv. खड्ड्यांची क्षमता

**१८ . उर्जेची गरज व स्त्रोत**

i. उर्जेची एकूण गारण ( किलो वाट प्रती तास )
ii. स्त्रोत
iii. कराराची प्रत अपलोड करावी ( फक्त पी डी एफ स्वरूपातच अपलोड करावी )
iv. पर्यायी व्यवस्था ( तपशील )

**१९. उर्जा कार्यक्षमता / बचत उपाययोजना**

i. स्त्रोत / पद्धत
ii. बचतीचे तपशील

**२०. राज्य किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाची शिफारस**



**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

i. राज्य किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीची प्रत अपलोड करा ( फक्त पी डी एफ स्वरुपात )
ii. विहित अटींच्या अनुपालनाची स्थिती

**२१. पर्यावरण आघात अभ्यास अधिसूचना २००६ ने प्रकल्प बाधित आहे काय ? ( होय / नाही ) . उत्तर होय असल्यास**

i. त्याची वर्गवारी
ii. पर्यावरणीय परवानगीसाठी सादर प्रस्तावाची सद्य स्थिती ( लागू असेल त्यानुसार )

**२२. सामाजिक व पर्यावरणीय बाबी व सुचविण्यात आलेली शमन उपाययोजना–ह्यामध्ये पुनर्वसन व पुनर्स्थापन, पाणी, हवा, धोकादायक कचरा, पर्यावरण पैलू इत्यादी समाविष्ट , पण एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. ( तपशील थोडक्यात द्यावा )**

**२३. न्यायालयीन दाव्यांचे तपशील. : प्रकल्पाच्या विरुद्ध आणि / किंवा जिथे प्रकल्प स्थापित होणे प्रस्तावित आहे, त्या जमिनीवरून काही न्यायालयीन दावे प्रलंबित आहेत काय ? - * होय / नाही ) उत्तर होय असल्यास प्रलंबित की निकाली ?**

i. न्यायालयाचे नाव : ( सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय , राष्ट्रीय हरित लवाद )
ii. दावा क्रमांक :
iii. दाव्याचा तपशील
iv. न्यायालयाचे निर्देश / आदेश असल्यास आणि प्रस्तावित प्रकल्पाशी त्याचा संबंध ( दस्तऐवज अपलोड करा )

**२४. अतिरिक्त माहिती ( असल्यास ) :**

**घोषणापत्र** : ह्याद्वारे प्रमाणित करण्यात येते की माझ्या ज्ञान व विश्वासानुसार उपरोक्त सादर माहिती खरी असून किनारपट्टी विनियमन विभाग २०११ अधिसूचनेतील तरतुदींचे कोणतेही उल्लंघन येथे दडविण्यात आलेले नाही.

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी
दिनांक

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय
अधिसूचना
नवी दिल्ली शुक्रवार दिनांक १८ जानेवारी २०१९

सर्वसामान्य वैधानिक नियम ३७ ( इ ) : ज्याअर्थी भारत सरकारच्या तत्कालीन पर्यावरण व वने मंत्रालयाच्या दिनांक ६ जानेवारी २०११ रोजीच्या विशेष आदेशानुसार ( ह्यानंतर सदर आदेशाचा " किनारपट्टीक्षेत्रनियमन अधिसूचना २०११ " असा करण्यात आला आहे. ) केंद्र सरकारने पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा क्रमांक २९ ) च्या कलम ३ अन्वये विशिष्ट किनारपट्टी विभागांना किनारपट्टी नियमन विभाग ( ह्या नंतर उल्लेख कि नि वी – सी आर झेड असा केला आहे. ) ;

आणि ज्या अर्थी सागरी व किनारपट्टी परीसंस्थेचे व्यवस्थापन व संवर्धन, किनारपट्टी विभागाचे विकसन, पर्यावरण पर्यटन, उपजीविकेचे पर्याय, व किनारपट्टी वरील समुदायांचा शाश्वत विकास ह्या विषयांचं अनुषंगाने किनारपट्टी नियमन विभाग अधिसूचना २०११ मधील विशिष्ट तरतुदींच्या बाबत विविध हितसंबंधीयांच्या व्यतिरिक्त किनारपट्टीवरील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांकडून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांना अनेक निवेदने प्राप्त झाली होती ;

# महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

आणि ज्याअर्थी २०११ मधील विशिष्ट तरतुदींच्या बाबतकिनारपट्टीवरील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांकडून तसेच अन्य हितसंबंधीयांकडून उपस्थित केल्या गेलेल्या विविध प्रकारच्या बाबी व चिंतांचे परीक्षण करून सदर अधिसूचनेत योग्य ते बदल करण्यासाठी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांनी डॉ शैलेश नायक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती ;

आणि ज्याअर्थी मंत्रालयाने डॉ शैलेश नायक समिती द्वारा सादर अहवालाचा अभ्यास करून ह्या अनुषंगाने विविध हितसंबंधीयांशी सल्ला मसलत केली आहे ;

आणि ज्याअर्थी किनारपट्टी नियमन विभाग अधिसूचना २०१८ चा मसुदा दिनांक १८ एप्रिल २०१८ रोजी जारी करून सर्व संबंधितांच्या सूचना व अभिप्रायार्थ सदर मसुदा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी उपरोक्त किनारपट्टी नियमन विभाग अधिसूचना २०१८ च्या मसुद्याला प्रतिसाद देऊन प्राप्त आक्षेप व सूचना यांचा केंद्र सरकारने रीतसर विचार केला आहे, ;

त्याअर्थी पर्यावरण ( संरक्षण )अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) मधील कलम ( ३ ) च्या उप कलम ( १ ) व उपकलम ( २ ) च्या परिच्छेद ( v ) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून व दिनांक ६ जानेवारी २०११ रोजीची विशेष आदेश क्रमांक १९ ( इ ) द्वारे जारी किनारपट्टी नियमन विभाग अधिसूचना २०११ अधिक्रमित करून , मात्र सदर अधीक्रमण करण्यापूर्वी केलेल्या किंवा करावयाच्या वगळलेल्या बाबींचा अपवाद वगळून किनारपट्ट्या व सागरी विभागातील अनन्य पर्यावरणाचे व्यतिरिक्त सदर किनारपट्टी प्रदेशातील मत्स्य व्यावसायिक व अन्य स्थानिक समुदायांच्या उपजीविकेचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी तसेच नैसर्गिक आपत्तींचा व जागतिक तापमानवाढीमुळे समुद्राच्या वाढणाऱ्या पातळीचा धोका लक्षात घेऊन शास्त्रीय तत्वांच्या आधारे शाश्वत विकासास प्रोत्साहन देण्यासाठी , अंदमान व निकोबार व लक्षद्वीप बेटे व सदर बेटांच्या सभोवताली अस्तित्वात असलेल्या सागरी प्रदेशाला वगळून केंद्र सरकार देशाच्या समुद्र किनारे व राष्ट्रीय सागरी हद्दीतील सर्व प्रदेशास खालील प्रमाणे किनारपट्टी नियमन विभाग म्हणून घोषित करीत आहे

i. सागरी हद्दीवरील भरती रेषे ( ह्यानंतर उल्लेख एचटीएल असा केला आहे ) पासून जमिनीकडच्या बाजूकडील ५०० मीटर पर्यंतचा सर्व प्रदेश

   स्पष्टीकरण : सदर अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ भरती रेषा म्हणजे शाश्वत किनारपट्टी विकासानार्थ राष्ट्रीय केंद्राने विहित प्रक्रियेचा अवलंब करून आरेखित केलेली व किनारपट्टी वरील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना उपलब्ध करून दिलेली च्या द्वारे उधाणाच्या वेळेसची कमाल पूररेषा

ii. उच्च भरती रेषेपासून ५० मीटर किंवा खाडीची रुंदी ह्यापैकी जे कमी असेल , तिथपर्यंत किनारपट्टी नियमन विभाग लागू असेल व जमिनीच्या बाजूला व सागराला जोडल्या गेलेल्या जलधी मधील सागराच्या लाटांनी प्रभावित होणाऱ्या जलधीमधील अंतरापर्यंत व त्याच्या आजूबाजूला विकासात्मक कार्याचे नियमन करावयाचे आहे. सदर विभाग हे वर्षातील सर्वात शुष्क कालावधीच्या दरम्यान प्रत्येक हजाराच्या ५व्या भागासाठी ( parts per thousand - पी पी टी ) मोजलेल्या खारेपणावर आधारून व लाटांचा प्रभाव ज्या अंतरापर्यंत जाणवतो असे अंतर स्पष्टपणे निर्धारित करून व आखून घेऊन किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट केले पाहिजे. ( ह्यानंतर कि वी व्य यो – म्हणजेच सी एम झेड पी असा उल्लेख केला आहे.

   अशी तरतूद करण्यात येते की ५० मीटर किंवा खाडीची रुंदी यापैकी जे कमी असेल ती सी आर झेड मर्यादा, ही सल्ला मसलत , सर्वाज्जानिक सुनावणी, इत्यादी विहित प्रक्रिया व त्यामधील सूचित पर्यावरणीय सुरक्षा उपायांच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या सदर अधिसूचने नुसारच्या त्या त्या सी एम झेड पी च्या सुधारणा व अंतिम मान्यतेच्या अधीन असतील ; आणि सदर अधिसूचनेनुसार सी झेड एम पी ला मान्यता प्राप्त होई पर्यंत १०० मीटर किंवा खाडीची रुंधी ह्या पैकी कमी असलेली मर्यादा लागू राहील.

   स्पष्टीकरण : सदर उप परिच्छेदाच्या प्रयोजनार्थ , " लाटांनी प्रभावित जलधी " म्हणजे समुद्राच्या भरतीच्या लाटांनी प्रभावित होणाऱ्या समुद्राशी जोडल्या गेलेले उपसागर , नदी मुख, नद्या, खाडी , पश्चजल, कच्छसर व तलाव .

Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019

iii. अंतर मध्यंतर विभाग म्हणजे भरती व ओहोटीच्या रेषांमधील (ह्या नंतर एलटीएल - ओहोटीची रेषा म्हणून उल्लेख करण्यात येईल ) जमिनीचा भाग .

iv. लाटांनी प्रभावित जलधीच्या प्रीत्यर्थ सागर आणि पाण्याच्या बाबतीत ओहोटीची रेषा व प्रादेशिक जल सीमांच्या ( १२ सागरी मैल ) मधील जमीन आणि किनाऱ्याच्या विरुद्ध दिशेच्या ओहोटीची रेषेपासून किनाऱ्या वरील ओहोटीच्या रेषेपर्यंत

२.० किनारपट्टी विनियमन विभागांचे वर्गीकरण :

**२.१.१ किनारपट्टी विनियमन विभाग १ ( सी आर झेड – I ए )**

अ) खालील पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील विभाग व किनाऱ्याची अखंडता अबाधित ठेवण्यात महत्वाची भूमिका बजावणारी खालील भूरुपिकीय वैशिष्ट्ये ही सागर विनियमन विभाग १ ( सी आर झेड – I ए ) मध्ये समाविष्ट होतात म्हणजेच

१. खारफुटी वने ( खारफुटी वनाचे क्षेत्रफळ हे १००० वर्ग मीटर पेक्षा जास्त असल्यास त्याच्या भोवती ५० मीटर बफर विभागाची तरतूद असेल व सदर बफर विभाग सुद्धा सागर विनियमन विभाग १ ( सी आर झेड – I ए ) मधेय समाविष्ट होईल.

२. प्रवाळ व प्रवाळ बेटे

३. वाळूचे ढग

४. जीवशास्त्रीय दृष्ट्या सक्रीय दलदलीचे प्रदेश

५. राष्ट्रीय वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम १९७२ ( १९७२ चा ५३ ), वन ( संवर्धन ) अधिनियम ९८० ( १९८० चा ६९ किंवा पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) मधील तरतुदींच्या अन्वये स्थापित जैवशास्त्रीय राखीव विभागसाहित राष्ट्रीय उद्याने, सागरी उद्याने, अभयारण्ये, राखीव वने, वन्यजीव अधिवास, व अन्य संरक्षित विभाग समाविष्ट आहेत .

६. दलदलीच्या खारजमिनी

७. कासवांचे प्रजाजन होत असलेली जमीन

८. अश्वशक्ती खेकड्यांचे अधिवास

९. सागरी गवताळ जमीन

१०. पक्ष्यांच्या प्रजननाच्या जागा

११. पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या वास्तू किंवा विभाग व वारसास्थळे

**२.१.२ किनारपट्टी विनियमन विभाग १ ( सी आर झेड – I बी )**

अंतर मध्यंतर विभाग म्हणजे भरती व ओहोटीच्या रेषांमधील (ह्या नंतर एलटीएल - ओहोटीची रेषा म्हणून उल्लेख करण्यात येईल ) जमिनीचा भाग.

२.२ किनारपट्टी **विनियमन विभाग २ ( सी आर झेड – II )**

सद्य महानगरपालिका हद्दीतील किंवा पाणी पुरवठा, सांडपाणी नलिका इत्यादी पायाभूत सुविधा, अभिगम मार्ग, इत्यादी पुरविण्यात आलेले व एकूण भूखंडांच्या संख्येच्या तुलनेत ५० % भूखंड बांधकाम झालेले आहेत अशी अन्य कायदेशीररित्या निर्देशित समुद्र किनार्याला खेटुन असलेली क्षेत्रे किनारपट्टी विनियमन विभाग २ ( सी आर झेड –II ) मध्ये समाविष्ट होतात

**२.३किनारपट्टी विनियमन विभाग ३ ( सी आर झेड – III )**

तुलनेने अबाधित (म्हणजेच ग्रामीण भागातील इत्यादी ) जमिनी आणि सागर विनियमन विभाग २ ( सी आर झेड – II ) मधीलनसलेल्या जमिनी किनारपट्टी विनियमन विभाग २ ( सी आर झेड – III ) मध्ये समाविष्ट होतात. किनारपट्टी विनियमन विभाग २ ( सी आर झेड – III )ची खालील प्रमाणे वर्गवारी करण्यात येईल

सुनिल

Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019

**२.३.१किनारपट्टी विनियमन विभाग ३अ ( सी आर झेड – III A )**

सन २०११ च्या जनगणनेनुसार प्रती किलोमीटर लोकसंख्येची घनता २१६१ पेक्षा जास्त असलेल्या किनारपट्टी विनियमन विभाग ३ ( सी आर झेड – III A ) मधील दाट लोकवस्ती असलेल्या विभागांना सागर विनियमन विभाग ३ ( सी आर झेड – III A ) म्हणून निर्देशित करण्यात येईल व सदर किनारपट्टी विनियमन विभाग ३ ( सी आर झेड – III A ) मध्ये भरती रेषेपासून जमिनीकडील ५० मीटर क्षेत्र हे " ना विकास विभाग" म्हणून चिन्हांकित करण्यात येईल . मात्र विहित सल्ला मसलतीची प्रक्रिया पार पाडून सदर अधिसूचनेनुसार सी एम झेड पी मंजूर होईपर्यंत २०० मीटर्स पर्यंत " ना विकास क्षेत्र " लागू राहील , अशी तरतूद करण्यात येते .

**२.३.२किनारपट्टी विनियमन विभाग ३ ब ( सी आर झेड – III B )**

सन २०११ च्या जनगणनेनुसार प्रती किलोमीटर लोकसंख्येची घनता २१६१ पेक्षा कमी असलेल्या किनारपट्टी विनियमन विभाग ३ ( सी आर झेड – III ) मधील दाट लोकवस्ती असलेल्या विभागांना किनारपट्टी विनियमन विभाग ३ ब ( सी आर झेड – III B ) म्हणून निर्देशित करण्यात येईल व सदर किनारपट्टी विनियमन विभाग ३ ब ( सी आर झेड – III B ) मध्ये भरती रेषेपासून जमिनीकडील २०० मीटर क्षेत्र हे " ना विकास विभाग" म्हणून चिन्हांकित करण्यात येईल .

२.३.३

किनारपट्टी विनियमन विभाग ३ ( सी आर झेड – III ) मधील लाटांनी प्रभावित जलधींच्या बाजूने भरती रेषेपासून ५० मीटर पर्यंतचे जमिनीचे क्षेत्र किंवा खाडीची रुंदी ह्यापैकी जे कमी असेल , तेवढा भाग किनारपट्टी विनियमन विभाग ३ ( सी आर झेड – III ) मधील ना विकास क्षेत्र म्हणून चिन्हांकित करण्यात येईल.

**२.४ किनारपट्टी विनियमन विभाग ४ ( सी आर झेड – IV )**

जल क्षेत्र हे किनारपट्टी विनियमन विभाग ४ ( सी आर झेड – IV ) म्हणून निर्देशित करण्यात येईल व त्याचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करण्यात येईल.

२.४.१ सागर विनियमन विभाग ४ अ ( सी आर झेड – IV A )

ओहोटीची रेषा ते समुद्राकडील १२ सागरी मैलांचे अंतर यामधील समुद्र व पाण्याचे क्षेत्र हे किनारपट्टी विनियमन विभाग ४ अ ( सी आर झेड – IVA ) असेल.

**२.४.२. किनारपट्टी विनियमन विभाग ४ ब ( सी आर झेड – IV B )**

समुद्राच्या लाटांनी प्रभावित जलधीच्या किनाऱ्या वरील ओहोटीची रेषेपासून जलधीच्या मुखापासून ते लाटेच्या प्रभावक्षेत्रा पर्यंत विस्तारलेल्या विरुद्ध बाजूकडील ओहोटीची रेषे पर्यंत ; म्हणजेच वर्षातील सर्वात शुष्क मोसमातील दर हजारी ५ भाग खारेपणा असलेल्या क्षेत्राचा किनारपट्टी विनियमन विभाग ४ ब ( सी आर झेड – IVB ) मध्ये समावेश असेल.

**३.० किनारपट्टी विनियमन विभागात विशेष विचार करण्याची गरज असलेली क्षेत्रे**

# महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

सागर किनाऱ्यावरील पर्यावरणाची नाजूक स्थितीचे संरक्षण  व स्थानिक समुदाय तोंड देत असलेल्या अडचणींच्या प्रीत्यर्थ  खालील किनारपट्ट्यांचा विशेषत्वाने विचार करणे आवश्यक आहे.

**३.१. नाजूक स्थितीतील असुरक्षित सागर किनारे :**

बंगाल मधील सुंदरबन क्षेत्र व गुजरात मधील खंबायतचे व कच्छचे आखात, महाराष्ट्रातील मालवण, आजरा, - रत्नागिरी, कर्नाटक मधील कारवार व कुंदापूर , केरळ मधील वेंबनाड , तामिळनाडूतील मन्नारचे आखात, ओदिशातील भैतरकणिका, आंध्र प्रदेशातील कोरिंग, पूर्व गोदावरी व कृष्णा हे  पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ नुसार निर्धारित पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील विभाग असून नाजूक स्थितीतील असुरक्षित सागर किनारे म्हणून निर्धारित करणे आवश्यक आहे. तसेच शाश्वत उपजीविकेसाठी किनारपट्टी वरील साधनांवर अवलंबून असलेल्या मत्स्य व्यावसायिकांना सहभागी करून  घेऊन उपरोक्त विभागांचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

३.२. अंतर्भागातील पर्श्वजल बेटे व मुख्यभूमीच्या किनाऱ्याच्या बाजूने असलेल्या बेटांसाठी किनारपट्टी विनियमन विभाग

३.३ बृहन्मुंबईच्या महानगरपालिका हद्दीसाठी किनारपट्टी विनियमन विभाग

**४. किनारपट्टी विनियमन विभागात प्रतिबंध  असलेली कार्ये**

संपूर्ण किनारपट्टी विनियमन विभागात खालील कार्यांना सर्वसाधारणपणे प्रतिबंध असेल. आणि किनारपट्टी विनियमन विभागाच्या विशिष्ट वर्गवारीतील  म्हणजेच  सी आर झेड I , सी आर झेड II,  सी आर झेड III व सी आर झेड IV मधील  अनुज्ञेय व नियमित कार्ये त्याप्रीत्यर्थ असलेले अपवाद हे परिच्छेद ५ मधील तरतुदींनी शासित असतील. :

i. नवीन उद्योगांची स्थापना व सद्य अस्तित्वातील उद्योग, परीचालने किंवा प्रक्रियांचा   विस्तार.

ii. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक ४ एप्रिल २०१६ रोजीच्या अधिसूचना क्रमांक  सर्वसामान्य वैधानिक नियम ३९५ ( इ ) नुसार विनिर्दिष्ट धोकादायक पदार्थांची साठवणूक किंवा विल्हेवाट लावणे , तेलाचे उत्पादन व हाताळणी करणे

iii. नवीन मत्स्य प्रक्रिया केंद्रे सुरु करणे

iv. सदर अधिसूचनेनुसार अनुज्ञेय असलेली व सक्षम प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीने निष्पादित केलेली कार्ये वगळता जमिनीचे पुनःप्रापण , बंधारे बांधणे किंवा समुद्राच्या पाण्याचा नैसर्गिक ओघ बदलण्याचा प्रयत्न करणे

v. उद्योग, शहरे किंवा नगरे, व अन्य मानवी वस्त्यांमधून प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्याची  व निसृत पाण्याची विल्हेवाट

vi. बांधकामाचा राडारोडा, औद्योगिक घन कचरा, राख इत्यादी सहित शहरातील किंवा गावातील कचरा जमिनीच्या भरावार्थ राशीपाटन करणे

vii. किनारपट्टीची मोठ्या प्रमाणवर धूप करणारे बंदरे प्रकल्प

viii. वाळू, खडक, व अन्य उपस्तरिय साहित्याचे खनन

ix. वाळूच्या सक्रीय टेकड्या संस्करित किंवा बदलणे

x. जल प्रणाली व सागरी जीवनाच्या सुरक्षिततेची खबरदारी घेण्यासाठी सागराच्या पाण्यात प्लास्टिकची विल्हेवाट लावण्यास प्रतिबंध करण्यात येईल व सी आर झेड मध्ये प्लास्टिकचे व्यवस्थापन व विल्हेवाट लावण्यासाठी पर्याप्त उपाययोजना करणे आवश्यक आहे.

xi. भूजलाचा उपसा

**५. किनारपट्टी विनियमन विभागा ( सी आर झेड )  मधील अनुज्ञेय कार्याचे नियमन**



**Sunil SainathBhagwat   Government Empanelled and AuthorisedTranslator  vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

### ५.१ किनारपट्टी विनियमन विभाग ( सी आर झेड I )

### ५.१.१ किनारपट्टी विनियमन विभाग ( सी आर झेड 1 A )

सदर विभाग हे पर्यावरणदृष्ट्या अतिशय संवेदनशील असतात व खालील अपवाद वगळता, किनारपट्टी विनियमन विभागात ( सी आर झेड 1 A ) कोणत्याही कार्यांना सर्वसाधारणपणे कोणत्याही कार्यांना परवानगी देऊ नये

i. सी झेड एम पी मधील सूचित पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील विभागांसाठी सल्ला मसलत , सर्वाज्जानिक सुनावणी, इत्यादी विहित प्रक्रिया व त्यामधील सूचित पर्यावरणीय सुरक्षा उपायांच्या व खबरदारीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या सदर अधिसूचने नुसारच्या तयार करण्यात आलेल्या पर्यावरण – पर्यटनाच्या योजनेच्या अधीन राहून पूर्वनिर्धारित पट्ट्यात व क्षेत्रात खारफुटीच्या वनातून फेरफटका, वृक्षनिवास , नैसर्गिक माग इत्यादी कार्यांना परवानगी देता येईल.

ii. खारफुटी वनांच्या बफर क्षेत्रात सार्वजनिक प्रयोजनार्थ नलिका , पारेषण तारा, वहन प्रणाली किंवा अभिक्रिया , व घोडेकाठीवर रस्ते बांधणी यासारख्या कार्यांना परवानगी देण्यात येईल.

iii. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण यांनी शिफारस केलेला व पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाने मंजुरी दिलेल्या तपशीलवार समुद्री किंवा भूमी किंवा दोन्हीच्या पर्यावरण आघात मूल्यमापन अभ्यासंचय अधीन राहून केवळ संरक्षण, मोक्याच्या सार्वजनिक प्रयोजनार्थ घोडेकाठी वरील रस्त्यास व सर्वसामान्य रस्त्याच्या कामास परवानगी देण्यात येईल. तसेच सदर रस्ता हा खारफुटीच्या वनातून जात असेल किंवा त्यामुळे खारफुटीच्या वनांना नुकसान होणार असेल, तर त्यासाठीच्या भरपाईपोटी प्रभावित किंवा नष्ट होणाऱ्या किंवा तोडल्या जाणाऱ्या खारफुटीच्या वनांच्या किमान तिप्पट क्षेत्रफळावर खारफुटी वन लावणे बंधनकारक असेल.

### ५.१.२ किनारपट्टी विनियमन विभाग ( सी आर झेड 1 B ) : अंतर मध्यंतर ( भरती व ओहोटी मधील प्रदेश ) विभाग

सी आर झेड 1 B विभागात खालील प्रमाणे कार्ये विनियमित वा अनुज्ञेय असतील .

i. फक्त खालील प्रकारच्या कार्यासाठीच भूमी पुनर्प्रापण , बांधबंदिस्ती इत्यादीसाठी परवानगी देण्यात येईल

a. बंदरे , लहान धक्के, धक्के, बोटीचे धक्के, गोदीतील लाकडी उतार, पूल, तटरक्षक दलासाठी तरंगते धक्के, समुद्र जोडण्या इत्यादी किनारी प्रदेशाच्या लगतच्या सुविधा

b. सरंक्षण, सुरक्षा व मोक्याच्या प्रयोजनार्थ प्रकल्प

c. घोडेकाठी वरील रस्ते ; मात्र सद्य अस्तित्वातील भरतीरेषे पर्यंत अशा रस्त्यांच्या जमिनीकडील बाजूवर विकसन अनुज्ञेय करण्यासाठी अशा ( घोडेकाठी ) रस्त्यांवरून परवानगी प्राधिकृत असू नये
अशी तरतूद करण्यात येते की पुनर्प्रापित केलेल्या जमिनीचा उपयोग फक्त सार्वजनिक जलद अथवा बहुपर्यायी प्रवास प्रणाली, सदर प्रवास किंवा वाहतूक प्रणाली परीचालीत करण्यासाठी विद्युत किंवा इलेक्ट्रोनिक संकेत प्रणाली , अनुज्ञेय रचना असलेले प्रवास थांबे हयासह आवश्यक व संबंधित सार्वजनिक सुविधा व पायाभूत सुविधा उभारणे किंवा बांधणे प्रयोजनार्थ अनुज्ञेय असावा ; ह्यामध्ये कोणतेही औद्योगिक परिचालन,दुरुस्ती किंवा देखभाल समाविष्ट नाही.

d. धूप नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना

e. तटरक्षक दलासाठी जलमार्ग, वाहिन्या, बंदर व तरंगते धक्के यांची देखभाल व ते निर्बाध करणे

f. वाळूच्या बंधाऱ्यांना प्रतिबंध करण्यासाठी, लाटांची नियमन उपकरणे उभारणे, पावसाळी पाण्याच्या नलिका अंथरणे, किंवा खारेपणाचा शिरकाव प्रतिबंधित करण्यासाठी व गोड्या पाण्याच्या पुनार्भारणासाठी बांधकाम करणे

ii. बंदरे , लहान धक्के, धक्के, बोटीचे धक्के, गोदीतील लाकडी उतार, पूल, धूप नियंत्रण उपाय योजना , नलिका, दिप्गृहे, जलवाहतूक सुरक्षा सुविधा , किनारपट्टी पोलीस ठाणी, तटरक्षक दल ठाणे, आणि तत्सम किनारपट्टीलगतच्या सुविधा किंवा पाण्याशी संबंधित कार्ये

iii. अपारंपरिक उर्जा स्त्रोतांच्या द्वारे उर्जा व संबंधित सुविधा

iv. जहाजावरून बंदरावर , अंतिम स्थानके व शुद्धीकरण कारखान्यात त्याचप्रमाणे उलट दिशेने धोकादायक पदार्थांचे अंतरण करण्यासाठी

v. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयातील तेल उद्योग सुरक्षा संचालनालय व पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेल्या दिशानिर्देशांसहित सुरक्षा नियमावलीच्या अधीन राहून सदर अधिसूचनेच्या जोडपत्र II मध्ये विर्निर्दिष्ट केल्यानुसार पेट्रोलियम उत्पादने व द्रविकृत नैसर्गिक वायू प्राप्त करून साठवणूक करण्यासाठी सुविधा . अशी तरतूद करण्यात येते की अशा सुविधा खते व खतांसाठी आवश्यक अशा अमोनिया, फोस्फारिक आम्ल, गंधक, गांधाकीय आम्ल , नत्र आम्ल यासारखा कच्चा माल प्राप्त करून साठवणूक करण्यासाठी असाव्यात

vi. अधिसूचित बंदरात धोकादायक नसलेल्या खाद्यतेल, खते व अन्नधान्या सारख्या जहाजी मालाची साठवणूक

vii. उबवणी केंद्र व नैसर्गिक मत्स्य वाळवण

viii. खालील बाबींच्या अधीन राहून सद्य अस्तित्वातील मत्स्य प्रक्रिया केंद्रे आधुनिकीकरणाच्या ( अतिरिक्त उपकरणे व प्रदूषण नियंत्रण उपाययोजना ) प्रयोजनार्थ जोत्याच्या २५ % अतिरिक्त क्षेत्रफळाचा उपयोग करू शकतात

a. सदर पुनर्बांधकामाचा चटई क्षेत्र निर्देशांक हा अभिभावी नगर व ग्रामीण नियोजन विनियमांच्या नुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाच्या पेक्षा जास्त नसावा

b. अतिरिक्त जोत्याचे बांधकाम हे जमिनीच्या दिशेने असावे.

c. संबंधित राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण समिती याची मंजुरी असावी

ix. सांडपाणी व निसृत होणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्याची सुविधा व परिष्कृत पाणी वाहून नेण्यासाठी सुविधा

x. पावसाळी पाण्याची गटारे

xi. मोक्याचे व संरक्षणाशी संबंधित म्हणून वर्गीकृत केलेले प्रकल्प व भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाचे प्रकल्प

xii. आण्विक धातू संचालनालयाने संशोधन व सामान्वेषण प्रयोजनार्थ मंजुरी दिलेल्या खनिकर्म योजनेनुसार भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाने प्राधिकृत केलेल्या भरती व ओहोटी रेषेच्या दरम्यान विभागात आढळणाऱ्या एक किंवा अनेक खनिजांच्या किंवा खनिकर्म व खनिजे ( विकसन व नियमन ) अधिनियम १९५७ ( १९५७ चा ६७ ) च्या पहिल्या अनुसूची ब भागानुसार अधिसूचित केलेल्या आण्विक खनिजांचे हस्त खनिकर्म कार्य
अशी तरतूद करण्यात येते की भरती व ओहोटी रेषेच्या दरम्यान आढळून येणाऱ्या खनिज किंवा धातुकांचे संकलन करण्यासाठी गिरमीट व सुरुंग किंवा जड माती उपसा यंत्रांचा उपयोग किंवा पखरण न करता फावडे व टोपल्या यांचा उपयोग करणाऱ्या माणसांनी हाताने खनिकर्म परीचालीत करणे आवश्यक आहे.

xiii. तेल व नैसर्गिक वायू यांचे समन्वेषण व उद्खनन व त्याच्याशी संबंधित कार्ये व सुविधा

xiv. जशी बाब असेल त्यनुसार , पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या पर्यावरणीय मापदंडानुसार व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदूषण नियंत्रण समितीच्या संबंधित दिशानिर्देशा नुसार, कच्च्या मालाची वाहतूक करण्यासाठी आवश्यक किनाऱ्यालगतच्या सुविधा , शीतल पाण्याच्या अंतर्ग्रहणासाठी सुविधा, पृथक्करण यंत्रसामग्रीसाठी पाण्याचे अंतर्ग्रहण इत्यादी व औष्णिक वीज केंद्रातील परिष्कृत केलेले सांडपाणी किंवा शितन करणाऱ्या पाण्याचा विग्रह

xv. नलिका व पारेषण तारांसह वहन प्रणाली

xvi. चक्रीवादळाचे अंदाज वर्तविण्यासाठी रडार , सागर निरीक्षण मंच, व संबंधित कार्ये

xvii. मिठागरे व संबंधित सुविधा ;

xviii. जलशुद्धीकरण प्रकल्प व संबंधित सुविधा

**५.२ किनारपट्टी विनियमन विभाग ( सी आर झेड II )**

i. सी आर झेड 1 B मधील सर्व अनुज्ञेय कार्ये जेवढी लागू असतील तेवढी सी आर झेड II सुद्धा अनुज्ञेय आहेत .

ii. रहिवास, शाळा, रुग्णालये, संस्था, कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे इत्यादी प्रयोजनार्थ इमारतींचे बांधकाम हे सद्य अस्तित्वातील रस्त्याच्या किंवा अस्तित्वातील अधिकृत स्थावर बांधकामाच्या जमिनीकडील बाजूला अनुज्ञेय असेल

अशी तरतूद करण्यात येते की सद्य अस्तित्वातील रस्त्याच्या सागराकडील बाजूला बांधण्यात आलेल्या कोणत्याही नवीन रस्त्याच्या जमिनीकडील बाजूला इमारतींचे बांधकाम अनुज्ञेय असणार नाही

iii. उपरोक्त ( ii ) मधील अनुज्ञेय इमारती ह्या वेळोवेळी लागू असलेल्या स्थानिक नगर व ग्रामीण नियोजन विनियमांच्या व अधिसूचनेच्या दिनांकाच्या दिवशी अभिभावी चटई क्षेत्र निर्देशांक किंवा चटई क्षेत्र गुणोत्तराच्या अधीन असतील. सदर अधिसूचना राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या दिनांकानंतर चटई क्षेत्र निर्देशांकात दुरुस्ती करण्याची गरज भासल्यास स्थानिक नगर संस्था किंवा राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासनाने, जशी बाब असेल त्यानुसार संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या मार्फत पर्यावरण , वन व हवामान बदल मंत्रालयाला अभिगमित होऊन , आपल्या अभिप्रायासह राष्ट्रीय किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाला सदर प्रीत्यर्थ प्रस्ताव सादर करावेत. राष्ट्रीय किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने सार्वजनिक सुविधांची उपलब्धता, पर्यावरण संरक्षणाचे उपाय इत्यादी विविध पैलूंचे परीक्षण करून प्रस्तावावर उचित निर्णय करावा. त्या त्या घनकचरा व्यवस्थापन नियमानुसार घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची व अपरिष्कृत स्वरूपातील कोणताही कचरा हा किनाऱ्यावर किंवा किनाऱ्यावरील पाण्यात टाकला जाणार नाही, याची खबरदारी घेण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक नगर नियोजन प्राधिकरणाची असेल.

iv. वेळोवेळी लागू असलेल्या स्थानिक नगर व ग्रामीण नियोजन विनियमांच्या व अधिसूचनेच्या दिनांकाच्या दिवशी अभिभावी चटई क्षेत्र निर्देशांक किंवा चटई क्षेत्र गुणोत्तराच्या अधीन राहून जमिनीच्या उपयोगात बदल न करता अस्तित्वातील अधिकृत इमारतींच्या पुनर्बांधणीसाठी परवानगी देण्यात येईल . सदर अधिसूचना राजपत्रात प्रकाशित झाल्याच्या दिनांकानंतर चटई क्षेत्र निर्देशांकात दुरुस्ती करण्याची गरज भासल्यास स्थानिक नगर संस्था किंवा राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासनाने, जशी बाब असेल त्यानुसार संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या मार्फत पर्यावरण , वन व हवामान बदल मंत्रालयाला अभिगमित होऊन , आपल्या अभिप्रायासह राष्ट्रीय किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाला सदर प्रीत्यर्थ प्रस्ताव सादर करावेत. राष्ट्रीय किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने सार्वजनिक सुविधांची उपलब्धता, पर्यावरण संरक्षणाचे उपाय इत्यादी विविध पैलूंचे परीक्षण करून प्रस्तावावर उचित निर्णय करावा. त्या त्या घनकचरा व्यवस्थापन नियमानुसार घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची व अपरिष्कृत स्वरूपातील कोणताही कचरा हा किनाऱ्यावर किंवा किनाऱ्यावरील पाण्यात टाकला जाणार नाही, याची खबरदारी घेण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक नगर नियोजन प्राधिकरणाची असेल.

v. समुद्राकाठी निवारागृहे किंवा हॉटेल किंवा पर्यटन विकसन प्रकल्प प्रयोजनार्थ निर्धारित क्षेत्रातील मोकळया भूखंडांचे विकसन हे सदर अधिसूचनेच्या जोडपत्र – III मधी अटी किंवा दिशानिर्देशांच्या अधीन असेल.

vi. समुद्राकाठी तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील व त्यामध्ये खोपटी, प्रसाधनगृहे किंवा स्वच्छतागृहे, कपडे बदल सुविधा, तुषार वर्षावगृह, एकमेकांशी जोडलेल्या फरसबंदीचा वापर करून बांधलेले चलमार्ग, पिण्याच्या पाण्याची सुविधा, बैठक व्यवस्था इत्यादी तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील. मात्र विहित केलेली सल्ला मसलत किंवा सार्वजनिक सुनावणी प्रक्रियेचा अवलंब करून तयार करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट पर्यटन नियोजनाच्या व पर्यावरणीय सुरक्षा उपायांच्या अधीन राहून सदर सुविधा अनुज्ञेय असतील. तसेच सदर सुविधा स्थापित करण्यासाठी भरती रेषेपासून १० मीटरचे किमान अंतर ठेवणे आवश्यक आहे.

**५.३ किनारपट्टी विनियमन विभाग ( सी आर झेड III )**

i. सी आर झेड 1 B मधील सर्व अनुज्ञेय कार्ये जेवढी लागू असतील तेवढी सी आर झेड III सुद्धा अनुज्ञेय आहेत .

ii. ना विकास विभागातील कार्याचे विनियमन
ना विकास विभागात खालील कार्ये अनुज्ञेय व विनियमित असतील

a. विद्यमान चटई क्षेत्र निर्देशांक, जोते क्षेत्रफळ, घनता ह्या पेक्षा अधिक नसलेल्या अधिकृत बांधकामांची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी, तसेच सदर अधिसूचनेनुसार अनुज्ञेय कार्ये व त्याप्रीत्यर्थ आवश्यक सुविधा, मत्स्य व्यावसायिकांच्या सह किनारपट्टीवरील पारंपारिक समुदायांच्या रहिवासी गाळयांचे बांधकाम किंवा पुनर्बांधकाम ह्यामध्ये आपत्ती व्यवस्थापनाच्या आवश्यक तरतुदी व स्वच्छता सुविधा समाविष्ट करून दिलेल्या मंजुरी वगळता, सी आर झेड III मधील ना विकास विभागात कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यात येऊ नये.

b. शेती, फलोद्यान, उद्याने, गायरान, उद्याने, क्रीडांगणे, व वनीकरण

c. दवाखाने, शाळा, पावसापासून सार्वजनिक निवारा, सामुदायिक स्वच्छतागृहे, पूल , रस्ते, पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक सुविधांची तरतूद, सांडपाणी विल्हेवाट, दहनभूमी, दफनभूमी, किनारपट्टी व विद्युत उपकेंद्र ह्याच्या बांधकामास स्थानिक रहिवाशांच्या आवश्यकतेनुसार किनारपट्टी विभाग व्यवस्थापन प्राधिकरणाने बाबवार परवानगी द्यावी

d. संबंधित प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा समितीच्या पूर्व परवानगीने घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट ह्यासाठी आवश्यक बांधकामास किंवा अनुषंगिक कामांना परवानगी द्यावी .

e. स्थानिक मत्स्य व्यावसायिकांसाठी आवश्यक अशा मासे वाळवण आवार , लिलाव सभागृहे, जाळे दुरुस्ती आवार, पारंपारिक होडी बांधणी आवार, बर्फगृह, मत्स्य प्रक्रिया सुविधा व तत्सम सुविधा

f. सी आर झेड III मधील ना विकास विभागाच्या ज्या भागातून राष्ट्रीय किंवा राज्य महामार्ग जात असेल, तिथे रस्त्याच्या समुद्राकडील बाजूला स्वच्छतागृहे, कपडे बदलण्याच्या सुविधा , पिण्याच्या पाण्याच्या सुविधा व तात्पुरती खोपटे अशा तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय आहेत.
ना विकास विभागातील अशा रस्त्यांच्या जमिनीकडील बाजूस विश्रामगृहे किंवा हॉटेल व संबंधित पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील . मात्र सदर अधिसूचनेनुसार मंजूर किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट पर्यटन योजना व सोबत जोडलेल्या जोडपत्र III मधील अटी किंवा दिशानिर्देशांच्या अधीन राहूनच सदर कार्ये अनुज्ञेय आहेत.

g. ना विकास विभागात व सी आर झेड III मधी समुद्राकाठी तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील व त्यामध्ये खोपटी, प्रसाधनगृहे किंवा स्वच्छतागृहे, कपडे बदल सुविधा, तुषार वर्षावगृह, एकमेकांशी जोडलेल्या फरसबंदीचा वापर करून बांधलेले चलमार्ग, पिण्याच्या पाण्याची सुविधा, बैठक व्यवस्था इत्यादी तात्पुरत्या पर्यटन सुविधा अनुज्ञेय असतील. मात्र विहित केलेली सल्ला मसलत किंवा सार्वजनिक सुनावणी प्रक्रियेचा अवलंब करून तयार करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट पर्यटन नियोजनाच्या व पर्यावरणीय सुरक्षा उपायांच्या अधीन राहून सदर सुविधा अनुज्ञेय असतील. तसेच सदर सुविधा स्थापित करण्यासाठी भरती रेषेपासून १० मीटरचे किमान अंतर ठेवणे आवश्यक आहे

h. आण्विक धातू संचालनालयाने संशोधन व सामान्वेषण प्रयोजनार्थ मंजुरी दिलेल्या खनिकर्म योजनेनुसार भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाने प्राधिकृत केलेल्या भरती व ओहोटी रेषेच्या दरम्यान विभागात आढळणाऱ्या एक किंवा अनेक खनिजांच्या किंवा खनिकर्म व खनिजे ( विकसन व नियमन ) अधिनियम १९५७ ( १९५७ चा ६७ ) च्या पहिल्या अनुसूची ब भागानुसार अधिसूचित केलेल्या आण्विक खनिजांचे हस्त खनिकर्म कार्य

iii. सी आर झेड III ना विकास विभागाच्या पलीकडे कार्याचे विनियमन

a. सदर अधिसूचनेच्या सोबत जोडलेल्या जोडपत्र III मधील अटी किंवा दिशानिर्देशांच्या अधीन राहून निदेशित विभागातील रिकाम्या भूखंडांचे समुद्राकाठी विश्रामगृहे किंवा हॉटेल किंवा पर्यटन विकसन प्रकल्पांच्या बांधकामासाठी विकसन प्रयोजनास परवानगी असेल.

b. सद्य अस्तित्वातील मत्स्य गावातील पारंपारीक अधिकार व उपयोगात असलेल्या रहिवासी गाळ्यांची बांधणी किंवा पुनर्बांधणीसाठीची परवानगी ही बांधकामाच्या ९ मीटर उंची पर्यंत व ( तळ मजला + पहिला मजल ) अशा दोन मजल्यांसाठी व नगर तसेच गाव नियोजन नियमांच्या अधीन असेल.

c. सद्य अस्तित्वातील जोत्याच्या किंवा रचनेच्या क्षेत्रफळात किंवा दर्शनी भागात बदल न करता " घरगुती मुक्कामाची " पर्यटन सुविधा देण्यास मत्स्य व्यावसायिकांच्या सहित सर्व स्थानिक समुदायांना परवानगी देण्यात यावी

d. सार्वजनिक पाउस निवारे, सामुदायिक स्वच्छतागृहे, पाणी पुरवठा, सांडपाणी नलिका, रस्ते, पूल इत्यादींची बांधकामे

e. चुनखडीचे खनिकर्म :

f. चुनखडी खनिजांचे उद्खनन भरतीरेषेच्या १ मीटर उंचीच्या खाली केली जाणार नाही व खारे पाणी न घुसण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना म्हणून बांध घालण्यात येईल तसेच किनारपट्टीवरील पाण्याचे प्रदूषण व किनारपट्टीची धूप रोखण्यासाठी सुरक्षिततेच्या योग्य उपाययोजना करण्याच्या अधीन राहून व वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद , केंद्रीय खनिकर्म संशोधन संस्था इत्यादीं खनिकर्म क्षेत्रातील नामवंत राष्ट्रीय संस्थांनी केलेल्या शिफारशींच्या आधारे विशिष्ट निर्धारित क्षेत्रांमध्ये चुनखडी खानिजाच्या निवडक खानिकर्मास परवानगी देण्यात यावी.

iv. भरतीच्या रेषेपासून २०० मीटर्सच्या आत स्थानिक समुदायांनी वस्ती केलेले क्षेत्र वगळता अन्यत्र भूजलाचा उपसा करण्यास किंवा तत्संबंधीच्या बांधकामास प्रतिबंध करण्यात येईल. तसेच जिथे पाण्याचा कुठलाही स्त्रोत उपलब्ध नसेल तिथे भरतीच्या रेषेपासून २०० ते ५०० मीटर्स पर्यंत हाती साधनांनी खुल्या विहिरीतून पेयजल, फळबागा, शेती ,



**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

मासेमारी इत्यादी प्रयोजनार्थ भूजलाचा उपसा अनुज्ञेय करावा . तसेच समुद्राचे पाणी घुसल्यामुळे प्रभावित झालेल्या भागात राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेशांनी प्राधिकृत केलेल्या प्रधीकरणाने अशा उपश्यासाठी निर्बंध घालावेत. मात्र फलोद्यान, शेती व राज्य शासनाने पुरस्कृत केलेल्या सूक्ष्म सिंचन योजनांना भूजलाचा उपसा अनुज्ञेय करण्यात यावा.

v. सी आर झेड III क्षेत्रामध्ये पर्याप्त पर्यावरणीय सुरक्षा उपायांसह पडीक व शेतीस योग्य नसलेल्या जमिनींवर विमानतळाचे विकसन

**५.४ किनारपट्टी विनियमन विभाग ( सी आर झेड IV )**

सी आर झेड IV मध्ये खालील कार्ये अनुज्ञेय व विनियमित असतील :

i. स्थानिक समुदायांनी हाती घेतलेली पारंपारिक मासेमारी व सलंग्न कार्ये

ii. फक्त खालील प्रकारच्या कार्यासाठीच भूमी पुनर्प्रापण , बांधबंदिस्ती इत्यादीसाठी परवानगी देण्यात येईल

a. बंदरे , लहान धक्के, धक्के, बोटीचे धक्के, गोदीतील लाकडी उतार, पूल, तटरक्षक दलासाठी तरंगते धक्के, समुद्र जोडण्या इत्यादी किनारी प्रदेशाच्या लगतच्या सुविधा

b. सरंक्षण, सुरक्षा व मोक्याच्या प्रयोजनार्थ प्रकल्प

c. धूप नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना

d. जलमार्ग, वाहिन्या, बंदर व तरंगते धक्के यांची देखभाल व ते निर्बाध करणे

e. वाळूच्या बंधाऱ्यांना प्रतिबंध करण्यासाठी, लाटांची नियमन उपकरणे उभारणे, पावसाळी पाण्याच्या नलिका अंथरणे, किंवा खारेपणाचा शिरकाव प्रतिबंधित करण्यासाठी व गोड्या पाण्याच्या पुनार्भारणासाठी बांधकाम करणे

iii. बंदरे , लहान धक्के, धक्के, बोटीचे धक्के, गोदीतील लाकडी उतार, पूल, धूप नियंत्रण उपाय योजना , नलिका, दिप्गृहे, जलवाहतूक सुरक्षा सुविधा , किनारपट्टी पोलीस ठाणी, तटरक्षक दल ठाणे, आणि तत्सम किनारपट्टीलगतच्या सुविधा किंवा पाण्याशी संबंधित कार्ये

iv. समुद्री वारे, लाटा, सागरी औष्णिक उर्जेचे रूपांतरण इत्यादी अपारंपरिक उर्जा स्त्रोतांच्या द्वारे उर्जा व संबंधित सुविधा

v. जहाजावरून बंदरावर धोकादायक पदार्थांचे अंतरण करण्यासाठी

vi. अधिसूचित बंदरात धोकादायक नसलेल्या खाद्यतेल, खते व अन्नधान्या सारख्या जहाजी मालाची साठवणूक

vii. सांडपाणी व निसृत होणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्याची सुविधा व परिष्कृत पाणी वाहून नेण्यासाठी सुविधा

viii. मोक्याचे व संरक्षणाशी संबंधित म्हणून वर्गीकृत केलेले प्रकल्प व भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाचे प्रकल्प

ix. अणुउर्जा विभागाचे प्रकल्प

x. तेल व नैसर्गिक वायू यांचे समन्वेषण व उद्खनन व त्याच्याशी संबंधित कार्ये व सुविधा

xi. आण्विक धातू संचालनालयाने संशोधन व सामान्वेषण प्रयोजनार्थ मंजुरी दिलेल्या खनिकर्म योजनेनुसार भारत सरकारच्या अणुउर्जा विभागाने प्राधिकृत केलेल्या भरती व ओहोटी रेषेच्या दरम्यान विभागात आढळणाऱ्या एक किंवा अनेक खनिजांच्या किंवा खनिकर्म व खनिजे ( विकसन व नियमन ) अधिनियम १९५७ ( १९५७ चा ६७ ) च्या पहिल्या अनुसूची ब भागानुसार अधिसूचित केलेल्या आण्विक खनिजांचे हस्त खनिकर्म कार्य

xii. जशी बाब असेल त्यनुसार , पर्यावरण, वने व हवामानबदल मंत्रालयाने अधिसूचित केलेल्या पर्यावरणीय मापदंडानुसार व केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ किंवा राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ किंवा प्रदुषण नियंत्रण समितीच्या संबंधित दिशानिर्देशा नुसार, कच्च्या मालाची वाहतूक करण्यासाठी आवश्यक किनाऱ्यालगतच्या सुविधा , शीतल पाण्याच्या अंतर्ग्रहणासाठी सुविधा, पृथक्करण यंत्रसामग्रीसाठी पाण्याचे अंतर्ग्रहण इत्यादी व औष्णिक वीज केंद्रातील परिष्कृत केलेले सांडपाणी किंवा शितन करणाऱ्या पाण्याचा विग्रह

xiii. नलिका व पारेषण तारांसह वहन प्रणाली

xiv. चक्रीवादळाचे अंदाज वर्तविण्यासाठी रडार , सागर निरीक्षण मंच, व संबंधित कार्ये

xv. खालील तरतुदींच्या अधीन राहून व पर्याप्त पर्यावरणीय खबरदारी घेऊन अपवादात्मक बाबतीत संबंधित राज्य शासनाकडून सी आर झेड IV मध्ये स्मारके किंवा स्मृतीस्थळे आणि अनुषंगिक सुविधांचे बांधकाम

a. पर्यावरणीय परामुल्यासह विविध परामुल्यांवरील पासंग साचा तसेच विचार झालेल्या पर्यायी स्थळांच्या तपशिलासहसी आर झेड IV मध्ये प्रकल्पाचे ठिकाण निर्धारित करण्याबाबतचे समर्थनीय कारण संबंधित राज्य सरकारने संबंधित राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरणाला सादर करावे. सदर प्राधिकरण प्रकल्पाचा अभ्यास करून केंद्र शासनाच्या पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाला राज्य शासनाने पर्यावरणीय आघात मूल्यमापन अहवाल तयार करण्याच्या प्रीत्यर्थ संदर्भ अटींच्या मंजुरीसाठी शिफारस करेल.

b. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या पर्यावरणीय आघात मूल्यमापनाविषयीच्या अधिसूचना क्रमांक विशेष आदेश १५३ ( इ ) मध्ये विहित केलेल्या प्रक्रियेनुसार केंद्र शासनाकडून संदर्भ अटींची मंजुरी आल्यानंतर राज्य शासन प्रकल्पाच्या अनुषंगाने सार्वजनिक सुनावणी संचालित करण्यासाठी , पर्यावरण व्यवस्थापन योजना, प्रत्यक्ष ठिकाणी ( on site ) आणि ऑफ साईट आपत्कालीन निर्वासन योजना समाविष्ट असलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेसह जोखीम मूल्यमापन अहवाल यासह पर्यावरणीय आघात मूल्यमापन अहवाल राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाला सादर करेल.

c. उप परिच्छेद मधील संदर्भित सार्वजनिक सुनावणीत लोकांनी उपस्थित केलेल्या संबंधित मुद्द्यांचे निराकरण केल्यावर संबंधित राज्य शासन , पर्यावरण व्यवस्थापन योजना, प्रत्यक्ष ठिकाणी ( on site ) आणि ऑफ साईट आपत्कालीन निर्वासन योजना समाविष्ट असलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेसह जोखीम मूल्यमापन अहवाल यासह पर्यावरणीय आघात मूल्यमापन अंतिम अहवाल राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अभ्यासार्थ व केंद्र शासनाच्या पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाला शिफारस करण्यासाठी सादर करेल.

d. प्रकल्पामुळे लोकांचे पुनर्वसन किंवा पुनर्वसाहन होण्याचा संबंध नाही किंवा प्रकल्पाचे ठिकाण मानवी वस्तीपासून दूर असल्याची केंद्र शासनाच्या पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाची खात्री पटल्यास , उप परिच्छेद ( ब) मध्ये उल्लेखित सार्वजनिक सुनावणीच्या बाबतीत केंद्र शासन सूट देऊ शकते

**५.५ अणुउर्जा विभागाच्या प्रतिष्ठापनापासून निपटारयाची आवश्यकता**

अणुउर्जा नियमन मंडळाच्या दिशानिर्देशानुसार विनिर्दीष्टीत हद्दीच्या मर्यादेत नवीन बांधकामांच्या सहित कुठलेही विकासानात्मक कार्य हाती घेण्यापूर्वी, अणुउर्जा विभागाच्या प्रतिष्ठापनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

६. **किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना**

i. दिनांक ६ जानेवारी २०११ रोजीच्या किनारपट्टी नियमन विभाग अधिसूचना क्रमांक विशेष आदेश क्रमांक १९ ( इ ) मधील तरतुदी नुसार तयार केलेल्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेमध्ये सर्व किनारपट्टीवरील राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना सदर अधिसूचनेनुसार बदल अथवा अद्ययावत करून लवकरात लवकर केंद्र शासनाच्या पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाच्या मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्प कार्यांना सदर अधिसूचनेतील तरतुदी लागू असतील त्यांचे सुद्धा सदर अधिसूचनेच्या अंतर्गत अद्ययावत किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेनुसार आगणन करणे आवश्यक आहे. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना जोपर्यंत सदर अधिसूचनेनुसार बदल वा अद्यायावत होत नाही , तोवर सन २०११ च्या किनारपट्टी नियमन विभाग अधिसूचनेनुसार तयार केलेल्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेतील तरतुदी अशा प्रकल्प कार्यांच्या आगणन व किनारपट्टी नियमन विभागाच्या निपटारा प्रमाणपत्रासाठी लागू राहतील.

ii. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्रासहित अन्य नामवंत व अनुभवी वैज्ञानिक संस्थांचे साहाय्य घेऊन व संबंधित हितसंबंधीयांशी सल्लामसलत करून किनारपट्टीवरील राज्यांनी व केंद्रशासित प्रदेशांनी आपापले किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना तयार किंवा अद्ययावत कराव्यात .

iii. किनारपट्टीवरील राज्ये व केंद्रशासित प्रदेश हे १ : १२५००० ह्या प्रमाणात किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेच मसुदा तयार करतील व सदर अधिसूचनेच्या जोडपत्र IV मधील दिशानिर्देशानुसार त्यांच्या अधिपत्याच्या खालील प्रदेशातील किनारपट्टी नियमन विभागांचे निर्धारण व वर्गवारी करावी. ह्यासाठी सार्वजनिक सुनावणी समाविष्ट आहे.

iv. पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) मधील विहित प्रक्रियेनुसार राज्य शासन व केंद्रशासित प्रदेशांनी उचित सल्ला मसलती व शिफारशीसह सदर अद्ययावत किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाला मुल्यामापनार्थ सादर करावी.

v. त्यानंतर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय संबंधित राज्य शासने किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेच विचार करून त्यास मान्यता देईल.

vi. सर्वसामान्यपणे किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत पाच वर्षांच्या कालावधी पर्यंत दुरुस्ती करण्यात येऊ नये. त्यानंतर संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत सुधारणा करण्याचा विचार करावा.

७. **अनुज्ञेय व विनियमित कार्यांसाठी किनारपट्टी विनियमन विभाग समाशोधन – प्रत्यायोजन**

i. सदर अधिसूचनेतील तरतुदी ज्या अनुज्ञेय किंवा विनियमित प्रकल्प कार्यांना लागू होतात, त्या सुरु करण्यापूर्वी किनारपट्टी विनियमन विभाग समाशोधन प्राप्त करणे आवश्यक आहे.

ii. सी आर झेड I व सी आर झेड IV मधील जी विकासात्मक कार्ये किंवा प्रकल्प सदर अधिसूचनेतील तरतुदी ज्या अनुज्ञेय किंवा विनियमित आहेत, त्यांच्या किनारपट्टी विनियमन विभाग समाशोधनाच्या बाबतीत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीच्या आधारे कार्यवाही करेल.

iii. सदर अधिसूचनेनुसार जी अनुज्ञेय व विनियमित कार्ये पूर्णपणे सी आर झेड II व सी आर झेड III मध्ये मोडतात, तेथील समाशोधनाचा विचार संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण करेल . तसेच सदर प्रकल्प हे सी आर झेड I किंवा सी आर झेड IV किंवा त्या दोन्ही विभागातून पार होत असतील, तर त्यांच्या किनारपट्टी विनियमन विभाग समाशोधनाच्या बाबतीत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीच्या आधारे कार्यवाही करेल.

iv. ज्या प्रकल्प किंवा कार्यांना सदर तसेच दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ) अन्वये जारी पर्यावरणीय आघात मुल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदी लागू होतात, त्यांचा अधिकारांच्या प्रत्यायोजनानुसार ( म्हणजेच " ब " वर्गवारीतील प्रकल्पांसाठी राज्य पर्यावरणीय आघात मूल्यमापन प्राधिकरण , किंवा अ वर्गवारीतील प्रकल्पांसाठीपर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय ) व संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशींच्या आधारे संबंधित मंजुरी प्राधिकरण , पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ अंतर्गत संयुक्त पर्यावरणीय व किनारपट्टी विनियमान विभाग परवानगीसाठी विचार करेल.

v. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदींच्या अंतर्गत विहित किमान मर्यादेपेक्षा कमी बांधीव क्षेत्रफळाच्या इमारत किंवा बांधकाम प्रकल्पांच्या बाबतीत, संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशी प्राप्त झाल्यावर संबंधित राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशातील नियोजन प्राधिकरणे सदर अधिसूचनेनुसार मान्यता देतील

vi. ३०० वर्ग मीटर पर्यंतच्या एकूण बांधीव क्षेत्रफळाच्या स्वनिवासी गाळ्यांना, संबंधित नियोजन प्राधिकरण संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशी शिवाय मान्यता प्रदान करतील. मात्र मान्यता प्रदान करण्यापूर्वी सदर प्राधिकरण सादर प्रस्तावाचा किनारपट्टी विनियमन विभाग अधिसूचनेच्या दृष्टीकोनातून अभ्यास करेल.

८. **अनुज्ञेय व विनियमित कार्यांसाठी किनारपट्टी विनियमन विभाग समाशोधन प्राप्त करण्याची प्रक्रिया** :

i. प्रकल्पाच्या प्रस्तावकांनी खालील दस्तैवजांच्यासह संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाकडे पूर्व परवानगी प्राप्त करण्यासाठी अर्ज करावा

a. सदर अधिसूचनेसोबतच्या परिशिष्ट V नुसार प्रकल्पाच्या सारांशाचा तपशील

b. इमारत बांधकाम प्रकल्प किंवा गृहबांधणी योजना वगळता, जे लागू असेल त्यानुसार सागरी व भौमिक घटकांच्या सह जलद पर्यावरण आघात मूल्यमापन अहवाल

c. सदर अधिसूचनेनुसारच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेनुसार (दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजी च्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ ) नुसार जारी पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदी लागू होण्यासाठी विहित किमान मर्यादेपेक्षा कमी बांधीव क्षेत्रफळाचे इमारत बांधणी किंवा गृहबांधणी प्रकल्प वगळून ) कमी व मध्यम धूप होणाऱ्या पट्ट्यातील प्रकल्पांसाठी पुष्टीदायक अभ्याससहित सर्वसमावेशक पर्यावरणीय आघात मूल्यमापन

d. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजी च्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ ) नुसार जारी पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदी लागू होण्यासाठी विहित किमान मर्यादेपेक्षा कमी बांधीव

क्षेत्रफळाचे इमारत बांधणी किंवा गृहबांधणी प्रकल्प वगळून इतर प्रकल्पांसाठी जोखीम मूल्यमापन अहवाल व आपत्ती व्यवस्थापन योजना

e. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने दिनांक १४ मार्च २०१४ रोजीच्या कार्यालयीन आदेश क्रमांक ज – १७०११ / ८ / ९२ – I अ – III नुसार निर्धारित केलेल्या अभिकरणाने , राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने आखलेल्या भरती किंवा ओहोटी रेषेचा उपयोग करून १ : ४००० प्रमाणात काढलेला किनारपट्टी विनियमन विभाग नकाशा

f. सदर अधिसूचनेनुसार मान्यताप्राप्त किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेनुसार प्रकल्पाच्या ठिकाणची किनारपट्टी विनियमन विभाग वर्गवारी व प्रकल्पाच्या सीमा रीतसर दर्शविणारा किनारपट्टी विनियमन विभाग नकाशावर अध्यारोपित केलेला प्रकल्प आराखडा

g. प्रकल्पस्थळाच्या सभोवताली ७ किलोमीटरच्या त्रिज्येचा किनारपट्टी विनियमन विभागाचा नकाशा. सदर नकाशात सी आर झेड I, II, III व IV क्षेत्रे तसेच अन्य अधिसूचित पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील विभाग दर्शविलेले असावेत

h. औद्योगिक सांडपाणी व निसृत पदार्थांचे प्रक्रिया केलेले स्राव विमोचीत करणाऱ्या प्रकल्पांच्या बाबतीत संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र किंवा “ स्थापित करण्याची संमती “ आणि जर संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या प्रदूषण नियंत्रण मंडळाची पूर्वानुमती प्राप्त न केल्यास, सदर अधिसूचनेनुसार परवानगी प्राप्त केल्यावर बांधकामाचे कार्य सुरु करण्याच्या अगोदर प्रस्तावकाने ते प्राप्त करणे आवश्यक आहे.

ii. संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यावास्थापन प्राधिकरण हे सदर अधिसूचनेच्या पूर्ततेप्रीत्यर्थ मान्यताप्राप्त किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेनुसार उपरोक्त परिच्छेद ( i ) मधील दस्तैवजांचा अभ्यास करेल व संपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून ६० दिवसांच्या आत खालील प्रमाणे शिफारशी करेल

a. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ ) नुसार जारी केलेल्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचनेतील तरतुदी लागू होणाऱ्या प्रकल्प किंवा कार्यांच्या बाबतीत, दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या विशेष आदेश क्रमांक १५३३ ( इ ) नुसार जारी केलेल्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार संयुक्त परवानगी देण्यासाठी किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने अ वर्गातील प्रकल्पांसाठी पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाकडे व ब वर्गातील प्रकल्पांसाठी राज्य पर्यावरणीय आघात मुल्यामापन प्राधिकरणाला शिफारशी अग्रेषित कराव्यात. मात्र सी आर झेड I किंवा IV मधील ब वर्गाच्या प्रकल्पांच्या बाबतीत, पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय किनारपट्टीक्षेत्रविनियमनासाठीची अंतिम शिफारस संबंधित राज्य पर्यावरणीय आघात मुल्यामापन प्राधिकरणाला करेल, जेणे करून ते प्रस्तावाला पर्यावरणीय व किनारपट्टीक्षेत्रविनियमांची संयुक्त परवानगी देऊ शकतील.

b. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या जारी केलेल्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचनेतील निकष लागू न न होणाऱ्या परंतु सदर अधिसुचानेतील निकष लागू होणाऱ्या व सी आर झेड I किंवा IV मध्ये स्थित प्रकल्प किंवा कार्यांच्या बाबतीत किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने आपल्या शिफारशी पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाकडे अग्रेषित कराव्यात.

c. दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजीच्या जारी केलेल्या पर्यावरणीय आघात मुल्यांकन अधिसूचनेतील निकष लागू न न होणाऱ्या परंतु सदर अधिसुचानेतील निकष लागू होणाऱ्या व सी आर झेड II किंवा III मध्ये स्थित प्रकल्प किंवा कार्यांच्या बाबतीत, प्रस्तावाकाकडून संपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून ६० दिवसांच्या आत संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण सदर प्रकल्पांचा विचार करेल.

d. सदर अधिसुचानेतील तरतुदी लागू होणाऱ्या परंतु उपरोक्त पर्यावरणीय आघात मूल्यमापन अधिसूचना २००६ मधील तरतुदीनुसार किमान मर्यादेपेक्षा कमी बांधीव क्षेत्रफळ असणाऱ्या बांधकामांच्या बाबतीत किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण आपल्या शिफारशी संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या नियोजन प्राधिकरणाला अग्रेषित करेल , जेणे करून सदर प्राधिकरणाला मान्यता प्रदान करणे शक्य होईल.

iii. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीवर आधारित सदर अधिसूचनेच्या अंतर्गत परवानगी साठी प्राप्त झालेल्या सर्व प्रकल्प प्रस्तावांवर पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाकडून ६० दिवसांच्या आत विचार करण्यात येईल.

iv. पुनर्गठन किंवा अन्य काही कारणाने किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण कार्यरत नसल्यास, सदर अधिसूचनेच्या तरतुदीनुसार प्रस्तावांची शिफारस व त्यावर टिप्पणी सादर करण्याची जबाबदारी त्या त्या राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेचे अभिरक्षक असलेल्या पर्यावरण विभागाची असेल

v. सदर अधिसूचनेच्या अंतर्गत प्रकल्पांना दिलेली परवानगी सात वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल. मात्र सदर परवानगी जारी झाल्याच्या दिनांकानंतर सात वर्षांच्या कालावधीत सर्व बांधकाम कार्ये पूर्ण होऊन प्रकल्पाचे परिचालन सुरु होणे आवश्यक आहे.

vi. परवानगी प्राप्त झाल्यवर संनियंत्रण

   a. पर्त्येक दिनदर्शिका वर्षाच्या दिनांक ३० जून व ३१ डिसेंबर रोजी, पर्यावरणीय परवानगीमधील विहित अटी व शर्ती यांच्या अनुपालानाचे सहामाही अहवाल सोफ्ट व छापील स्वरुपात सादर करणे प्रकल्प प्रस्तावाकांना बंधनकारक आहे. तसेच प्रकल्प प्रस्तावाकाने सदर अनुपालन अहवाल हे सार्वजनिक व्यासपीठावर प्रकाशित करून त्याची प्रत किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाकडे अर्ज करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला उपलब्ध असली पाहिजे.

   b. अनुपालन अहवाल संबंधित विनिमन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आला पाहिजे.

vii. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या कामात पारदर्शकता राहण्यासाठी , एक अनन्य संकेतस्थळ निर्माण करून त्यावर विषयपत्रिका, वृत्तांत, घेतलेले निर्णय, परवानगी पत्रे, उल्लंघन व त्यवर केलेली कार्यवाही , माननीय न्यायालयाच्या निर्णयासहित सर्व न्यायालयीन बाबींची माहिती , संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाची मान्यताप्राप्त किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना सदर संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आली पाहिजे.

**९. सदर अधिसूचनेची अंमलबजावणी**

i. सदर अधिसूचनेतील तरतुदींची अंमलबजावणी व कार्यान्वियन व त्यांतर्गत विहित अटी व शर्तींचे अनुपालन प्रयोजनार्थ, पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) नुसार पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेश, राष्ट्रीय किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण आणि राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाकडे मूळ किंवा प्रत्यायोजित अधिकार उपलब्ध आहेत.

ii. रिट याचीका क्रमांक ६६४ / १९९३ मधील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने राष्ट्रीय किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण आणि राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या रचना, कालावधी, व अधिकारक्षेत्र अधिसूचित केले आहे.

iii. राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेशाची किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण हे सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणी व संनियंत्रण यासाठी मुख्यत्वे जबाबदार असतील व सदर कार्यात साहाय्य करण्यासाठी संबंधित राज्य शासन किंवा केंद्रशासित प्रदेश जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय समित्या नेमतील. सदर समितीत मच्छिमार सहित स्थानिक परंपरागत समुदायातील किमान तीन प्रतिनिधी असतील व सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणीचा विचार थेट जिल्हा दंडाधिकारी स्तरावर करण्याचा विचार राज्य शासनाने करावा.

iv. दिनांक ६ जानेवारी २०११ रोजी विशेष आदेश क्रमांक १९ ( इ ) अन्वये जारी केलेल्या किनारपट्टी विनियमन विभाग अधिसूचनेनुसार , मच्छिमार व आदिवासीच्या सह किनारपट्टी वरील पारंपारिक समुदायांच्या अनुज्ञेय राहत्या घरांसाठी सदर अधिसूचनेनुसार संबंधित प्राधिकरणाकडून मान्यता प्राप्त केली नसल्यास त्या त्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने खालील अटींच्या अधीन राहून संबंधित राहती घरे नियमित करावीत

   a. त्यांचा व्यावसायिक प्रयोजनार्थ उपयोग होऊ नये ;

   b. किनारपट्टी वरील बिगर पारंपारिक समुदायांना ते अंतरित होऊ नयेत.

**१०. विशेष विचार आवश्यक असलेले विभाग**

**१०.१ गंभीररित्या असुरक्षित किनारपट्टी क्षेत्रे**

## महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

i. उप परिच्छेद ३.१ मधील नमूद सर्व गंभीररित्या असुरक्षित किनारपट्टी क्षेत्रात एकीकृत व्यवस्थापन योजना तयार करताना त्यामध्ये खारफुटी वनांचे संवर्धन व व्यवस्थापन , स्थानिक समुदायांच्या दवाखाने, शाळा, सार्वजनिक वर्षा निवारे, सामुदायिक स्वच्छतागृहे, पूल , रस्ते, छोटे धक्के, पाणी पुरवठा, सांडपाणी अशा विविध गरजा व वाढत्या समुद्र पातळीचा प्रभाव व अन्य नैसर्गिक आपत्तींचा विचार व्हावा. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना तयार करण्याच्या दिशानिर्देशांच्या धर्तीवरच एकीकृत व्यवस्थापन योजना तयार करण्यात येईल.

ii. सदर एकीकृत व्यवस्थापन योजनेस मान्यता प्राप्त होऊन अधिसूचित होईपर्यंत किनारपट्टी विभाग व्यवस्थापन प्राधिकरणाने मच्छिमारांच्या सहित किनारपट्टीवरील पारंपारिक समुदायांच्या गरजांचा योग्य विचार करून दवाखाने, शाळा, सार्वजनिक वर्षा निवारे, सामुदायिक स्वच्छतागृहे, पूल , रस्ते, छोटे धक्के, पाणी पुरवठा, सांडपाणी अशा त्यांच्या विविध गरजा बाबवार अनुज्ञेय कराव्यात.

१०.२ अंतर्भागातील पश्चजल बेटे व मुख्य भूमीच्या बाजूकडील बेटांसाठी किनारपट्टी विनियमन विभाग

i. अंतर्भागातील सर्व पश्चजल बेटे व मुख्य भूमीच्या बाजूकडील सर्व बेटे सदर अधिसूचनेत समाविष्ट असतील.

ii. सदर साठी पश्चजल बेटे व मुख्य भूमीच्या बाजूकडील सर्व बेटे यांच्या अनन्य किनारपट्टी प्रणालीचा आणि अशा पट्ट्यातील जागेच्या मर्यादांचा विचार करून, सदर बेटांच्या बाबतीत जमिनीकडील बाजूला भरती रेषेपासून २० मीटरचा किनारपट्टी विनियमन विभाग एकसारखेपणे लागू होईल व कार्याचे खालील प्रमाणे विनियमन करण्यात येईल

a. सदर बेटांच्या भरती रेषेपासून २० मीटर अंतरातील स्थानिक समुदायांची सद्य अस्तित्वातील राहत्या घरांची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी करण्यात यावी, मात्र सदर विभागात कोणतेही नवीन बांधकाम अनुज्ञेय असणार नाही.

b. विहित पर्यावरणीय सुरक्षा उपायांचा अवलंब करून मासेमारीसाठी छोटे धक्के, मासे वाळवण आवार, जाळी दुरुस्ती आवार, पारंपारिक पद्धतीने मत्स्य प्रक्रिया, नाव बांधण्याचे आवार, नाव दुरुस्ती, बर्फ प्रकल्प, व तत्सम किनारपट्टी लगतच्या भागातील कार्ये किनारपट्टी विनियमन क्षेत्रात हाती घ्यावीत.

दिनांक ६ जानेवारी २०११ रोजी विशेष आदेश क्रमांक २० ( इ) नुसार जारी बेट संरक्षण विभाग अधिसूचना २०११ नुसार छोट्या बेटांना लागू होणारे एकीकृत बेट व्यवस्थापन योजना ह्या संबंधित राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांकडून सर्व बेटांसाठी तयार करून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाला सादर करण्यात येईल. सदर एकीकृत बेट व्यवस्थापन योजना तयार होईपर्यंत सदर अधिसुचानेतील तरतुदी लागू न होता दिनांक ६ जानेवारी २०११ रोजी विशेष आदेश क्रमांक २० ( इ) नुसार जारी बेट संरक्षण विभाग अधिसूचना २०११ मधील तरतुदी लागू राहतील

**१०.३ बृहन्मुंबईच्या महानगरपालिका हद्दीतील किनारपट्टी विनियमन विभाग**

i. बृहन्मुंबईतील हिरव्या फुफ्फुसाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सी आर झेड III मधील विकास योजनेत दर्शविएल्य सर्व मोकळ्या जागा, उद्याने, बगीचे , क्रीडांगणे, यांची ना विकास क्षेत्र म्हणून वर्गवारी करण्यात येईल व तिथे फक्त नागरी सुविधा, मैदान, आणि मनोरंजन किंवा खेळांशी संबंधित कार्यांसाठी व्यायामशाळा यांची बांधकामे करण्यासाठी १५ % पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील व सदर मोकळ्या जागांचा निवासी अथवा व्यापारी वापर अनुज्ञेय असणार नाही

ii. सांडपाणी प्रकल्प उभारणीसाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्यास, किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीने व केंद्र सरकारच्या मान्यतेने , फक्त महानगरपालिका प्राधिकरणेच अपवादात्मक परिस्थितीत सी आर झेड I मध्ये महानगरपालिका क्षेत्रातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे बांधकाम करू शकतील. तसेच सदर स्वरूपाच्या प्रकल्पाचे बांधकाम खारफुटी वनक्षेत्रातच करणे अपरिहार्य असेल तर बांधकाम प्रक्रियेत नष्ट होणाऱ्या किंवा कापल्या जाणाऱ्या खारफुटी वनांच्या तिप्पट प्रमाणात खारफुटी वनांची लागवड करणे बंधनकारक असेल.

[ धारिका क्रमांक १९ – ११२ /० २०१३ – I अ – III ]
रितेश कुमार सिंह , संयुक्त सचिव



**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

# महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

**जोडपत्र I : पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांसाठी संवर्धन , सरंक्षण व व्यवस्थापन चौकट**

किनारपट्टी व सागरी विभागातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रे आणि भूरुपिकी वैशिष्ट्ये किनारपट्टीवरील कार्यात महत्वाची भूमिका निभावत असतात. खारफुटीची वने, समुद्रकिनारे, प्रवाळ बेटे इत्यादी घटक किनारपट्टीची धूप, किनाऱ्यावरील रेषा बदल, खाऱ्या पाण्याची घुसखोरी, ह्यावर नियंत्रण ठेवण्यात मदत करतात आणि वादळे, चक्रीवादळे, आणि सुनामी सारख्या समुद्र किनाऱ्यावरील नैसर्गिक आपत्तीत संरक्षण करतात. किनारपट्टीवरील उपजीविकेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिसंस्था सेवा पुरवून पर्यावरण दृष्ट्या संवेदशील क्षेत्रे किनारपट्टीची जैविक अखंडता अबाधित ठेवतात. त्याशिवाय समुद्र किनाऱ्यावर अनेक अमूल्य पुरातत्वीय व वारसा स्थळे अस्तित्वात असतात. त्यामुळे उपरोक्त क्षेत्रे, वैशिष्ट्ये व स्थळे यांचे संवर्धन व संरक्षण करणे आवश्यक आहे.

**१. सर्वसामान्य उपाय**

i. उपग्रह माहितीसाठ्याचा उपयोग करून राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्र सर्व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे निर्धारण करून त्यांचे सीमांकन चित्रित करेल

ii. सदर अधिसूचनेतील दिशानिर्देशानुसार राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेश प्राधिकृत संस्थांच्या मार्फत किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना तयार करतील व त्यामध्ये पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांच्या संवर्धन व संरक्षणाचे महत्व अधोरेखित करण्यात येईल.

iii. सदर अधिसूचनेत अनुज्ञेय कार्ये किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत समाविष्ट असतील.

खालील पैकी प्रत्येक पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राच्या संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापनासाठी विशिष्ट परिस्थतीत व अटींचा अवलंब केला पाहिजे

**१.१. खारफुटी वने**

i. वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार खारफुटी वन म्हणून घोषित झाले असल्यास :

   a. सदर अधिसूचनेत असलेल्या कोणत्याही तरतुदीच्या निरपेक्ष, संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेश किंवा केंद्र सरकारने अशा खारफुटी वनांना वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार वनजमीन म्हणून घोषित केले असल्यास तिथे सदर अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील



**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

ii. वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार खारफुटी वन म्हणून घोषित झाले नसल्यास :

a) संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनांनी तयार केलेल्या तपशीलवार योजनेच्या आधारे सरकारी जमिनीवरील खारफुटी वनांचे संरक्षण केले जाईल. खारफुटीच्या वनांचे क्षेत्रफळ हे १००० मीटर पेक्षा जास्त असल्यास सदर खारफुटी वनाच्या परीघावर ५० मीटरच्या बफर विभागाची तरतूद करावी लागेल. उद्याने, खारफुटी वनांशी संबंधित संशोधन सुविधा, संवर्धन व तत्सम कार्यासाठी सदर ५० मीटरच्या बफर विभागाचा उपयोग करण्यात यावा.

b) खासगी जमिनीतील खारफुटी वनांना बफर विभागाची आवश्यकता नाही.

१.२ **प्रवाळ, प्रवाळ बेटे व संबंधित जैवविविधता**

i. प्रवाळ व प्रवाळ बेटे व सभोवतालचा परिसर नष्ट करणे हे प्रतिबंधित कार्य आहे.

ii. संशोधन प्रयोजनार्थ आवश्यक छोट्या प्रमाणातील गरज वगळता सर्व प्रवाळ व प्रवाळ बेटे व सभोवतालचा परिसराचे संरक्षण केले पाहिजे.

iii. वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम १९७२ ( १९७२ चा ५३ ) नुसार पुनरुज्जीवन आवश्यक असलेल्या ठिकाणी ते करण्यासाठी आवश्यक मान्यता प्राप्त केल्यानंतरच प्रवाळ व प्रवाळ बेटांच्या प्रत्यारोपणचे कार्य करण्यात येईल.

iv. मृत किंवा नष्ट झालेल्या प्रवालांचे पुनरुज्जीवन व पुनर्वसन हाती घेण्यात यावे. प्रवाळ व प्रवाळ द्वीपांचे पुनरुज्जीवन व पुनर्वसन खालील प्रकारे करण्यात येईल.

a. सक्रीय व जिवंत प्रवाळ व प्रवाळ द्वीपे निर्धारित करून त्यांचे सीमांकन करून पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) नुसार पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित व अधिसूचित करण्यात आले पाहिजे.

b. खनिकर्म, निसृत व सांडपाणी स्त्रवण, गाळ उपसणे, स्थिर पाण्याचे स्त्रवण , जहाजे धुणे, बांधकाम पारंपारिक बिगर विनाशक मासेमारी अशी प्रवाळ व प्रवाळ बेटांच्या आरोग्याला व अस्तित्वाला घातक कार्ये अशा परिसरात हाती घेऊ नयेत.

१.३ वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम, १९७२ ( १९७२ चा ५३ ), किंवा वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ , किंवा पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ ( १९८६ चा २९ ) अंतर्गत घोषित राष्ट्रीय उद्याने, सागरी उद्याने व अभयारण्ये , राखीव वने, वन्यजीव अधिवास व राखीव जीवशास्त्रीय अधिवासंच्या सहित अन्य संरक्षित क्षेत्रांचे खालील प्रमाणे संरक्षण व संवर्धन करण्यात येईल

i. उपरोक्त उल्लेखित क्षेत्रांचे संवर्धन व संरक्षण हे जशी बाब असेल त्यानुसार त्या त्या अधिनियम, अधिसूचना यामधील तरतुदी किंवा दिशानिर्देशा नुसार करण्यात येईल.

ii. वाढत्या प्रमाणावरील वादळे, लाटा व पूर ह्यामुळे जीवित व संपत्तीची हानी टाळण्यासाठी किनारपट्टी भागातील वन क्षेत्रात वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

iii. जागेला योग्य अशी निवारा पट्टा लागवड किंवा रोपण सामग्री सह जैवढाल लागवड करण्यासाठी संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांनी अशा उपायांच्या प्रयोजनार्थ पर्याप्त निधीची तरतूद केली पाहिजे.

**१.४. खारी दलदल जमीन**

खाऱ्या दलदल जमिनीचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे करण्यात येईल :

i. खाऱ्या दलदल जमिनीचे संवर्धन व संरक्षण करून तिथे देशज जैववैविध्य प्रवर्तित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले पाहिजेत.

ii. वहन किंवा पारेषण करणाऱ्या उपरी तार किंवा भूमिगत तार अंथरणे इत्यादी कार्येच अनुज्ञेय असतील.

iii. खाऱ्या दलदल जमिनीत पारंपारिक मासेमारी अनुज्ञेय असेल.

iv. दिशानिर्देशात विहित केलेल्या निकषांच्या अधीन राहून खाऱ्या दलदल जमिनीत तात्पुरत्या पर्यटन सुविधांचा विचार करता येईल.

v. कमी जैंववैविध्य असलेल्या, राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने निर्धारित केलेल्या व किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन विभागात सिमांकित केलेल्या विशिष्ट खाऱ्या दलदल जमिनींचा मिठागरे कार्यांसाठी विचार करता येईल.

१.५ कासवांच्या प्रजाजन स्थळांचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे होईल :

i. संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांनी निर्धारित केलेली कासव प्रजनन स्थळे वन्यजीव ( संरक्षण ) अधिनियम १९७२ नुसार संरक्षित करण्यात येतील.

ii. सदर स्थळांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी आवश्यक कार्ये वगळता, प्रकाश निर्माण करणारी किंवा आवाजाचे प्रदूषण करणाऱ्या कोणतीही कार्ये कासवांच्या प्रजनन स्थळी अनुज्ञेय नसतील

iii. कासवांच्या प्रजाजन स्थळांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी संबंधित राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांनी सक्त व्यवस्थापन योजना हाती घेऊन करण्यान्वित केल्या पाहिजेत.

१.६ अश्वशक्ती खेकड्याच्या अधिवासाचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे होईल :

i. निर्धारित अधिवासांचे संरक्षण व संवर्धन हाती घेतले पाहिजे.

ii. अश्वशक्ती खेकड्याच्या परीसंस्थेवर विपरीत परिणाम होईल अशी कोणतीही कार्ये सदर अधिवासात किंवा अवतीभोवती हाती घेऊ नयेत.

१.७ सागरी गवताच्या पट्ट्यांचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे होईल :

i. सागरी गवताच्या निर्धारित पट्ट्यांचे संरक्षण व संवर्धन हाती घेतले पाहिजे.

ii. सागरी गवताच्या पट्ट्यावर विपरीत परिणाम करणारे कोणतेही कार्य हाती घेऊ नये.

iii. सागरी गावात कार्बन शोषून घेत असल्यामुळे राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी जिथे शक्य असेल तिथे सागरी गवताचे पट्टे विकसीत करण्यासाठी प्रयत्न करावेत

१.८ पक्ष्यांची घरटी करण्याच्या ठिकाणांचे खालील प्रकारे संरक्षण व संवर्धन करण्यात येईल

i. स्थानिक पक्षांच्या घरटी बनविण्याच्या स्थळांचे त्यांच्या स्थलांतर मार्गासहित संरक्षण करणे आवश्यक आहे. घरटी करण्याच्या जागा व स्थळांतर मार्गावर विपरीत परिणाम होईल अशी पवनचक्क्या, प्रसारण वाहिन्या ह्या सह कोणतीही कार्ये सदर क्षेत्रात हाती घेऊ नयेत.

ii. पक्षांना योग्य अधिवास उपलब्ध करून देण्यासाठी तसेच खारी दलदल व किनारपट्टीवरील जलधीतील जैवविविधता समृद्ध करण्यासाठी वनाच्छादन व खारफुटी वनांचे आच्छादन वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

१.९ भूरुपिकी दृष्ट्या महत्वाच्या विभागांचे प्रकारे संरक्षण व संवर्धन करण्यात येईल

i. निर्धारित वाळूच्या टेकड्यांचे संरक्षण व संवर्धन खालील प्रकारे झाले पाहिजे

a. निर्धारित वाळूच्या टेकड्या पर्यवरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ अंतर्गत अधिसूचित करण्यात येतील.

b. पादचारी मार्ग, तंबू, व तत्सम पर्यावरणाला अनुकूल तात्पुरत्या पर्यटन सुविधा वगळता, कोणत्याही प्रकारची विकसन कार्ये अनुज्ञेय असणार नाहीत.

c. दीर्घन किंवा अन्य योग्य वाळूचा उपयोग करून उचित प्रमाणात आण्विक खनिजांचे पुनर्भरण होईल अशा बेताने आण्विक खनिजे काढण्याचे कार्य वगळता, वाळूच्या टेकड्यांमध्ये खनिकर्म अनुज्ञेय असणार नाही.

d. वाळूच्या टेकड्यांची धूप होईल / त्या नष्ट होतील असे कोणतेही कार्य वाळूच्या टेकड्यांवर हाती घेऊ नये.

e. एतद्देशीय वनस्पती रोपण करूनच वाळूच्या टेकड्यांचे वनीकरण करता येईल.

f. सिमांकित केलेल्या वाळूच्या टेकड्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांनी योजना तयार करावी.

ii. वाळूचे किनारे

a. दीर्घन किंवा अन्य योग्य वाळूचा उपयोग करून उचित प्रमाणात आण्विक खनिजांचे पुनर्भरण होईल अशा बेताने आण्विक खनिजे हाताने काढण्याचे कार्य वगळता वाळूच्या किनाऱ्यांवर खनिकर्म अनुज्ञेय नाही.

b. किनाऱ्यांवर अनुज्ञेय विकासात्मक कार्ये हाती घेताना तेथील सभोवतालचे नुकसान होत असेल, तर प्रकल्प प्रधिकार्याने सदर संभाव्य नुकसानाची भरपाई करण्यासाठी कार्ये हाती घेऊन दीर्घकाळ पर्यंत त्यांची देखभाल घेण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

c. सिमांकित केलेल्या वाळूच्या किनाऱ्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांनी योजना तयार करावी

iii. जैविक दृष्ट्या सक्रीय दलदलीचे प्रदेश

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

a. राज्य सरकारे किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाच्या सहकार्याने राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्र जैविकदृष्ट्या दलदलीचे प्रदेश निर्धारित करेल.

b. सिमांकित केलेल्या जैविक दृष्ट्या सक्रीय दलदलीच्या प्रदेशांचे व्यवस्थापन करण्यासाठी राज्ये किंवा केंद्रशासित प्रदेशांनी योजना तयार करावी

१.१० पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या रचना आणि वारसा मूल्य असलेल्या स्थळे किंवा क्षेत्रे

i. त्या त्या संबंधित अधिनियम, अधिसूचना किंवा दिशानिर्देशातील तरतुदीनुसार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने निर्धारित केलेल्या पुरातत्वदृष्ट्या महत्वाच्या रचना आणि वारसा स्थळांचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी राज्य पुरातत्व अभिकरणे जबाबदार असतील.

ii. पुरातत्व व वारसा मूल्य लाभलेल्या निधारित रचना किंवा क्षेत्रांना क्षति पोहोचेल अशी कुठलीही कार्ये अनुज्ञेय असणार नाहीत.

iii. सदर रचना किंवा क्षेत्रे संवर्धन करून अशा रचनांचे जोते / दर्शनी भाग बदलणार नाहीत अशी कार्ये हाती घ्यावीत. रचनांच्या बाह्य वास्तूरचनेत बदल न करता संबंधित निकष लक्षात घेऊन अंतर्गत भागाची काळजीपूर्वक पुनर्रचना करण्याचा विचार करता येईल

## महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

**जोडपत्र II : सी आर झेड I A वगळता किनारपट्टी विनियमन विभागात साठवणूक करण्यासाठी अनुज्ञेय पेट्रोलियम व रासायनिक उत्पादनांची यादी**

i. कच्चे खनिज तेल
ii. द्रविकृत पेट्रोलियम वायू
iii. वाहनासाठी तेल
iv. घासलेट
v. हवाई इंधन
vi. हाय स्पीड डीझेल
vii. वंगण तेल
viii. ब्युटेन
ix. प्रोपेन
x. नैसर्गिक वायू
xi. नाफ्ता
xii. भट्टीचे तेल
xiii. गंधक – जड साठा
xiv. द्रविकृत नैसर्गिक वायू
xv. खते व खतांच्या उत्पादनार्थ आवश्यक कच्चा माल
xvi. असिटीक आम्ल
xvii. मोनो इथेलीन ग्लायकोल
xviii. पाराझायलीन
xix. इथेन
xx. ब्युटाडाईन
xxi. मिथानोल
xxii. कोष्टीक
xxiii. बीट्युमेन



Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019

## महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

**जोडपत्र ll : निर्देशित किनारपट्टी विनियमन विभागातील क्षेत्रात सागर किनाऱ्यावरील आरामगृहे, हॉटेल, व पर्यटन विकसन प्रकल्प ह्याविषयी दिशानिर्देश**

**१. सी आर झेड ll**

पर्यटक किंवा अभ्यागतांच्या सुविधेसाठी सी आर झेड ll मध्ये निर्देशित क्षेत्रात सागर किनाऱ्यावरील आरामगृहे, हॉटेल, व पर्यटन विकसन प्रकल्प हे खालील अटी व शर्तींचा अधीन असतील.

i. सद्य अस्तित्वातील रस्त्याच्या किंवा अधिकृत स्थावर बांधकामाच्या जमिनीकडील बाजूसच बांधकामाची परवानगी देण्यात येईल.

ii. समुद्राकाठी अभिगामाचे मार्ग कोणत्याही प्रकारे बंद होणार नाहीत ह्या अटीच्या अधीन राहून खासगी मिळकतीच्या सभोवताली वनस्पतींचे आच्छादन असलेले तारांचे कुंपण अनुज्ञेय असावे.

iii. वाळूच्या टेकड्यांचे सपाटीकरण करू नये

iv. गोल , नेट व दिव्यांसाठी खांब हे बांधकाम वगळता क्रीडा सुविधांच्या कोणत्याही प्रकारचे कायम स्वरूपी बांधकाम अनुज्ञेय असणार नाही

v. तळघराचे बांधकाम केल्याने सदर क्षेत्रातील भूभागाच्या भूजलाच्या मुक्त प्रवाहात कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नसल्याचे प्रमाणपत्र राज्य भूजल प्राधिकरणाने जारी करण्याच्या अटीच्या अधीन राहून तळघराच्या बांधकामाची परवानगी द्यावी

vi. सदर ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याच्या अगोदर राज्य भूजल प्राधिकरणाने सदर संदर्भातील केंद्र शासनाच्या दिशानिर्देशांचा विचार करावा

vii. प्रकल्प क्षेत्रातून प्रक्रिया केलेल्या निसृत, घनकचऱ्याची , उत्सर्जन , आवाज यांची गुणवत्ता व पातळी ही केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळासहित सक्षम प्राधिकरणे व पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ नुसार विहित मर्यादेत असावेत

viii. निसृत स्त्रवण व घनकचरा यांच्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करणे आवश्यक आहे व अपरीश्कृत निसृत स्त्रवण व घनकचरा पाण्यामध्ये किंवा सागराच्या पाण्यात किंवा किनारपट्टीवर सोडण्यात येणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

ix. प्रकल्पात वन जमिनींचे बिगर वन प्रयोजनासाठी अपवाहन होणार असल्यास वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार परवानगी प्राप्त केली पाहिजे व अन्य केंद्रीय व राज्य अधिनियमांच्या लागू असलेल्या नियमांचे पालन प्रकल्पाने केले पाहिजे. तसेच प्रकल्पासाठी राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या पर्यटन विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे.

**२. सी आर झेड lll**

पर्यटक किंवा अभ्यागतांच्या सुविधेसाठी सी आर झेड lll मध्ये निर्देशित क्षेत्रात सागर किनाऱ्यावरील आरामगृहे, हॉटेल, व पर्यटन विकसन प्रकल्प हे खालील अटी व शर्तींचा अधीन असतील.

i. समुद्राकाठी अभिगामाचे मार्ग कोणत्याही प्रकारे बंद होणार नाहीत ह्या अटीच्या अधीन राहून खासगी मिळकतीच्या सभोवताली वनस्पतींचे आच्छादन असलेले तारांचे कुंपण अनुज्ञेय असावे.

ii. वाळूच्या टेकड्यांचे सपाटीकरण करू नये

iii. गोल , नेट व दिव्यांसाठी खांब हे बांधकाम वगळता क्रीडा सुविधांच्या कोणत्याही प्रकारचे कायम स्वरूपी बांधकाम अनुज्ञेय असणार नाही

iv. तळघराचे बांधकाम केल्याने सदर क्षेत्रातील भूभागाच्या भूजलाच्या मुक्त प्रवाहात कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नसल्याचे प्रमाणपत्र राज्य भूजल प्राधिकरणाने जारी करण्याच्या अटीच्या अधीन राहून तळघराच्या बांधकामाची परवानगी द्यावी

v. सदर ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्याच्या अगोदर राज्य भूजल प्राधिकरणाने सदर संदर्भातील केंद्र शासनाच्या दिशानिर्देशांचा विचार करावा

vi. ना विकास विभागात कोणतेही बांधकाम करायची परवानगी नसली तरीही चटई क्षेत्र निर्देशांकाच्या गणनाच्या प्रयोजनार्थ ना विकास विभागात येणाऱ्या भूखंडाचे सर्व क्षेत्र विचारात घेणे आवश्यक आहे.

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

vii. सर्व मजल्यांचे बांधकामाचे एकूण क्षेत्र हे भूखंडाच्या आकाराच्या ३३ % पेक्षा जास्त असता कामा नये. म्हणजेच चटई क्षेत्र निर्देशांक हा ०.३३ पेक्षा जास्त असणार नाही व खुले क्षेत्र सुद्धा योग्य अशा वनस्पतींच्या आच्छादनाचे भूदृश्य उभारणे आवश्यक आहे.

viii. बांधकाम हे सभोवतालच्या भूदृश्याशी व स्थानिक वास्तुकला शैलीशी सुसंगत असावे

ix. बांधकामाची छताच्या पर्यंतची एकूण उंची ९ मीटर पेक्षा जास्त नसेल व ( तळमजला + एक वरचा मजला ) अशा दोन पेक्षा जास्त मजल्यांना बांधकाम अनुज्ञेय असणार नाही.

x. भरती रेषेपासूनच्या २०० मीटरच्या परिसरात भूजलाचा उपसा करता येणार नाही. तसेच २०० ते ५०० मीटर परिसरात सुद्धा केंद्रीय किंवा राज्य भूजल सर्वेक्षण मंडळाच्या सहमतीनेच भूजलाचा उपसा करता येईल

xi. भरती रेषेपासूनच्या ५०० मीटरच्या परिसरात इमारतीचा पाया किंवा तरण तलाव प्रयोजन वगळता . वाळू उपसा, वाळूच्या पट्ट्यांचे सपाटीकरण किंवा खोदाई अनुज्ञेय असणार नाही ,

xii. प्रकल्प क्षेत्रातून प्रक्रिया केलेल्या निसृत, घनकचऱ्याची , उत्सर्जन , आवाज यांची गुणवत्ता व पातळी ही केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळासहित सक्षम प्राधिकरणे व पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ नुसार विहित मर्यादेत असावेत

xiii. निसृत स्त्रवण व घनकचरा यांच्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक व्यवस्था करणे आवश्यक आहे व अपरीश्कृत निसृत स्त्रवण व घनकचरा पाण्यामध्ये किंवा सागराच्या पाण्यात किंवा किनारपट्टीवर सोडण्यात येणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

xiv. समुद्र काठावर सार्वजनिक अभिगम अनुज्ञेय असण्यासाठी कोणत्याही दोन हॉटेल किंवा आरम्गृहात किमान २० मीटर्सचे अंतर असणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत सदर अंतर ५०० मीटर पेक्षा कमी असणार नाही

xv. प्रकल्पात वन जमिनींचे बिगर वन प्रयोजनासाठी अपवाहन होणार असल्यास वन ( संवर्धन ) अधिनियम १९८० ( १९८० चा ६९ ) नुसार परवानगी प्राप्त केली पाहिजे व अन्य केंद्रीय व राज्य अधिनियमांच्या लागू असलेल्या नियमांचे पालन प्रकल्पाने केले पाहिजे. तसेच प्रकल्पासाठी राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या पर्यटन विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे.

टीप : ( सागरी उद्याने, खारफुटीची वने, प्रवाळ बेटे, मासे कासवे इत्यादी वन्यजीव प्राण्यांची प्रजनन स्थळे व अधिवास तसेच केंद्र व राज्य सरकारांनी किंवा केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाने अधिसूचित केलेल्या ) पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात आरम्गृहे किंवा हॉटेल यांच्या बांधकामांना परवानगी देण्यात येणार नाही.

## महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

**जोडपत्र IV–किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी दिशानिर्देश**

**१. भरती व ओहोटी रेषेचे सीमांकन करून घेणे**

राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने संपूर्ण देशाच्याकिनारपट्टीवर केलेल्या भरती व ओहोटी रेषांचे सीमांकन किनारपट्टी वरील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना उपलब्ध करून देण्यात आले आहे आणि सदर अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ भरती व ओहोटी रेषांचे सदर सीमांकनच ग्राह्य धरण्यात येईल

**२. धोका रेषा**

पाण्याच्या पातळीतील चढउतार , सागराच्या पातळीतील वाढ, ( धूप किंवा वाढ यामुळे ) दीर्घकाळ पर्यंत किनारपट्टी मधील बदल, इत्यादीमुळे भूमी भागात येणाऱ्या पुराचा विचार करून भारतीय सर्वेक्षण संस्थेने " धोका रेषेचे " सेमांकन केले आहे. भारतीय सर्वेक्षण संस्थेने सिमांकित केलेली धोका रेषा राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने सर्व किनारपट्टी वरील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना उपलब्ध करून दिली आहे. अनुकूलन व शमन उपाययोजना समाविष्ट असलेला किनारपट्टी पर्यावरणासाठीची आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी धोका रेषेचा साधन म्हणून उपयोग करून घेतला पाहिजे. सागरी समुदायांची असुरक्षितता घटवून त्यांना शाश्वत उपजीविका प्राप्त होण्याच्या दृष्टीने किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजना तयार करताना भरती ओहोटी रेषेतील जमिनीच्या उपयोगाचे नियोजन करताना हवामान बदल व किनारपट्टीत होणाऱ्या बदलांचा विचार झाला पाहिजे.

**३. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापनाचे नकाशे तयार करणे**

i. १ : २५००० ह्या प्रमाणातील आधारभूत नकाशे भारतीय सर्वेक्षण कडून प्राप्त करून घ्व्येत. जिथे १ : २५००० हे प्रमाण असलेले नकाशे उपलब्ध नसतील तिथे १ : ५०००० प्रमाणातील नकाशे हे आधारभूत नकाशे तयार करण्या प्रीत्यर्थ १ : २५००० प्रमाणापर्यंत मोठे करून घ्यावेत. सदर नकाशे खालील प्रमाणित तपशिलाचे असावेत

ii. एकक : ७. ५ मिनिटे x ७.५ मिनिटे

iii. अंकन : भारतीय सर्वेक्षण संस्थेची पत्रिकांची अंकन पद्धत

iv. क्षैतीज रेषांची गृहीत बाब : एव्हरेस्ट किंवा डब्ल्यू जी एस ८४

v. क्षितीजलंब रेषांची गृहीत बाब : सागराची सरासरी पातळी

vi. प्रदेश वर्णन : अद्ययावत उपग्रहीय किंवा हवाई प्रतिमांचा उपयोग करून भारतीय सर्वेक्षण संस्थेच्या नकाशातील प्रदेश वर्णन अद्ययावत करण्यात येईल

vii. राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राने सीमांकन केलेल्या भरती किंवा ओहोटी रेषेचा उपयोग करून पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४ मार्च २०११ रोजीच्या कार्यालयीन आदेश क्रमांक ज – १७०११ / ८ / ९२ – I अ – III अनुसार निधारित केलेल्या कोणत्याही अभिकरणकडून १ : २५००० प्रमाणात किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशे तयार करून घ्यावेत

viii. किनारपट्टी विनियमन विभागाच्या विविध वर्गवारीना लागू होणाऱ्या विविध विनियामक रेषा म्हणजेच भरती रेषेपासून २० मीटर, ५०, मीटर, २०० मीटर व ५०० मीटर अंतरावर आखून घ्याव्यात व धोका रेषा सिमांकित करून किनारपट्टी विनियमन विभागाच्या नकाशात अंतरित कराव्यात.

ix. लाटांनी प्रभावित होणाऱ्या अंतर्गत भागातील जलधीच्या किनाऱ्यावरील किनारपट्टी विनियमन विभागाच्या नकाशात भरती, ओहोटी रेषा व किनारपट्टी विनियमन विभागाच्या सीमा सुद्धा सिमांकित करून घ्याव्यात

x. किनारपट्टी विनियमन विभाग अधिसूचनेनुसार विविध किनारपट्टी विभागांचे वर्गीकरण करून त्या प्रीत्यर्थ प्रमाणित राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय रंग संकेटंटंचा उपयोग करण्यात यावा

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

**४. स्थानिक स्तरावरील किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशे**

i. स्थानिक स्तरावरील किनारपट्टी व्यवस्थापन नकाशे हे स्थानिक संस्था व अन्य अभिकरणानी किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनांचे कार्यान्वियन प्रयोजनार्थ असतात

ii. महसूल प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेले १ : ३९६० किंवा त्यालगत प्रमाणावरील भुकर नकाशांचा आधारभूत नकाशे म्हणून उपयोग करण्यात यावा

iii. भुकर नकाशांमध्ये भरती, ओहोटी व अन्य विनियामक रेषा व धोका रेषा सिमांकित करण्यात यावी व सदर वर्गीकरणे स्थानिक स्तरावरील किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशांमध्ये अंतरित करण्यात यावे

**५. किनारपट्टी विनियामक विभागांचे वर्गीकरण**

i. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशात विभागातील जमिनीचा उपयोग करण्याची योजना स्पष्टपणे सिमांकित करण्यात आली पाहिजे व राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन संस्थेने किनारपट्टी वरील राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना उपलब्ध करून दिलेल्या नकाशानुसार सी आर झेड – Iअ विभाग किंवा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील विभाग चिन्हांकित केले पाहिजेत. अशा सर्व पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्रांचे योग्य रंग संकेतांच्या सहाय्याने सीमांकन करणे आवश्यक आहे.

ii. १००० वर्ग मीटर पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या खारफुटी वन विभगातील बफर विभाग हा खारफुटी वनापेक्षा वेगळया रंगाने दर्शविले पाहिजे. बफर विभाग सुद्धा सी आर झेड – I विभाग म्हणून वर्गीकृत केले पाहिजे.

iii. किनारपट्टी विनियमन विभाग क्षेत्रात मासेमारीची गावे, मच्छिमार समुदायाच्या सामुदायिक मिळकती, मासेमारीचे छोटे धक्के , बर्फ कारखाना, मासे वाळवण आवार किंवा दवाखाने, शाळा, रस्ते व मासेमारी व स्थानिक समुदायांच्य तत्सम पायाभूत सुविधा भुकर नकाशांवर दर्शविल्या पाहिजेत. किनारपट्टी वरील विस्तार व मच्छिमार समुदायांच्या अन्य गरजा लक्षात घेऊन स्वच्छता , सुरक्षितता व आपत्तीचा सामना करण्यासठी मुलभूत सेवांची तरतूद व गृहनिर्माण गरजाविषयक दीर्घकालीन योजना किनारपट्टी वरील राज्ये व केंद्र शासित प्रदेशांनी तयार केल्या पाहिजेत.

iv. सी आर झेड IV मधील जल क्षेत्रे सिमांकित करण्यात आली पाहिजेत व जलधी ही समुद्र, कच्छसर , पश्चजल, खाडी, उपसागर, नदीमुख असल्यास त्यांचे सीमांकन स्पष्टपणे केले पाहिजे . सदर वर्गीकरणासाठी राष्ट्रीय जलआलेखन कार्यालयाने निर्धारित केलेल्या परिभाषेचा आधार घेण्यात यावा

v. जलधी मधील मासेमारी क्षेत्रे व माशांची पैदाइश क्षेत्रे या स्पष्टपणे चिन्हांकित केल्या पाहिजेत.

vi. गंभीररित्या असुरक्षित किनारपट्टी क्षेत्रात सी आर झेड I, II, III IV स्पष्टपणे सिमांकित करून जमिनीचा उपयोग नकाशा किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेवर अध्यारोपित केली पाहिजे

vii. समुद्राकडील सद्य अधिकृत बांधकामे स्पष्टपणे सिमांकित केली पाहिजेत.

viii. चक्रीवादळ, वादळ, सुनामी व तत्सम नैसर्गिक आपत्तीच्या दरम्यान मदत व सुटका प्रयोजनार्थ किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन नकाशांवर चक्रीवादळ व पाउस निवारे, हेलीपॅड व रस्त्यासाहित अन्य सर्व पायाभूत सुविधा स्पष्टपणे दर्शविण्यात याव्यात.

ix. पर्यावरणीय प्रमाणके , नियम व अधिनियमा नुसार घन व द्रव कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी व त्याच्या योग्य व्यवस्था व व्यवस्थापन करण्यासठी पर्याप्त व्यवस्था असल्यास किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजने अंतर्गत इमारतींचे बांधकाम व अन्य कार्यांना परवानगी देण्यात यावी.

**६. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेवर सार्वजनिक सल्लामसलत :**

i. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेला व्यापक प्रसिद्धी देऊन पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ नुसार सूचना व हरकती मागवाव्यात. संबंधित किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरण जिल्हा स्तरावर सदर किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजने बाबत सार्वजनिक सुनावणी करेल.

ii. प्राप्त सूचना व हरकतींच्या आधारे किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत सुधारणा करून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची मान्यता प्राप्त केली पाहिजे.

Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019

iii. मान्यताप्राप्त किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेची प्रत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाचे संकेतस्थळ , संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाचे संकेतस्थळ व छापील प्रत ग्राम पंचायत कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध असली पाहिजे.

**७. किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन योजनेत सुधारणा**

i. जिथे शंका असेल तिथे संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्याकिनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाने सदर बाब राष्ट्रीय शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन केंद्राकडे सदर शंका संदर्भित करावी. तिथे अद्ययावत उपग्रहीय प्रतिमा व मैदानी सत्याचा आधार घेऊन त्याचे सत्यापन करण्यात येईल.

ii. आवश्यकता असल्यास सुधारित नकाशा विचारार्थ पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाआकडे सादर करावा

**जोडपत्र V प्रकल्पाची तपशीलवार माहिती**

**१. प्रकल्पाचा तपशील**

A . प्रकल्पाचे नाव
B , सर्वेक्षण संख्या / गाव / संदर्भबिंदू
C . जिल्हा
D . राज्य
E. प्रस्ताव कशासाठी आहे ? ( संबंधित विकल्प निवडावा )

i. किनारपट्टी विनियमन विभागाच्या अंतर्गत नव्याने परवानगी

ii. अगोदरच जारी केलेल्या किनारपट्टी विनियमन विभागाच्या अंतर्गत परवानगीत दुरुस्ती

iii. अगोदरच जारी केलेल्या किनारपट्टी विनियमन विभागाच्या अंतर्गत परवानगीच्या वैधातेत वाढ

F . अर्जदाराचे नाव
G. अर्जदाराचा पत्ता
H . संपर्काचा तपशील ( दूरध्वनी क्रमांक व इमेल पत्ता )
I . प्रकल्पाचा खर्च ( रुपये कोटी )

**२. प्रकल्पाचे लाभ**

## महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणा मार्फत शासन मान्य अनुवादका कडून भाषांतर केलेली मराठी सि. आर. झेड. अधिसूचना, २०१९

A. **प्रकल्पाच्या लाभाचे तपशील**

B. **उत्पन्न होणारा रोजगार ( होय / नाही )** : होय असल्यास

i. एकूण आवश्यक मनुष्यबळ

ii. कायमस्वरूपी रोजगार ( संख्या )

iii. तात्पुरते रोजगार ( संख्या )

iv. बांधकामाच्या वेळेस - तात्पुरते रोजगार ( संख्या )

v. परीचालानाच्या दरम्यान - तात्पुरते रोजगार ( संख्या )

३. विचाराधीन प्रकल्पाचे वर्णन ( प्रकल्पाची वर्गवारी निवडावी ) :

A. **अतिथिगृह / इमारती / सार्वजनिक सुविधा**

i. एकूण / बांधीव क्षेत्रफळ :

ii. बांधकामाची उंची :

iii. चटई क्षेत्र निर्देशांकाचे प्रमाण :

iv. संबंधित नगर योजना प्राधिकरणाचे / पंचायतीचे नाव :

v. वाहन पार्क करण्यासाठी तरतुदीचे तपशील

B. **किनारपट्टी रस्ते / घोडाकाठी रस्ते**

i. पुनर्प्रप्त जमिनीचे क्षेत्रफळ

ii. पुनर्प्राप्ती प्रयोजनार्थ माती / घाणीचे अंदाजित प्रमाण

iii. रहदारी वहन क्षमता

iv. रस्त्याचे मोजमाप :

C. **औष्णिक उर्जा फुंकणी पासून नलिका मार्ग**

i. नलिका मार्गाची लांबी

ii. किनारपट्टी विनियमन विभागाच्या क्षेत्रातून पार होणारी लांबी

iii. खोदाईची खोली

iv. खोदाईची रुंदी

v. समुद्र किनाऱ्यापासून खोल समुद्रात जाणाऱ्या नलिका मार्गाची लांबी

vi. समुद्राच्या पाण्याच्या पृष्ठभागापासून पातमुख बिंदूची खोली

vii. विल्हेवाट बिंदूपाशी सभोवतालच्या वर निसृताचे तापमान

D. **प्रक्रिया केलेल्या निसृताची नलिका मार्गाद्वारे सागरी विल्हेवाट**

i. अंतर्ग्रहण / पातमुखाचे ठिकाण

ii. पातमुख बिंदूची खोली

iii. नलिका मार्गाची लांबी

iv. किनारपट्टी विनियमन विभागाच्या क्षेत्रातून पार होणारी लांबी

v. खोदाईची खोली

vi. खोदाईची रुंदी

vii. समुद्र किनाऱ्यापासून खोल समुद्रात जाणाऱ्या नलिका मार्गाची लांबी

viii. समुद्राच्या पाण्याच्या पृष्ठभागापासून पातमुख बिंदूची खोली

ix. विल्हेवाट बिंदुला पाण्याची खोली

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

x. जैवरसायनीक प्राणवायूची मागणी, रासायनिक प्राणवायूची मागणी, एकूण तरंगते घन पदार्थ, तेल, ग्रीस, निसृतातजड खनिजांचे प्रमाण

**E. वस्तू / रसायने यांच्या साठवणीसाठी सुविधा**

i. रसायनाचे नाव
ii. रसायनाची अंतिम उपयोगिता
iii. साठवणीसाठी टाक्यांची संख्या
iv. टाक्यांची क्षमता

F. अपतटीय बांधकामे

i. समन्वेषण किंवा विकसन
ii. समुद्र किनाऱ्याची खोली
iii. दोरखंडांची संख्या
**iv. फलाटांची संख्या**
v. गट एकत्रित येणाऱ्या स्थानकांचे तपशील

**G. पृथक्करण संयंत्र**

**i. पृथाक्करणाची क्षमता**
ii. खाऱ्या पाण्याची एकूण व्युत्पन्नता
iii. विल्हेवाट बिंदूपाशी सभोवतालच्या वर निसृताचे तापमान
iv. सभोवतालचा खारेपणा
v. विल्हेवाट बिंदू

**H. आण्विक खनिजांचे खनिकर्म**

i. खनिकर्म क्षमता
ii. काढल्या जाणाऱ्या खनिजाचा प्रकार
iii. खनिजाचा अंतिम उपयोग
iv. खनिकर्म भाडेपट्टा / समन्वेषण करण्यासाठी सरकारी आदेश व मान्यताप्राप्त खनिज नियोजन तपशील
v. खनिकर्म भाडेपट्ट्याच्या क्षेत्राचा विस्तार

**I. सांडपाणी प्रक्रिया संयंत्र**

i. क्षमता
ii. बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ
iii. केंद्रीय / राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा अन्य प्राधिकृत अभिकरण यांनी विहित केलेल्या निसृत परामुल्यांचे अनुपालन
iv. स्त्रावण समुद्राच्या पाण्यात / खाडीत आहे काय ? उत्तर होय असल्यास
v. किनाऱ्यापासून / भरती नदीच्या किनाऱ्यापासून सागरी पातमुख बिंदूचे अंतर
vi. समुद्र / नदीच्या पाण्याच्या पृष्ठभागापासून पातमुउळ बिंदूची खोली
vii. पातमुख बिंदूला समुद्र / नदी किनाऱ्याची खोली

**J. दीपगृह**

i. पाया / फलाटाचे एकूण मैदानी क्षेत्रफळ
ii. बांधकामाची उंची

K. पवनचक्क्या

i. क्षमता ( मेगावाट )

Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019

ii. पवनचक्कीची उंची

iii. पवनचक्कीचा व्यास

iv. पात्याची लांबी

v. फिरण्याचा वेग

vi. पारेषण वाहिन्या ( डोक्यावरून की भूमिगत

L. **अन्य**

i. कृपया ठळक वैशिष्ट्ये नमूद करा

ii. संबंधित दस्तऐवज ( पी डी एफ स्वरुपात ) अपलोड करा

**४. किनारपट्टी विनियमन विभाग वर्गवारीनुसार प्रकल्पाचे ठिकाण ( जर प्रकल्पाचे ठिकाण अनेक प्रकारच्या किनारपट्टी विनियमन विभागात मोडत असेल, त्याबाबत विस्ताराने लिहावे )**

**५. किनारपट्टी विनियमन अधिसूचनेतील कोणत्या परिच्छेदाच्या अन्वये प्रकल्प हे अनुज्ञेय / विनियमित कार्य आहे.**

**६. प्रकल्पाच्या मूल्यमापनासाठी अनिवार्य माहिती**

A. सिमांकित भरती ओहोटी रेषा दर्शविणारा १ : ४००० प्रमाणातील किनारपट्टी विनियमन विभागाचा नकाशा आणि भरती रेषेपासून प्रकल्पाच्या नजीकच्या सीमारेषेचे अंतर मीटर्स मध्ये नमूद करावे
नकाशा अपलोड करावा ( के एम एल धारिका )

B. १ : ४००० प्रमाणातील किनारपट्टी विनियमन विभागाच्या नकाशावर अध्यारोपित केलेला प्रकल्प आराखडा . तसेच अन्य अधिसूचित पर्यावरण संवेदनशील क्षेत्रांच्या सह प्रकल्पाच्या ठिकाणाचे वर्गीकरण नमूद करावे
नकाशा अपलोड करावा ( के एम एल धारिका )

C. प्रकल्पाच्या ठिकाणाचा मध्य धरून ७ किलोमीटर त्रीज्येचा तपशील दर्शविणारा १ : २५००० प्रमाणातील किनारपट्टी विनियमन विभागाचा नकाशा
नकाशा अपलोड करावा ( के एम एल धारिका )

**७. प्रकल्प कुठे स्थित आहे : ( प्रकार निवडा )**

i. धूप न होणारा समुद्रकिनारा

ii. कमी व मध्यम धूप होणारा समुद्रकिनारा

iii. मोठ्या प्रमाणावर धूप होणारा समुद्रकिनारा

**८. वन / खारफुटीच्या वन जमिनींचे तपशील : ( होय / नाही ) उत्तर होय असल्यास**

i. वळविलेल्या क्षेत्रफळाचे तपशील

ii. वन खात्याची परवानगी सादर करावी ( दस्तऐवज अपलोड करावा )

iii. प्रकल्पाच्या अंतर्गत कापाव्या लागणाऱ्या झाडांची संख्या

iv. त्याबदल्यात भरपाई वनीकरण योजना सादर करावी ( दस्तऐवज अपलोड करा )

९. प्रस्तुत प्रकल्पाचे पर्यावरणदृष्ट्या संवेन्दानशील क्षेत्र / सागरी उद्यान / वन्यजीव अभयारण्यापासूनचे अंतर

i. प्रकल्प स्थळापासून १० किलोमीटरच्या त्रीज्येत ( होय / नाही ) उत्तर होय असल्यास

ii. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची परवानगी सादर करावी ( दस्तऐवज अपलोड करावा )

**१०. राज्य / केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळांकडून स्थापित करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र / सहमती प्राप्त केली – ( होय / नाही. )**
**होय असल्यास**

i. ना हरकत प्रमाणपत्राची प्रत सादर करावी ( दस्तऐवज अपलोड करावा )
ii. विहित अटी नमूद कराव्यात ( दस्तऐवज अपलोड करावा )

**११. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यास ( संबंधित पर्यायांची माहिती भरावी )**

A. **भौमिक अभ्यास**

i. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यासाचा ( भौमिक ) सारांश तपशील
ii. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यासतील शिफारशी अपलोड करा ( दस्तऐवज अपलोड करावा )
iii. अभ्यासाचा कालावधी नमूद करावा

B , **सागरी अभ्यास**

i. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यासाचा ( सागरी ) सारांश तपशील
ii. पर्यावरणीय आघात मूल्यमापन अभ्यासतील शिफारशी अपलोड करा ( दस्तऐवज अपलोड करावा )
iii. अभ्यासाचा कालावधी नमूद करावा

**१२. आपत्ती व्यवस्थापन योजना / राष्ट्रीय तेल गळती आपत्ती आकस्मिकता योजना ( लागू असल्यास )**

**१३, द्रव स्वरूपातील निसृत स्त्रवण असलेला प्रकल्प**

i. मैलापाणी प्रक्रिया संयंत्राची क्षमता
ii. व्युत्पन्न निसृताचे प्रमाण
iii. प्रक्रिया केलेल्या निसृताचे प्रमाण
iv. प्रक्रिया व विल्हेवाटीची पद्धत

**१४. घनकचरा विल्हेवाट समाविष्ट असलेला प्रकल्प**

i. घनकचऱ्याचा प्रकार
ii. व्युत्पन्न घनकचऱ्याचे प्रमाण
iii. विल्हेवाटीची पद्धत
iv. वाहतुकीचा प्रकार

**१५. पाण्याची गरज ( दररोज किलो लिटर मध्ये )**

i. आवश्यक पाण्याचे प्रमाण
ii. पाण्याचा स्त्रोत
iii. भूजल असल्यास ( केंद्रीय भूजल प्राधिकरण किंवा अन्य प्राधिकृत प्राधिकरणाच्या मान्यतेची प्रत अपलोड करावी )
iv. अन्य स्त्रोत असल्यास (प्राधिकृत प्राधिकरणाच्या मान्यतेची प्रत अपलोड करावी )
v. वाहतुकीचा प्रकार
vi. पाणी पुरवठ्याची बांधिलकी

**१६. पाण्यावर प्रक्रियेचे व पुनर्वापराचे तपशील**



| प्रकार / स्त्रोत | सांडपाणी व्युत्पन्न होण्याचे प्रमाण ( दररोज किलो लिटर मध्ये ) | प्रक्रिया क्षमता ( दररोज किलो लिटर मध्ये ) | प्रक्रियेची पद्धत | विल्हेवाटीची पद्धत | सांडपाणी विमोचीत होण्याचे प्रमाण ( दररोज किलो लिटर मध्ये ) | पुनर्वापर होणाऱ्या प्रक्रिया केलेल्या पाण्याचे प्रमाण ( दररोज किलो लिटर मध्ये ) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

१७. **पावसाच्या पाण्याच्या साठवणीचे तपशील**

i. साठवण टाक्यांची संख्या
ii. टाक्यांची एकूण क्षमता
iii. पुनर्भरण खड्ड्यांची संख्या
iv. खड्ड्यांची क्षमता

१८ . **उर्जेची गरज व स्त्रोत**

i. उर्जेची एकूण गारण ( किलो वाट प्रती तास )
ii. स्त्रोत
iii. कराराची प्रत अपलोड करावी ( फक्त पी डी एफ स्वरूपातच अपलोड करावी )
iv. पर्यायी व्यवस्था ( तपशील )

१९. **उर्जा कार्यक्षमता / बचत उपाययोजना**

i. स्त्रोत / पद्धत
ii. बचतीचे तपशील

२०. **राज्य किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाची शिफारस**

i. राज्य किनारपट्टीक्षेत्रव्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशीची प्रत अपलोड करा ( फक्त पी डी एफ स्वरुपात )
ii. विहित अटींच्या अनुपालनाची स्थिती

२१. **पर्यावरण आघात अभ्यास अधिसूचना २००६ ने प्रकल्प बाधित आहे काय ? ( होय / नाही ) . उत्तर होय असल्यास**

i. त्याची वर्गवारी
ii. पर्यावरणीय परवानगीसाठी सादर प्रस्तावाची सद्य स्थिती ( लागू असेल त्यानुसार )

२२. सामाजिक व पर्यावरणीय बाबी व सुचविण्यात आलेली शमन उपाययोजना – ह्यामध्ये पुनर्वसन व पुनर्स्थापन, पाणी, हवा, धोकादायक कचरा, पर्यावरण पैलू इत्यादी समाविष्ट , पण एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. ( तपशील थोडक्यात द्यावा )

२३. **न्यायालयीन दाव्यांचे तपशील.** : प्रकल्पाच्या विरुद्ध आणि / किंवा जिथे प्रकल्प स्थापित होणे प्रस्तावित आहे, त्या जमिनीवरून काही न्यायालयीन दावे प्रलंबित आहेत काय ? - * होय / नाही ) उत्तर होय असल्यास प्रलंबित की निकाली ?

i. न्यायालयाचे नाव : ( सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय , राष्ट्रीय हरित लवाद )

**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**

ii. दावा क्रमांक :

iii. दाव्याचा तपशील

iv. न्यायालयाचे निर्देश / आदेश असल्यास आणि प्रस्तावित प्रकल्पाशी त्याचा संबंध ( दस्तऐवज अपलोड करा )

२४. अतिरिक्त माहिती ( असल्यास ) :
घोषणापत्र : ह्याद्वारे प्रमाणित करण्यात येते की माझ्या ज्ञान व विश्वासानुसार उपरोक्त सादर माहिती खरी असून किनारपट्टी विनियमन विभाग २०११ अधिसूचनेतील तरतुदींचे कोणतेही उल्लंघन येथे दडविण्यात आलेले नाही.

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी
दिनांक



**Sunil SainathBhagwat Government Empanelled and AuthorisedTranslator vide Government of Maharashtra G R no Namika 2019 / Case no 39 / Bhasha 2 dated 14.6.2019**